# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

## वार्षिक वृत्त

दि.१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३

(राष्ट्रीय शके १९४३-४४)






ज्ञान प्रबोधिनीच्या साठाव्या वर्धापन दिनाला
तिसऱ्या भवितव्य लेखाचे प्रकाशन



निगडी केंद्रातील अभ्यासपर्व पुस्तक प्रकाशन कार्यक्रम



डॉ. रघुनाथ माशेलकर यांचा प्रशालेतील विद्यार्थ्यांशी संवाद




रूप पालटू व्याख्यानमालेत बोलताना ले. ज. सुदर्शन हसबनीस (निवृत्त)
व उजवीकडे मुलाखतकार नंदकुमार काकिर्डे




संत्रिका मातृभूमिपूजन सांगता कार्यक्रमात उपस्थित मान्यवर



शुक्रवार पेठेतील सामाजिक शास्त्रे संशोधन संकुलाचे भूमिपूजन




महिला पोलीस ठाणी परिसंवादात सहभागी मान्यवर सदस्य



आचार्यव्रत शिबिरात सहभागी अध्यापक व मार्गदर्शक सदस्य

# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९४४-४५)

दि.१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३


| | | |
|---|---|---|
| **पत्ता** | **:** | **ज्ञान प्रबोधिनी भवन**<br>**५१०, सदाशिव पेठ,**<br>**पुणे ४११०३०** |
| **दूरभाष क्र.** | **:** | **(०२०) २४२०७०००** |
| **संकेत स्थळ** | **:** | www.jnanaprabodhini.org |
| **ई–मेल** | **:** | contact@jnanaprabodhini.org |

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

## ज्ञान प्रबोधिनीचे सन्माननीय सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | माजी महासंचालक, CSIR नवी दिल्ली |
| श्री. आण्णा हजारे | सामाजिक कार्यकर्ते |
| श्रीमती अनु आगा | माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या |
| डॉ. जयंत नारळीकर | माजी संचालक, आयुका, पुणे |

## ज्ञान प्रबोधिनी, पुणे

### पदाधिकारी

१. डॉ. रघुनाथ माशेलकर (अध्यक्ष)
२. श्री. आण्णा हजारे (उपाध्यक्ष)
३. डॉ. विजय लक्ष्मण केळकर (उपाध्यक्ष)
४. डॉ. श. बा./रवि पंडित (कार्याध्यक्ष)
५. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
६. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
७. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)

### कार्यकारी मंडळ

१. डॉ. श. बा./रवि पंडित (कार्याध्यक्ष)
२. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
४. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)
५. श्री. रामकुमार राठी
६. श्री. मोहन चि. गुजराथी
७. वा. विवेक बा. कुलकर्णी
८. वा. सुधाताई कोठारी
९. श्री. महेश आठवले
१०. प्रा. महेन्द्र सेठिया
११. श्री. मनोज देवळेकर
१२. वा. अनघा लवळेकर
१३. सौ. सुवर्णा गोखले
१४. वा. मिलिंद नाईक

### संचालक नियुक्त सदस्य

१५. प्रा. प्रशांत दिवेकर
१६. श्री. आशुतोष बारमुख
१७. श्रीमती शर्मिष्ठा चिपळूणकर
१८. प्रा. मधुरा लुंकड
१९. श्री. नचिकेत नित्सुरे

### संस्थात्मक सदस्य

१. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

(या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.)

### संलग्न सेक्शन 8 कंपन्या

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला अॅल्युम्नाय फौंडेशन (JPPAF)
२. ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation
३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका (JPF, USA)

### केंद्रे

#### मुख्य केंद्रे

१. पुणे
२. निगडी
३. सोलापूर
४. हराळी (उस्मानाबाद)

#### उपकेंद्रे

१. पुणे केंद्र : शिवापूर, वेल्हे, शिरवळ (जिल्हा सातारा)
२. निगडी केंद्र : साळुंब्रे

#### विस्तार केंद्रे

१. अंबाजोगाई विस्तार केंद्र (जिल्हा बीड)
२. डोंबिवली विस्तार केंद्र
३. बोरीवली विस्तार केंद्र

# हितगुज

सौर शके १९४४-४५ म्हणजेच सन २०२२-२३ हे वर्ष अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. प्रबोधिनीच्या संस्थारूपी संघटनेची पुढची दहा वर्षे कशी असावीत, यासाठीचा तिसरा भवितव्य लेख गेल्या वर्षभरात तयार झाला. तो करण्यात सुमारे २०० कार्यकर्त्यांनी भाग घेतला. त्याची संक्षिप्त आवृत्ती दि. ८ ऑगस्ट २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली. प्रबोधिनीच्या कार्याचा महाराष्ट्राच्या सहा प्रादेशिक विभागांमध्ये आणि देशाच्या सहा प्रांतांमध्ये विस्तार करण्याचा संकल्प या लेखात आहे. त्याचे सविस्तर विवेचन वृत्तात वाचावयास मिळेल.

व्यापक समाजापर्यंत पोहोचण्याचे जे प्रयत्न गतवर्षात विविध विभागांनी केले, त्यात संत्रिकेने केलेल्या मातृभूमिपूजनाच्या १३५ कार्यक्रमांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. अनेक शाळा व सार्वजनिक संस्था यांच्या पर्यंत 'मातृभूमी हेच दैवत' ही एकात्मतेची भावना रुजविणारे हे कार्यक्रम झाले. भारतातील विविध धर्म-पंथ व जाती यांना एका धाग्यात गुंफणारा हा प्रबोधिनीचा विचार आहे.

पूर्वांचलातील मणिपूर राज्यामधून सध्या येणाऱ्या अशांततेच्या बातम्या आपणा सर्वांनाच अस्वस्थ करून सोडतात. मात्र प्रबोधिनीची माजी युवती सचिव वीणाताई बेडेकर गेली तीन वर्षे तेथील शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काम करीत आहे. पूर्वी अरुणाचल प्रदेशात काम करणारे प्रबोधिनीचे माजी प्राचार्य कै. विवेकराव पोंक्षे यांच्या प्रेरणेतून सोलापुरात गेल्या वर्षी पूर्वांचलासाठी प्रबोधिनीचे एक वसतिगृह सुरू झाले व त्यात दहा मणिपुरी विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत आहेत, ही मोठीच समाधानाची बाब होय.

शिक्षण क्षेत्रात अध्यापकांची भूमिका महत्त्वाची असते. अध्यापकांनी स्वतः सतत अद्ययावत राहणे व विद्यार्थ्यांशी संस्कारक्षम संबंध तयार करणे या उद्देशाने 'आचार्यव्रत' ही संकल्पना प्रबोधिनीने मांडली आहे. वृत्तांत वर्षात असे दोन कार्यक्रम अनुक्रमे सोलापूर व निगडी केंद्रांमध्ये झाले.

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त निगडी केंद्राने वर्षभर ७५ विषयांवर अभ्यासाची योजना केली. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांमधून ७५ तक्ते तयार झाले. पर्यावरण, शिक्षण, सामाजिक, तंत्रज्ञान, औद्योगिक व आरोग्य अशा सहा पुस्तिका मा. संचालकांच्या हस्ते प्रकाशित झाल्या, तसेच न्याय, राजकीय, शेती, सांस्कृतिक व संरक्षण या पाच पुस्तिकांचे प्रकाशन माजी केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. वर्षभर चाललेल्या या प्रकल्पाला वा. अजितराव कानिटकर आणि प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

प्रबोधिनीच्या शैक्षणिक विभागांची वाटचाल ही दरवर्षी प्रमाणे चांगली प्रगतिपथावर आणि नावीन्यपूर्ण अशी झाली. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये क्रमिक शिक्षणाबरोबर अन्य जे-जे प्रयोग केले जातात, ज्या शिक्षण पद्धती अनुसरल्या जातात त्यामध्ये 'गतिमान प्रभुत्व अध्ययन-अध्यापन' अशी जी पद्धत आहे, ती इंग्रजी आणि गणित या दोन विषयांसाठी विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरते आहे. जे विशेष उद्दिष्ट गट विद्यार्थी स्वतःहून निवडतात त्यातल्या व्यावहारिक अशा अभ्यासासाठी अनेक माजी विद्यार्थी मार्गदर्शनासाठी येत असतात. यंदा विद्यार्थ्यांनी सामाजिक उद्योजकता, ऊर्जा, कायदा आणि घटना, राष्ट्रीय एकात्मता, ग्राम विकसन आणि अर्थशास्त्र असे विषय निवडलेले आहेत. प्रकल्प पद्धती ही आता अगदी ५वीपासून १०वीपर्यंत वेगवेगळ्या स्तरांवर अनुसरली जाते आणि ती अध्ययन पद्धतीचा अविभाज्य घटक झालेली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनामध्ये अभिव्यक्ती विकसन, त्याचं प्रात्यक्षिक हे ही दरवर्षी सादर होतं. इ. ८वी आणि ९वी या दोन इयत्तांसाठी यंदा विद्याव्रत संस्काराचे कार्यक्रम झाले आणि त्यासाठी अगोदर व्याख्यानमाला, त्याच्यावरच्या चर्चा आणि सज्जनगड येथील शिबिर यांची योजना झालेली होती. विविध विषयांवरची व्याख्यानं, अभ्यास शिबिरं योजलेली होती. विशेष अभिरूची गट यामध्ये या वर्षी जर्मन आणि फ्रेंच भाषा, कॅन्व्हास पेंटिंग, धडपड प्रयोगशाळा, कृत्रिक बुद्धिमत्ता, खगोलशास्त्र, बुद्धिबळ आणि जिम्नॅस्टिक्स इतक्या विविध प्रकारच्या विषयांचे गट चालवले गेले. सामाजिक जाणिवेसाठी वेगवेगळ्या पद्धतींनी समाजामध्ये मिसळणे हा प्रकार आपण करतो आणि आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थी वारीमध्ये सहभागी होतात. तसेच, प्रत्यक्ष भजनाचा कार्यक्रम हा सुद्धा प्रशालेने योजला होता.

प्रबोधिनीच्या शाळांमध्ये जे उपक्रम सिद्ध होतात, यशस्वी होतात त्यांची आवृत्ती महाराष्ट्रातल्या आणि इतर प्रांतांमधल्या शाळांमध्ये करण्यासाठी शिक्षण विस्तार विभाग आणि शिक्षण विस्ताराची कार्यदिशा आपण तयार केली आहे. त्यात अनेक प्रकारचे उपक्रम आहेत. शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांमधली विज्ञानाची गोडी वाढावी, चिकित्सेची सवय त्यांना लागावी यासाठी 'छोटे सायंटिस्ट' हा उपक्रम आता एका तपापेक्षा जास्त काळ चालू आहे. त्याचा विस्तार सहा राज्यांमध्ये जवळ-जवळ ७८१ शाळांमध्ये यंदा करण्यात आला. त्यात ६३,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये वेल्हे तालुक्यामध्ये 'विकासमित्र' हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवला जातो, त्याच्यामध्ये ४९ शाळा सहभागी होत्या आणि २१०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

पुणे शहरामध्ये, वस्ती भागामध्ये 'अनुभवशाळा' आणि 'प्रज्ञाविकास' हे जे कार्यक्रम पाच केंद्रांमध्ये चालवण्यात आले, त्यामध्ये प्रत्येकी २०० च्या सुमारास विद्यार्थी उपस्थित होते. रायगड जिल्ह्यामध्ये रोहा व आसपासच्या १३ शाळांमध्ये उपक्रम झाले, त्यात

१३०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. महाविद्यालयीन किंवा पदव्युत्तर अशा कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राबाहेरच्या आठ राज्यांमध्ये विज्ञान प्रसाराचं जे काम केलं त्याला आपण 'ज्ञानसेतू' असं नाव दिलं आहे, ते १०८ ठिकाणी झालं. त्यामध्ये जवळ-जवळ ८७०० विद्यार्थी सहभागी झाले होते. अशा या सगळ्या कार्यक्रमांमधून प्रबोधिनीचे शैक्षणिक विचार आणि शिक्षणाची अध्ययन-अध्यापन पद्धती ही देशभर पसरावी असा आपला उद्देश आहे. त्याचा विस्तार हा उत्तरोत्तर वाढतो आहे. प्रत्यक्ष तज्ज्ञ अध्यापक हे त्या-त्या ठिकाणी जाऊन जसं हे काम चालतं तसं दृक्-श्राव्य माध्यमातून सुद्धा दूरस्थ पद्धतीने या वेळेला अशी काही सत्रे जम्मू-काश्मीरच्या काही शाळांमध्ये तिथल्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा घेण्यात आली.

ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षण क्षेत्रातील एक ज्येष्ठ मार्गदर्शक कै. वा. ना. दांडेकर यांची यंदा जन्मशताब्दी होती. ती विशेष उपक्रमांनी साजरी करण्यात आली. एक दूरस्थ व्याख्यानमाला 'शिक्षण व्हावे चैतन्यदायी' या नावाने नऊ सत्रांमध्ये घेण्यात आली. त्यात १२०० शिक्षक सहभागी झाले. शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ४ सत्रे, बी.एड. विद्यार्थी शिक्षकांसाठी १० संस्थांमधल्या ६७५ शिक्षकांसाठी सत्रे घेण्यात आली; आणि सात राज्यांमध्ये जी निबंध स्पर्धा झाली त्यात १४४ शिक्षकांनी भाग घेतला. अशी डॉ. वा. ना. दांडेकर जन्मशताब्दी ही नऊ राज्यांमध्ये १३० शाळांमध्ये जवळ-जवळ २००० शिक्षकांसाठी साजरी केली गेली. अतिशय समाधानकारक असा हा उपक्रम झाला. यासाठीचं अर्थसाहाय्य त्यांच्या दोन कन्यांनी केलेलं आहे.

शैक्षणिक साधन केंद्राने Augmented Reality, Virtual Reality इ. तंत्रज्ञानांचा अवलंब करून आधुनिक शैक्षणिक साधने तयार केली आहेत. त्यांचा विस्तार महाराष्ट्राबरोबरच अन्य राज्यांमध्येही होतो आहे. छात्र प्रबोधन मासिकाद्वारे राज्यभरातील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी होणारे संपर्क अधिक सखोल होत आहेत. गेल्या वर्षी २४ जिल्ह्यांमधील ८८ तालुक्यांमध्ये १८६ शाळांमधील शिक्षक 'प्रबोधन दूत' या योजनेत सहभागी झाले. त्यांच्याद्वारे विशेष शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत.

नेतृत्व संवर्धन केंद्राने प्रशासकीय सेवेच्या पायाभरणी बरोबर संघटनात्मक कार्य आणि सामाजिक सेवा कार्य यात लागणाऱ्या नेतृत्वाच्या प्रशिक्षणाची सुरुवात गेल्या वर्षात केली. पुण्यातील विविध महाविद्यालयांमध्ये या विषयांची जाणीवजागृती करण्यासाठी नामवंत व्यक्तींची सत्रे ठेवण्यात आली. स्पर्धा परीक्षा केंद्र या विभागाने विद्यार्थी संख्या वाढवण्याऐवजी विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक अभिवृत्ती तपासण्यासाठी चाचणी तयार केली. अनेकांना वेळीच अन्य क्षेत्रांकडे वळण्याचा सल्लाही दिला. या पूर्वी केंद्रातून प्रशासकीय सेवेत गेलेल्या अधिकाऱ्यांचे एक नेटवर्क तयार करण्याचे काम गेल्या वर्षात विशेषत्वाने झाले. ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी नव्या अधिकाऱ्यांना मानसिक बळ देण्यासाठी याचा उपयोग होईल.

प्रज्ञा मानस संशोधिकेने चाचणी कामाबरोबरच बाहेरील संस्थांच्या कामाचे मूल्यमापन करण्याची सेवा सुरू केली आहे. चिपळूण जवळील डेरवण येथे श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या रौप्यमहोत्सवी कामाचे मूल्यमापन करून देण्यात आले. समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेवर शिक्षणातून उपाययोजना व्हावी यासाठी पुण्यातील ५६ शाळांमधून सुमारे ८५०० विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली. पोलीस खात्यातील महिला अधिकाऱ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास व त्यांना मार्गदर्शन हा ही एक वेगळा पैलू या विभागातर्फे हाताळला जात आहे. पुणे विद्यापीठाच्या मानसशास्त्रातील विद्यावाचस्पती पदवीच्या अभ्यासासाठी सहा मार्गदर्शक (एक पूर्ण वेळ व पाच सहयोगी) असे आपल्या संशोधिकेशी संलग्न केले. त्यामुळे त्यांचे विद्यार्थी प्रबोधिनीला अपेक्षित अशा विषयांवर संशोधन हाती घेतील, अशी नवी शक्यता तयार झाली.

संस्कृत संस्कृति संशोधिकेने वर्षभरात ५५०० पेक्षा अधिक संस्कार समाजामध्ये केले. त्यात दूरस्थ संस्कारांचाही समावेश आहे. सामाजिक शास्त्रांच्या अध्ययन केंद्रामध्ये वैश्विक मानवी मूल्ये (Universal Human Values) या विषयावर आपले व्याख्याते तयार झाले आहेत. भारतामध्ये G-20 च्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत हा विषय महत्त्वपूर्ण ठरतो आहे.

शिक्षण व संशोधनाबरोबरच ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था करणे, सौर तबकड्या तयार करून त्या आधारे चालणाऱ्या दिव्यांचा प्रसार करणे, ग्रामीण युवकांना तंत्रशिक्षण देणे, ग्रामीण महिलांच्या आरोग्याची काळजी घेऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे, या साठीचे अनेक प्रकल्प विविध जिल्ह्यांत चालू आहेत. त्यातून स्थानिक कार्यकर्त्यांची जडणघडण चांगल्या प्रकारे होते आहे, याचे समाधान वाटते.

पुणे शहरात व अन्य ठिकाणी चालू असलेल्या संवादिनी या चळवळीचा विस्तार अनेक उपक्रमांद्वारे होतो आहे. नागरी वस्त्यांमध्ये स्थानिक युवतींद्वारे विकासाचे अनेक उपक्रम आकार घेत आहेत. युवक आणि युवती विभागाच्या वतीने वरील सर्व कामांसाठी नव्या कार्यकर्त्यांची भर कशी पडेल, याची रचना आकार घेत आहे.

पुण्याबाहेरील अन्य केंद्रांचे संक्षिप्त वृत्त याला जोडूनच जे दिले आहे, त्यावरून एकूण प्रबोधिनीची वाटचाल ''शिक्षणाद्वारे समाज परिवर्तन'' या तिच्या उद्दिष्टाकडे दमदारपणे चालू आहे, असे आनंदाने नमूद करावेसे वाटते. कार्यकर्त्यांच्या या प्रयत्नांना आपणा सर्वांचा हार्दिक पाठिंबा असाच चालू रहावा, अशी विनंती करून हे हितगुज संपवितो.

आपले,

| | |
|---|---|
| **गिरीश श्री. बापट** | **वि. शं./सुभाष देशपांडे** |
| **संचालक** | **कार्यवाह** |

# अंतरंग


| | |
|---|---|
| ✶ **मध्यवर्ती कार्यक्रम** | ०६ |
| ✶ **भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव** | ०८ |
| ✶ **ज्ञान प्रबोधिनीचा तिसरा भवितव्य लेख** | ०९ |
| ✶ **विशेष अभिनंदन** | १० |
| ✶ **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र** | |
| १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला | १२ |
| २. शैक्षणिक उपक्रम संशोधिका | १५ |
| ३. शैक्षणिक साधन केंद्र | १८ |
| ४. छात्र प्रबोधन | २० |
| ५. नेतृत्व संवर्धन केंद्र | २२ |
| ६. स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्र | २४ |
| ७. प्रज्ञा मानस संशोधिका | २७ |
| ८. संस्कृत संस्कृति संशोधिका | ३० |
| ९. सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र | ३१ |
| १०. नैसर्गिक संसाधने विभाग | ३२ |
| ११. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर | ३४ |
| १२. स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण | ३५ |
| १३. संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी) | ३८ |
| १४. जिजामाता दल | ३९ |
| १५. नागरीवस्ती अभ्यासगट | ४० |
| १६. युवक विभाग | ४२ |
| १७. युवती विभाग | ४४ |
| १८. उद्योजकता विकास केंद्र | ४६ |
| ✶ **ज्ञान प्रबोधिनी, अन्य केंद्रे** | |
| १९. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र | ४७ |
| २०. ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र | ५१ |
| २१. ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र | ५३ |
| २२. ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र | ५६ |
| ✶ **विस्तार कार्य** | |
| २३. अंबाजोगाई विस्तार केंद्र | ५७ |
| २४. डोंबिवली विस्तार केंद्र | ५९ |
| २५. महाराष्ट्रातील अन्य विस्तार कार्य | |
| ठाणे स्थायी संपर्क केंद्र व चिपळूण स्थायी संपर्क केंद्र | ६१ |
| बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र | ६२ |
| औंध, पौड संवादिनी विस्तार | ६३ |
| भाईंदर, शिरूर व खेड राजगुरुनगर संवादिनी विस्तार | ६४ |
| युवक विभाग विस्तारकार्य | ६४ |
| २६. महाराष्ट्राबाहेरील विस्तार कार्य | ६५ |
| ✶ **संलग्न संस्था** | |
| २७. कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ | ६६ |
| २८. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फाऊंडेशन (JPPAF) | ६७ |
| २९. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन (JPF), अमेरिका | ६८ |
| ✶ **सन्माननीय देणगीदार व CSR साहचर्य** | ६९ |

### ◈ रूप पालटू व्याख्यानमाला - पुष्प ८वे

प्रबोधिनीचे आद्य संचालक कै. आप्पा पेंडसे स्मृतिप्रीत्यर्थ होणाऱ्या या व्याख्यानमालेत या वर्षी लेफ्टनंट जनरल सुदर्शन श्रीकांत हसबनीस, (निवृत्त) पीव्हीएस्‌एम्‌, एव्हीएस्‌एम्‌, व्हीएम्‌, Ex Deputy Chief of Army Staff (PS) यांच्याशी पत्रकार प्रा. नंदकुमार काकिर्डे यांनी संवाद साधला. या वेळच्या संवादाचा विषय 'स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि भारतीय संघराज्याची संरक्षण-सिद्धता' असा होता. मा. सुदर्शन हसबनीस हे ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या १९७७ च्या तुकडीचे विद्यार्थी आहेत. त्यांच्या घरात सैन्याची पार्श्वभूमी होती. त्याबद्दल आणि त्यांच्या सैन्यातील सेवेतील अनुभव आणि आठवणी या निमित्ताने सगळ्यांना ऐकता आल्या. अनेक गोष्टींची कमतरता असतानाही भारतीय सेना कितीही अवघड परिस्थितीशी सामना करते आणि त्यावर मात करत भारताचे संरक्षण करते असे अनेक महत्त्वाचे मुद्दे त्यांच्या व्याख्यानातून समजले. या व्याख्यानाला प्रत्यक्ष आणि दूरस्थ असे एकूण ४६० सदस्य उपस्थित होते.

### ◈ व्रतपालन व संघटना अभ्यास शिबिर

शिकण्यातील स्वावलंबन वाढवण्यासाठी प्रबोधिनीत विद्याव्रताचा विचार मांडलेला आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताची योजना प्रबोधिनीत सर्व ठिकाणी नियमित राबवली जाते. या व्रताला पुढे-पुढे वाढत्या वयोगटानुसार वीरव्रत, विकासव्रत आणि सेवाव्रत याची जोड असावी अशी कल्पना प्रबोधिनीत मांडलेली आहे. यानुसार कर्तृत्वशक्तीचे स्वावलंबन वाढवण्यासाठी वीरव्रताच्या प्रयोगाला या वर्षी पुणे केंद्र युवक विभागात सुरुवात झाली. त्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन दले चालवणाऱ्या १२६ मार्गदर्शकांपैकी ८० मार्गदर्शकांसाठी नोव्हेंबर महिन्यात या शिबिराचे आयोजन केले होते. एकूण १० संयोजकांनी हे शिबिर घेतले. तीन गटांमध्ये मार्गदर्शकांची विभागणी त्यांचा अनुभव, कामातील गुंतवणूक आणि समज इत्यादी मुद्द्यांच्या आधारे केलेली होती. सध्या प्रतोद किंवा साहाय्यक प्रतोद असलेले आणि पदवीचे शिक्षण संपवून पुढील टप्प्याकडे वाटचाल करणारे युवक अ गटात वीरव्रताचा विचार करत होते. शिबिरादरम्यान केलेल्या विचाराचा या सर्वांना आपल्या आयुष्यातील पुढील निर्णय घेताना, दलाचे नेतृत्व करताना आणि दलावरील युवकांना वीरव्रतात मदत करताना उपयोग व्हावा असा हेतू होता. सध्या दल घेत असलेले, दलांवरील दुसरी फळी म्हणता येतील असे मार्गदर्शक ब गटात होते, आणि नव्यानेच दल घेऊ लागलेले मार्गदर्शक क गटात होते. प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. शरदराव सुंकर, कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे, प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख वाच. अनघाताई लवळेकर व स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या प्रमुख प्रा. सुवर्णाताई गोखले यांनी शिबिरात मार्गदर्शन केले. प्रबोधिनी साहित्याचा चांगला वापर शिबिरात झाला. यानंतर वीरव्रताचा पहिला प्रयोग हा जानेवारी २०२३ पासून सुरू झाला आहे. एकूण ११९ जणांनी यात प्राथमिक सहभाग नोंदवला असून ७३ युवक वीरव्रतासाठी प्राथमिक टप्प्यावरील पूर्वतयारी करत आहेत. युवक संघटनेच्या कामाचा जास्त अनुभव असलेले ३५ जण जास्त मोठी आव्हाने घेऊन व अधिक सखोल विचार करून प्रगत टप्प्यावरील पूर्वतयारी करत आहेत. याशिवाय प्राथमिक टप्प्यावरील वीरव्रताचा विचार करणाऱ्या ७३ जणांना मदत करण्यासाठी प्रगत टप्प्यावरील ३५ पैकी २३ जण त्यांचे व्रतमित्र म्हणून काम करत आहेत.

### ◈ सामाजिक शास्त्रे संशोधन संकुल भूमिपूजन

पुण्यातील बेंद्रे कुटुंबियांनी शुक्रवार पेठेतील पाच हजार चौ. फुटांचा भूखंड १९८९ मध्ये ज्ञान प्रबोधिनीस बक्षीसपत्राद्वारे देणगी दिला आहे. विविध कारणांमुळे या जमिनीचा वापर करण्याचे निश्चित झाले नव्हते. अलीकडच्या काळात सामाजिक शास्त्रांमधील आंतर-विद्याशाखीय संशोधन हाती घेणारे एक केंद्र प्रबोधिनीच्या संशोधन संस्थेत सुरू झाले आहे. अन्य संशोधिकांचे कामही वाढते आहे. या सर्व वाढीव कामासाठी या जागेवर नवीन बांधकाम करण्याचे ठरविण्यात आले. पुणे महानगरपालिकेकडून नकाशे मंजूर करून घेतल्यावर, दि. २९ डिसें. २२ रोजी या जागेचे भूमिपूजन सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्राचे श्री. अमोलदादा फाळके यांच्या हस्ते करण्यात आले. संत्रिकेच्या पुरोहिता सुरेखाताई लिखिते यांनी प्रबोधिनी पद्धतीने ही उपासना सांगितली. श्री. सचिन गाडगीळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या प्रसंगी बेंद्रे कुटुंबातील डॉ. माधवी वैद्य व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. अन्य देणगीदारांपैकी श्री. रामकुमार राठी, श्रीमती आशाताई गोगटे, श्री वसंत व सौ. कुंदाताई पेंढारकर हे ही उपस्थित होते. श्री. शशिकांत सुपनेकर व त्यांच्या कन्या सौ. हसबनीस हे दोघे कार्यक्रमाला येऊ शकले नसले तरी त्यांनी या बांधकामासाठी भरीव देणगी दिली आहे, तिचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला. आर्किटेक्ट श्री. राहुल रावत व श्री. अनंत अभंग यांच्याकडे प्रकल्प व्यवस्थापनाचे सल्लागार म्हणून जबाबदारी दिलेली आहे. तर मे. चंद्राई कन्स्ट्रक्शन यांच्याकडे प्रत्यक्ष बांधकामाचे कंत्राट दिले आहे. त्यांचे प्रतिनिधी देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रबोधिनीचे कार्यकर्ते व अन्य हितचिंतकही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

### ◈ प्रबोधिनीचे हितचिंतक व पदाधिकाऱ्यांचे अभीष्टचिंतन

दि. २३ जाने. २३ रोजी प्रबोधिनीची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष मा. डॉ. रघुनाथजी माशेलकर यांचे त्यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त प्रबोधिनीचे संचालक मा. वाच. गिरीशराव बापट यांनी पुष्पगुच्छ व मातृभूमीची प्रतिमा भेट देऊन अभीष्टचिंतन केले. प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. मोहनराव गुजराथी यांनी उत्स्फूर्तपणे मा. अध्यक्षांना सभेतील सर्व सदस्यांच्या वतीने शुभेच्छा दिल्या. अनेक वर्षे माशेलकर सरांसारखे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व प्रबोधिनीला अध्यक्ष म्हणून लाभलेले आहे, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष डॉ. रविजी पंडित (संस्थापक अध्यक्ष, केपीआयटी) यांचा इंग्लंडमधील कॉव्हेंट्री विद्यापीठातर्फे मानद विद्यावाचस्पती पदवी मिळाल्याबद्दल प्रबोधिनीच्या वतीने याच सभेमध्ये सत्कार करण्यात आला. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील योगदानाबद्दल त्यांना ही पदवी देण्यात आलेली आहे.

### ◈ परिसंवाद : महिला पोलीस ठाणे उपलब्धी व आव्हाने

प्रज्ञा मानस संशोधिका आणि स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या आर्थिक साहाय्याने 'महिला पोलिस ठाणे उपलब्धी आणि आव्हाने' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद झाला. मा. वा. सुधाताई कोठारी (चैतन्य, राजगुरुनगर) आणि मा. प्रवीण दीक्षित (पोलिस महासंचालक, निवृत्त) यांच्या हस्ते या परिसंवादाचे उद्घाटन झाले. पहिल्या सत्रात तीन वक्त्यांनी त्यांनी केलेल्या अभ्यासाची मांडणी केली. संशोधक वाच. सुचरिताताई गद्रे यांनी पुणे व औरंगाबाद येथे प्रत्यक्ष क्षेत्र कार्य करून वीस प्रशासकीय अधिकारी व २२४ पोलीसांच्या मुलाखती घेतल्या आणि त्यातून काढलेले निष्कर्ष मांडले. द्वारकाताई वालगुडे या वेल्हे येथे दक्षता समितीत काम करणाऱ्या प्रबोधिनीच्या सक्रिय कार्यकर्त्या आहेत. त्यांनी समाजातील पीडित महिलांविषयी अनुभवकथन केले. पौड रस्ता संवादिनीच्या कार्यकर्त्या दीपाताई वैरागकर यांनी इंदूर येथील पलासिया महिला पोलीस ठाण्याला प्रत्यक्ष भेट दिली होती, त्याबद्दल सांगितले. दुसऱ्या सत्रात पोलीस दलातील 'महिला अभिमुखता/लिंगभाव संवेदनशीलता' या विषयावर पोलीस निरीक्षक निखिल पिंगळे यांचे ध्वनिमुद्रित भाषण ऐकवले. त्यानंतर मा. प्रवीण दीक्षित यांनी मांडणी केली आणि वा. सुधाताई कोठारी यांनी सत्राचा समारोप केला. 'महिला पोलीस ठाणे - महिला सुरक्षा : कल्पना आणि वास्तव' या तिसऱ्या सत्रात निवृत्त पोलीस महासंचालक मकरंद रानडे, ॲड. असूंता पारधे, ॲड. सुशील अत्रे व सकाळ वृत्त समूहाचे पत्रकार मंगेश कोळपकर यांनी मांडणी केली. चारही वक्ते अनुभवी असल्याने चर्चा खूपच रंगली. चौथ्या सत्रात महिला पोलिस सन्मान आणि व्यथा यावरती मा. प्राजक्ता गायकवाड (पोलीस आयुक्त, हिंगोली) यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाला एकूण १७० जण उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनीने अशा वेगळ्या विषयाला निवडून विचारास चालना दिली, असे अनेकांचे मत ऐकायला मिळाले.

### ◈ आचार्यव्रत संस्कार

मे २२ मध्ये प्रबोधिनीच्या अध्यापकांसाठी आचार्यव्रत शिबिर झाले. त्यात सोलापूर, निगडी व हराळी केंद्रातील अध्यापक सहभागी झाले होते. या शिबिरात आचार्यव्रत संकल्पना, आचार्यकुल व आचार्यव्रत अंगी बाणवणे हे कसे करावे, त्यासाठीच्या मार्गदर्शक गोष्टी तसेच प्रबोधिनीची त्रिवेणी शिक्षणपद्धती, आचार्य कसा असावा असे विषय अध्यापकांनी समजून घेतले. नंतर अध्यापकांनी स्वतः काही संकल्प करून ते पूर्ण करण्यासाठी अभ्यास सुरू केला.

याचा पुढचा टप्पा म्हणून सोलापूर केंद्रात दि. ११ जाने. २३ रोजी व निगडी केंद्रात दि. १८ मार्च २३ रोजी आचार्यव्रत संस्कार झाला. दोन्हीमध्ये मिळून १५ अध्यापकांनी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट यांच्याकडून आचार्यव्रताची दीक्षा घेतली. गीता, वेद, उपनिषदे यातील मंत्रांचे उच्चारण करत, शिक्षक ते आचार्य या प्रवासात महत्त्वाच्या असणाऱ्या गुणांचे चिंतन उपासनेत केले गेले. मा. श्री. केशव शिंदे (संस्थापक, सुयश विद्यालय, सोलापूर) व मा. प्रा. महावीर शास्त्री (प्रमुख, संस्कृत व प्राकृत विभाग, वालचंद महाविद्यालय, सोलापूर) हे प्रमुख अतिथी म्हणून सोलापूर येथील कार्यक्रमात उपस्थित होते. तर निगडी येथे केंद्रप्रमुख प्रा. मनोज देवळेकर व शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे प्रमुख प्रा. प्रशांत दिवेकर उपस्थित होते.

''स्वत:ला घडविण्यासाठी ग्रंथांचे पुन्हा-पुन्हा वाचन करून प्रेरणा घेत राहणे, यापासून ते आपल्याला गुरुतुल्य असणाऱ्यांनी सांगितलेल्या मार्गाने जात, स्वतःच्या आचरणात विकास करत आचार्यव्रत स्वतःमध्ये मुरवले पाहिजे. आपण जिथे विद्यादान करतो ती जागा आपल्या व्यक्तिमत्त्वाने व चैतन्याने भारली पाहिजे.'' असे मा. संचालकांनी सर्व व्रतार्थींना सुचवले. तसेच अन्य अध्यापकांनी देखील अशी आचार्यव्रताची दीक्षा घ्यावी, यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

**वृत्तातील विविध माहिती संदर्भात अधिक तपशील पुढील क्यूआर कोडस् स्कॅन करून पाहता येतील.**

**रूप पालटू व्याख्यान २०२२**

**भवितव्य लेख प्रकाशन कार्यक्रम**

▲▲▲

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

### ◈ मातृभूमिपूजन

''प्रत्येक भारतीयाने आपल्या मातृभूमीची आठवण रोज करावी यासाठी प्रेरणा देणारी, अखंड भारताच्या प्रतिमेचे पूजन करण्याची संधी देणारी, विविध धर्म-संप्रदाय-पंथ यांच्यामध्ये एकता साधण्याचा प्रयत्न करणारी उपासना म्हणजे मातृभूमिपूजन. या उपासनेत केले जाणारे संकल्प हे आपण, आपले कुटुंब, आपला समाज आणि आपला देश यांना सांधणारा दुवा आहेत. हे संकल्प कृतिरूप असल्याने ते करायलाही सोपे आहेत. चला तर मग, आयोजन करूया मातृभूमी पूजन उपासनेचे!!'' असे आवाहन समाजाला करत संस्कृत संस्कृति संशोधिकेतील पुरोहित व सर्व सदस्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभरात किमान ७५ ठिकाणी ज्ञान प्रबोधिनी प्रणीत मातृभूमिपूजन उपासना आयोजन करण्याचा संकल्प केला. समाजात ठिकठिकाणी विविध कुटुंबांमध्ये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये, शिक्षण संस्थांमध्ये, आध्यात्मिक केंद्रांमध्ये ही उपासना संत्रिका सदस्यांच्या पुढाकारातून झाली. विशेष अनुभव म्हणजे शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त श्री श्री माँ आनंदमयी आश्रम, पुणे येथे देखील दि. २६ सप्टें. रोजी हिंदी भाषेत उपासना करण्यात आली. तर दि. २ ऑक्टो. रोजी याच आश्रमात श्री सूक्त पठण आणि जागरण, तसेच गोंधळ गायन सेवा ही संत्रिकेच्या महिला पुरोहितांनी केली. पुरोहिता सदस्यांनी देवीच्या संध्याकाळच्या आरतीच्या वेळी होणाऱ्या धुनुची नृत्यसेवेत सहभाग घेतला.

वर्षभरात झालेल्या १३५ हून अधिक उपासनांची सांगता गुरुवार दि. २६ जाने. २३ रोजी समारंभपूर्वक संपन्न झाली. या सांगता कार्यक्रमात सुमारे २०० सदस्यांनी सहभाग घेतला. ज्या-ज्या ठिकाणी ही उपासना संपन्न झाली त्या-त्या ठिकाणचे सदस्य आवर्जून या कार्यक्रमाला उपस्थित होते. मा. श्री. अनिल नेने आणि मा. सुमेधा चिथडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून सर्वांना संबोधित केले. मातृभूमिपूजन उपक्रमात विशेष सहभाग घेतलेल्या चार सदस्यांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

### ◈ अभ्यासपर्व

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त निगडी केंद्रामध्ये गेल्या ७५ वर्षांमध्ये घडलेल्या देशस्थितीचा अभ्यास वर्षभर करण्यात आला. या अभ्यासाचे संकलन लेख स्वरूपात मांडण्यात आले व या लेखांच्या पुस्तिका तयार करण्यात आल्या. दि. २५ जानेवारी २३ रोजी शिक्षण सहसंचालक वाच. श्रीराम पानझडे व ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट यांच्या हस्ते पर्यावरण, शिक्षण, सामाजिक, तंत्रज्ञान, औद्योगिक, आरोग्य अशा सहा पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. दि. २७ जानेवारी २३ रोजी माजी केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते न्याय, राजकीय, शेती, सांस्कृतिक, संरक्षण या पाच पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. हा प्रकल्प पंतप्रधानांना नक्कीच आवडेल. आपण त्यांना एक पत्र पाठवून याबद्दल माहिती पोहोचवावी, असे उद्‌गार श्री. प्रकाश जावडेकर यांनी आपल्या भाषणात काढले. अभ्यासण्यात आलेल्या विषयांचे सार तक्त्यांच्या स्वरूपात मांडून त्याचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन वाच. श्रीराम पानझडे यांच्या हस्ते दि. २५ जानेवारी २३ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना केलेल्या अभ्यासातून मी पुढे यातील समस्या सोडवेन का? देशकारण करेन का? असा प्रश्न प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते वाच. विवेकराव कुलकर्णींनी उपस्थित केला.

''भारताचा इतिहास केवळ ७५ वर्षांचा नसून तो युधिष्ठिर शकानुसार ५१२५ वर्षांचा आहे. आधुनिक राज्यव्यवस्थेत भारताला अग्रेसर बनवण्यासाठी आपल्याला आपल्या भारताच्या ह्या सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे भारत ७५ अथवा भारत १०० या पलीकडे प्रबोधकांनी भारत ५००० असा विचार केला पाहिजे.'' असे आवाहन मा. संचालकांनी केले. तसेच या अभ्यासातून आयुष्याची सार्थकता सापडण्याचे मोठे ध्येय दिसावे, यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या अभ्यासपर्वात अध्यापक, पालक आणि विद्यार्थी मिळून जवळपास ४५० जणांनी योगदान दिले. वाच. अजितराव कानिटकर आणि प्रा. प्रशांत दिवेकर यांनी वर्षभर अभ्यासासाठी मार्गदर्शन केले.

### ◈ राष्ट्रीय एकात्मता

राष्ट्रीय एकात्मता घडून यावी या उद्देशाने प्रबोधिनीने मणिपुरी विद्यार्थ्यांसाठी सोलापुरात सहनिवास सुरू केला. हे विद्यार्थी शालेय शिक्षणासोबतच कला, क्रीडा अशा विविध विषयांमध्ये सहभाग व प्रशिक्षण घेत आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या विद्यार्थ्यांच्या हस्ते दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी रेल्वे स्टेशन पोलीस चौकी, सोलापूर येथे ध्वजारोहण झाले. पोलिसांच्या मनाला भिडणारा व मुलांना प्रेरणा देणारा असा हा कार्यक्रम झाला.

# ज्ञान प्रबोधिनीचा तिसरा भवितव्य लेख

### ◈ प्रबोधिनीचा साठावा वर्धापनदिन व ज्ञान प्रबोधिनीचा तिसरा भवितव्य लेख

भारतीय मूल्यांवर आधारित शिक्षणपद्धतीतून समाजपरिवर्तन करू इच्छिणारी संस्था व प्रेरणासंपन्न कार्यकर्त्यांची संघटना अशी ज्ञान प्रबोधिनीची ओळख देशविदेशात आहे. गेल्या सहा दशकांमध्ये काही शैक्षणिक प्रयोग यशस्वी होऊन विस्तारले असले, तरी आगामी दशकात वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीचे भान ठेवून कार्याच्या विस्ताराचे नियोजन करावयास हवे, तरच अपेक्षित प्रभाव व परिणाम दिसून येईल. म्हणून भविष्य वेध तंत्राचा वापर कार्यकर्त्यांच्या सहभागातून करायचा ठरविला.

यापूर्वी पहिला भवितव्यलेख शके १९१६ ते १९३५ (सन १९९४-९५ ते २०१३-१४) अशा २० वर्षांसाठी कार्यकर्त्यांच्या सहविचारातून तयार करण्यात आला होता. 'देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणे' असे तेव्हाच्या भवितव्यलेखाचे साध्यसूत्र निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार ग्रामीण भागातील स्त्रियांसाठीचे 'स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)' या विभागाचे बचतगट, आरोग्य, उद्योजकता, नेतृत्वविकसन असे विविध पैलूंचा समावेश असणारे व सव्वाशेहून अधिक गावांमध्ये पोहोचलेले असे भरीव काम उभे राहिले. तसेच पुणे शहरातील वस्त्यांमधून काम करणाऱ्या 'नागरीवस्ती अभ्यासगटा'चे काम उभे राहिले. स्थलांतरित मजुरांच्या बरोबर यावे लागल्याने त्यांच्या मुलांचे शिक्षण सुटून जाण्याच्या प्रश्नावर प्रबोधिनीने साखरशाळेसारखा महाराष्ट्र शासन स्तरावर उचलून धरला गेलेला उपक्रमही या साध्यसूत्राचीच अभिव्यक्ती म्हणावी लागेल.

पहिल्या भवितव्यलेखाच्या मांडणीची वीस वर्षे पुरी होण्याआधीच, दुसऱ्या भवितव्यलेखाच्या मांडणीची आवश्यकता अनेक कार्यकर्त्यांना वाटली. तसेच वीस ऐवजी दहा वर्षांची मांडणी अधिक नेमकेपणाने करता येईल असे वाटले. त्यातून शके १९३४ ते १९४३ (सन २०१२-१३ ते २०२१-२२) या दुसऱ्या भवितव्यलेखाची प्रक्रिया सुरू झाली. प्रत्येक केंद्र व विभाग यांच्यातील सहविचार समित्यांना आपापल्या संदर्भातील बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेऊन भविष्यचित्र मांडण्यास सांगण्यात आले. ठिकठिकाणच्या मनुष्यबळाचे शक्तिस्थान व मर्मस्थान या अंगाने विश्लेषण करण्यासाठी व्यवस्थापन सल्लागारांची मदत घेण्यात आली आणि या मंथनातून 'नेतृत्वगुण विकसन करणारी ज्ञान प्रबोधिनीची मनुष्यघडणीची प्रक्रिया शालेय वयोगटाच्या पुढे विस्तारित करणे' हे साध्यसूत्र निश्चित करण्यात आले. त्यानुसार नेतृत्व संवर्धन केंद्र सुरू होऊन त्यात सुमारे ७०० पदवीपूर्व युवक-युवतींनी एक किंवा दोन वर्षांचे प्रशिक्षण घेतले.

तिसऱ्या भवितव्यलेखासाठी अनुभवी व तरुण अशा सात कार्यकर्त्यांची सुकाणू समिती गठित केली गेली. सुकाणू समितीने विविध केंद्रांवरील सुमारे ५० हून अधिक विभागांतील दोनशेपेक्षा जास्त कार्यकर्त्यांच्या मदतीने भवितव्यलेख प्रत्यक्षात लिहवून घेतला. सर्व कार्यदिशा, केंद्रे आणि विभागांच्या भवितव्यलेखातून ३५० हून जास्त उद्दिष्टे लिखित स्वरूपात आली. या सर्वांचा अभ्यास करत ज्ञान प्रबोधिनीने संघटना म्हणून अधिक व्यापक आणि विस्तारत जायला हवे असे जाणवत होते. ज्ञान प्रबोधिनीचा 'मध्यवर्ती भवितव्यलेख' तयार करण्यासाठी एक स्वतंत्र समिती गठित करण्यात आली होती. प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना मानवेल अशी भवितव्यलेखनाची पद्धत यात वापरली गेली आहे. तिच्यामध्ये Scenario Writing, Logframe Analysis, Results Based Management अशा अनेक तंत्रांचा अभ्यास करून एकत्रित विचार केला गेला आहे. उद्दिष्टे आणि त्यांचे अपेक्षित गुणात्मक किंवा संख्यात्मक दर्शकही अनेक विभागांनी निश्चित केले आहेत. या सर्व प्रक्रियेचे प्रशिक्षण व विभागशः लेखन गेले वर्षभर चालू होते. आपल्या कामाकडे चिकित्सक आणि तरीही विधायक - सकारात्मक दृष्टीने पाहायचे असते, असे अनेक कार्यकर्त्यांच्या गेल्या वर्षभरात लक्षात आले आहे.

**'येत्या दहा वर्षांत महाराष्ट्राच्या सहा प्रादेशिक विभागांमध्ये ज्ञान प्रबोधिनीची मनुष्यघडणीची केंद्रे आस्थापनेसह सुस्थिर करणे आणि भारताच्या सहा राज्यांमध्ये विस्तार केंद्रे स्थापन करणे' हे या भवितव्य लेखाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या या विस्तारासाठी समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव ही मार्गदर्शक तत्त्वे देखील व्यक्त झाली आहेत.**

दि. ८ ऑगस्ट २०२२ रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या साठाव्या वर्धापनदिनानिमित्त सौर शके १९४४-५३ या कालावधी साठीच्या ज्ञान प्रबोधिनीच्या भवितव्य लेखाच्या दोन पुस्तिकांचे प्रकाशन एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी प्रास्ताविकात दोन्ही पुस्तिकांचा परिचय करून दिला. त्यानंतर पुढील भवितव्य लेखाच्या काळात राष्ट्रीय एकात्मता, प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षण, संशोधन आणि स्त्री-शक्ती प्रबोधन या कार्यदिशांनी मांडलेल्या नवीन उपक्रमांबद्दल निवेदने झाली. यानंतर २४ पानी आणि ९६ पानी अशा दोन पुस्तिकांचे प्रकाशन झाले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ज्ञान प्रबोधिनी ही वैशिष्ट्यपूर्ण संघटना आहे, की जिथे पुढील दहा वर्षांत काय काम करायचे आहे हे मांडता येते याचे कौतुक वाटते असे आवर्जून सांगितले. यासाठी प्रत्यक्ष व दूरस्थ पद्धतीने मिळून सुमारे २०० जण उपस्थित होते.

▲▲▲

# विशेष अभिनंदन

१. अटल धडपडालय बौद्धिक संपदा कार्यालय (IP office) कडून दरवर्षी विविध प्रवर्गात बौद्धिक संपदा नोंदणी, वाणिज्यीकरण व अंमलबजावणी या क्षेत्रात काम करणाऱ्यांना 'राष्ट्रीय बौद्धिक संपदा' पुरस्कार दिला जातो. यावर्षी ११ प्रवर्गांसहित पहिल्यांदाच चार विशेष उल्लेखनीय वर्गात हा पुरस्कार देण्यात आला. यात विद्यार्थ्यांमध्ये STEM या विषयाची गोडी निर्माण करणे, नवोन्मेषी विचाराला प्रोत्साहन देणाऱ्या अटल टिंकरिंग प्रयोगशाळा यासाठीचा उल्लेखनीय पुरस्कार (citation award) ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाला देण्यात आला. दिल्ली येथे भारताचे उद्योग व वाणिज्य मंत्री श्री. पियुष गोयल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

२. छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०२१ या अंकाला छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत बालकुमार विभागातील द्वितीय क्रमांकाचा 'छंदश्री पुरस्कार' मिळाला.

३. समतोल दिवाळी अंक २०२१ या अंकाला मराठबोली राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत स्त्री विभागातील सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार मिळाला.

४. वाच. नलिनी गुजराथी लिखित 'पंख फुलवूया प्रतिभेचे' या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा शैक्षणिक विभागात उत्कृष्ट पुस्तक म्हणून पुरस्कार जाहीर झाला, तर उत्कृष्ट कथासंग्रह म्हणून श्रीमती सुहासिनी देशपांडे लिखित 'किमयागार' व उत्कृष्ट ललितलेख संग्रह म्हणून श्री. मल्हार अरणकल्ले लिखित 'अंधाराचे डोळे' या पुस्तकांना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ही पुस्तके ज्ञान प्रबोधिनी प्रकाशनाची असून छात्र प्रबोधनद्वारा निर्मित आहेत.

५. दिल्लीस्थित Simply Suparnaa ® Media Network या संस्थेच्या 'सबेरा' पुरस्कार अंतर्गत २०२२ मध्ये प्रज्ञा मानस संशोधिकेच्या 'संयम' उपक्रमाला संकल्पना मांडणी व विस्तार यासाठी महत्त्वाचा पुरस्कार मिळाला.

६. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या पर्यवेक्षिका मुकुलिकाताई थत्ते यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी मिळाली. त्यांचा संशोधन विषय Development of an Enhancement Programme on Higher Order Thinking Skills based on Futurological Techniques for Intellectually Gifted, School-going Adolescents हा होता.

७. नेतृत्व संवर्धन केंद्राचे मुख्य समन्वयक सौगंधदादा देशमुख यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत नेतृत्वशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी मिळाली. An assessment of effectiveness of Leadership Development Programme conducted for youth by Jnana Prabodhini Leadership Development Centre in Pune हा त्यांचा प्रबंधाचा विषय होता.

८. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य रणजितसिंहजी भोगल यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत मानसशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी मिळाली. Comparative Effect of Shavasana and Yoga Meditation on Bio-Phase Angle, RMR and Emotional Intelligence in Students of Yoga College हा त्यांचा प्रबंधाचा विषय होता.

९. प्रज्ञा मानस संशोधिकेच्या शैक्षणिक उपविभाग प्रमुख धनश्रीताई सोवनी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत मानसशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी मिळाली. त्यांचा विषय Study of Psychological well-being of intellectually above average college students in relation to family environment and classroom environment हा होता.

१०. जेपीएफच्या संघटन विभागाचे प्रमुख वाच. आकाश चौकसे यांना Nurturing concern for others in adolescents : A study of Empathy, Compassion and Prosocial Behavior या प्रबंधासाठी अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाकडून विद्यावाचस्पती पदवी मिळाली.

११. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे प्रमुख प्रा. प्रशांत दिवेकर यांची नवोदय विद्यालय समितीचे सदस्य म्हणून शिक्षा मंत्रालयाद्वारा निवड करण्यात आली. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

१२. प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या मा. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांना नाशिक येथे पद्मश्री अनुताई वाघ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१३. बापट परिवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे झालेल्या दहाव्या कुलसंमेलनात ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. वाच. गिरीशराव बापट यांना 'सेनापती बापट कुलरत्न पुरस्कार' या पुरस्काराने सन्मानित केले. शाल, श्रीफळ व मानपत्र अंकित केलेले स्मृतिचिन्ह देऊन हा सन्मान करण्यात आला.

१४. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशासकीय क्षेत्रातील नेतृत्व विकसनाच्या कामातील अग्रदूत वाच. सविताताई कुलकर्णी यांना मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे 'कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार' देण्यात आला.

१५. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ, यांनी स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या प्रा. सुवर्णाताई गोखले यांना 'एक्सलंस अवॉर्ड' देऊन सन्मानित केले.

१६. जागतिक महिला दिवसानिमित्त संस्कृत संस्कृति संशोधिकेच्या वाच. मनीषा शेटे यांचा 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय' यांच्यातर्फे पौरोहित्यामधील कला, गुण व शक्तीचा गौरव म्हणून स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

१७. पुण्यातील फेरोसिमेंट सोसायटीतर्फे नैसर्गिक संसाधने विभागातील अनिल पालकर यांना 'व्ही. डी. जोशी फेरोसिमेंट उत्कृष्ट कारागिर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**स्पर्धा परीक्षा केंद्र विद्यार्थी अधिकारी - राष्ट्रीय पुरस्कार २०२२**

१. श्री. महेश भागवत (ADGP, Comm. of Police राचाकोंडा, तेलंगणा) - राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक.

२. श्री. ऋषिकेश खिलारी (पोलीस अधीक्षक-मलकनगिरी जिल्हा, ओडीसा) - नक्षलविरोधी कामासाठी राष्ट्रपती शौर्य पुरस्कार.

३. श्रीमती सायली धुरत (SP, नवाडा, बिहार) - Union Home Minister Medal for Excellence in Investigation.

४. श्री. धनंजय घनवट (IPS, Asst. IGP, आसाम) - Chief Minister's Police Medal.

५. श्री. नीलकंठ आव्हाड (IAS, चंदीगड, पंजाब) - Best Performance Co-operative bank for Punjab state Co-operative bank.

▲▲▲

# सन २०२२-२३ निर्णय

## इ. 10वी शालान्त परीक्षा निर्णय

**◈ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**

| | | |
|---|---|---|
| १. | समृद्धी कानडे | ९८.२०% |
| २. | आर्य गुजर | ९८.००% |
| ३. | राज निंबाळकर, ज्ञानेश्वरी कामठे | ९७.८०% |

**◈ ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**

| | | |
|---|---|---|
| १. | हर्षवर्धन देशपांडे | ९६.८०% |
| २. | श्रेया बचुटे | ९५.६९% |
| ३. | मनश्री दीक्षित | ९५.२०% |

**◈ ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी**

| | | |
|---|---|---|
| १. | चैतन्य पटवारी | ९५.००% |
| २. | स्वराली लबडे | ९३.६०% |
| ३. | सक्षम बनसोडे | ९२.००% |

**◈ ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राप्ती हवलदार, ज्ञानेश्वर मुंडे | ९१.२०% |
| २. | सानिका दैन, अदिती शितोळे | ८८.४०% |
| ३. | राज बाबर | ८७.८०% |

**◈ ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**

**माध्यमिक मराठी**

| | | |
|---|---|---|
| १. | अथिला पाटील | ९८.४०% |
| २. | सृजा खातू | ९८.२०% |
| ३. | आर्या कुलकर्णी | ९७.८०% |

**माध्यमिक इंग्रजी**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रियंका भाटे | ९९.००% |
| २. | अदिती भांडारकर, जिज्ञासा चौधरी | ९८.६०% |

**क्रीडाकुल**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राची अमृतकर | ९२.८०% |
| २. | दीक्षा म्हस्के | ९०.८०% |
| ३. | भक्ती घोडेकर | ९०.००% |

**गुरुकुल**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रिया पर्वतीकर | ९७.४०% |
| २. | आर्या पर्वतीकर | ९३.००% |
| ३. | आभा बापट | ९१.४०% |

▲▲▲

**◈ ग्राम प्रबोधिनी उच्च माध्यमिक विद्यालय, साळुंब्रे (इ. १२वी वाणिज्य शाखा निर्णय)**

१. गुड्डी अन्सारी - ७५.५०%  २. अनिशा जाधव - ६८.६७%  ३. सुप्रिया सावंत - ६८.३३%

▲▲▲

# १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

## ◈ शैक्षणिक प्रयोग

### १. गतिमान प्रभुत्व अध्ययन-अध्यापन पद्धती

या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमाला या वर्षी अकरा वर्षे पूर्ण झाली. इ. ५वी ते ८वीसाठी इंग्रजी व गणित या विषयांसाठी आपापल्या क्षमतेनुसार व गतीनुसार पुढचे-पुढचे अध्ययन करीत वरच्या स्तरात जाण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत आहे. इंग्रजी व गणित या महत्त्वाच्या विषयांचे पायाभूत ज्ञान दृढ होण्यास मदत होत आहे.

### २. विशेष उद्दिष्ट गट

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, देशप्रश्नांची ओळख व्हावी, एखादा प्रश्न सोडविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या दीर्घकालीन धडपडीची जाणीव व्हावी, यासाठी अनुभव शिक्षण देणारा उपक्रम म्हणजे विशेष उद्दिष्ट गट! थेट प्रश्नाला भिडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सहवासात राहून विद्यार्थी एखाद्या क्षेत्रातला एक प्रश्न निवडून त्यावर वर्षभर अभ्यास करतात. या वर्षी पुढील गटांमध्ये विद्यार्थी सहभागी झाले.

| विषय | मार्गदर्शक |
|---|---|
| सामाजिक उद्योजकता | अजितराव कानिटकर |
| ऊर्जा | संतोष गोंधळेकर |
| कायदा व घटना (लोकशाही शिक्षण) | श्रीनिवासदादा देसाई |
| राष्ट्रीय एकात्मता | आशुतोषदादा बारमुख, प्रज्ञाताई अक्कलकोटकर |
| ग्राम विकसन | सुनिताताई गायकवाड |
| अर्थशास्त्र | अनुपदादा गुळाणीकर, सिद्धाताई खताळ, वेदांगीताई पटवर्धन |

### ३. प्रकल्पातून अध्ययन

या वर्षी इ. ५वी ते इ. १०वी पर्यंतच्या प्रकल्पांची काठिण्यपातळी व जटिलता क्रमाने वाढत जाईल अशी रचना केलेली होती.

**प्रकल्प प्रदर्शन :** दि. २८ जानेवारी रोजी इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्या म्हणून वाच. धनश्री सोवनी यांना आमंत्रित करण्यात आले होते. धनश्रीताईंनी प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले व उत्तम प्रकल्प करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन त्यांचे कौतुक केले.

**प्रकल्प शिबिर :** पुढील वर्षीच्या प्रकल्पांची तयारी म्हणून दि. ५ ते २२ एप्रिल इ. ८वी ते १०वीच्या वर्गांसाठी प्रकल्प शिबिर घेण्यात आले. प्रतिभाशाली लेखन, संशोधनात्मक प्रकल्प व भविष्यवेध शास्त्र प्रकल्प यातील संकल्पना स्पष्ट करणे, प्रकल्पाच्या पद्धती व प्रक्रिया समजावून घेणे, प्रकल्प विषय निश्चित करणे, आवश्यक कौशल्यांची ओळख व सराव तसेच छोटे प्रकल्प करून बघणे यांचा समावेश या शिबिरात होता.

### ४. अभिव्यक्ती विकसन

आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे अभिव्यक्ती हे महत्त्वाचे माध्यम मानले गेले आहे. मुलांनी वर्षभर आपल्या आवडत्या अभिव्यक्तीचे मार्गदर्शन तासिका, व्याख्याने, भेटी, प्रात्यक्षिके, शिबिरे या माध्यमांतून घेऊन आपली कौशल्ये वाढविण्याचे प्रयत्न केले. गायन, वादन-पेटी, तबला, नृत्य, लेखन, वक्तृत्व, नाट्य, चित्रकला व शिल्पकला या अभिव्यक्ती माध्यमांवर मुलांनी काम केले.

**अभिव्यक्ती-प्रात्यक्षिक :** दि. २५ एप्रिल रोजी मुलांच्या गटाचे व दि. २६ एप्रिल रोजी मुलींच्या गटाचे अभिव्यक्ती प्रात्यक्षिक अण्णाभाऊ साठे सभागृहात झाले. मुलांकडे ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी व माजी मुख्य आयकर आयुक्त श्री. राजीव रानडे आणि मुलींकडे ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी व एम.आय.टी ललित कला विभागाच्या प्रमुख श्रीमती श्रुतीताई निगुडकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दोन्ही पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कला अभिव्यक्तीचे रसग्रहण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## ◈ विशेष उपक्रम

### १. विद्याव्रत संस्कार

विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा प्रबोधिनीतील एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार आहे.

**इ. ९वी साठी :** इ. ९वी मुलींचा विद्याव्रत संस्कार दि. २० नोव्हें. २२ आणि इ. ९वी मुलांचा दि. २१ नोव्हें. २२ रोजी झाला. मुलींच्या विद्याव्रत संस्कारासाठी ज्येष्ठ संस्कृत भाषाभ्यासक मा. सुचेताताई परांजपे प्रमुख पाहुण्या म्हणून तर मुलांच्या समारंभासाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि संत चरित्रांचे अभ्यासक मा. अभय टिळक प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. इ. ९वीसाठी वर्षभरात झालेली व्याख्याने -

| इ. ९वी विषय | वक्ते |
|---|---|
| अनुभवकथन | मा. बागेश्रीताई पोंक्षे |
| सामाजिक विकसन | वाच. मुकुलिकाताई थत्ते |
| विद्याव्रत पोथीचा अर्थ | प्रा. अमृताताई जोशी |
| आत्मगुणांचे विकसन | मा. संचालक वाच. गिरीशराव बापट |
| राष्ट्रअर्चना | मा. प्रशांतराव दिवेकर |

**इ. ८वी साठी :** या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताची ओळख व्हावी या दृष्टीने विद्याव्रत व्याख्यानमालेची सुरुवात झाली. त्यात विविध

मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दि. २७ फेब्रु. ते १ मार्च या कालावधीत ८वी मुलांचे; तर दि. १ ते ३ मार्च या कालावधीत ८वी मुलींचे विद्याव्रत संस्काराच्या पूर्वतयारीचे शिबिर सज्जनगड येथे झाले. दि. ११ मार्च रोजी मुलांचा विद्याव्रत संस्कार झाला. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच दि. १२ मार्च रोजी मुलींचा विद्याव्रत संस्कार साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री संगीता बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या सर्व प्रक्रियेत इ. ८वीसाठी विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

| विषय | वक्ते |
|---|---|
| प्रास्ताविक | प्रा. अश्विनीताई जोशी |
| शारीरिक विकसन | मा. प्रांजलदादा अक्कलकोटकर,<br>प्रा. प्रज्ञाताई अक्कलकोटकर |
| आहारशास्त्र | वै. प्रयाग सेठिया |
| व्यायामशास्त्र | वै. मंदार अक्कलकोटकर |
| मानसिक विकसन | वाच. अनघाताई लवळेकर |
| भावनिक विकसन | मा. मेघनाताई गोखले |
| बौद्धिक विकसन | प्रा. संस्कृतीताई बापट |
| सामाजिक विकसन | वाच. मुकुलिकाताई थत्ते |
| राष्ट्रअर्चना | मा. हृषीकेशदादा कुलकर्णी |

**२. वर्गश: संचालक भेट**

वर्षभर मा. संचालकांनी प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांशी वर्गशः किमान दोनदा प्रबोधिनीच्या कार्याची, तत्त्वज्ञानाची, कार्यपद्धतीची सखोल ओळख व परिस्थिती ज्ञान अशा विषयांवर संवाद साधला.

### ◈ बौद्धिक प्रगल्भता

**१. विशेष व्याख्याने**

या वर्षी पाठ्यविषयांशी निगडित आणि काही अन्य विषयांवरील व्याख्यानांची योजना विद्यार्थ्यांसाठी केलेली होती. ब्रिगेडिअर अनुप बरबरे, सौ. नीलिमाताई रास्ते, डॉ. सिद्धार्थ धोमकर, डॉ. अजित वर्तक, डॉ. इंद्रनील कसमळकर, श्री. गजानन पटवर्धन, श्री. संघर्ष बोरसे, श्री. जी. आर. दिलीपकुमार, श्री. राहुल जाधव (RBI बेलापूर), प्रा. शुभांगी शिंदे अशा मान्यवरांची व्याख्याने यामध्ये झाली.

**२. विशेष वर्ग**

राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या इ. ५वी आणि ८वी शिष्यवृत्ती परीक्षा, होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा, महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा यासाठीचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच इ. ९वीतून १०वीमध्ये जाताना सरासरी ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग घेण्यात आले.

**३. अभ्यास शिबिरे**

इ. १०वीसाठी जानेवारीमध्ये अभ्यास शिबिर घेण्यात आले.

### ◈ भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव प्रशालेत वेगवेगळ्या उपक्रमांतून साजरा करण्यात आला. भारतीय राष्ट्रध्वजाचा इतिहास, राष्ट्रध्वजातील रंग आणि प्रतीके यांचा अर्थ, राष्ट्रध्वज वापराचे नियम आणि 'हर घर तिरंगा' या मोहिमेबद्दल प्रशालेच्या सर्व विद्यार्थ्यांसमोर प्राग्रणींनी सादरीकरण केले व माहिती दिली. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गांच्या अग्रणींच्या मार्गदर्शनाखाली भारतीय सैनिकांसाठी राख्या व शुभेच्छापत्रे तयार केली. साधारणतः ४०० राख्या आणि ४०० शुभेच्छापत्रे लडाखमधील जवानांपर्यंत पालकांमार्फत पोहोचवण्यात आली.

यामध्ये विविध विषयांच्या सराव प्रश्नपत्रिका सोडवणे, गटचर्चा, स्वयंअध्ययनाची सत्रे इ. झाले.

**४. विशेष अभिरुची गट**

विद्यार्थ्यांच्या विशेष आवडींना प्रेरणा देणे व त्याद्वारे सर्वंकष ज्ञान वाढविणे या उद्देशाने, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक कामात उत्तमता गाठता यावी यासाठी विशेष अभिरुची गट तयार केले जातात. या वर्षी जर्मन व फ्रेंच भाषा, कॅन्व्हास पेंटिग, धडपड प्रयोगशाळा, कृत्रिम बुद्धिमत्ता, खगोलशास्त्र, बुद्धिबळ, जिम्नॅस्टिक अशा विषयांचे विशेष अभिरुची गट चालवले गेले.

**५. भाषासमृद्धी प्रकल्प**

मातृभाषा समृद्ध होणे, भाषिक कौशल्यांचा विकास होणे या उद्दिष्टाने इ.५वीसाठी गेली दोन वर्षे भाषासमृद्धी हा उपक्रम राबवत आहोत. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याने मातृभाषा मराठी जाणीवपूर्वक समृद्ध करण्याची, सुधारण्याची गरज लक्षात येत आहे. म्हणून इ. ५वी मुला-मुलींच्या वर्गांवर जून ते डिसें. या कालावधीत मराठी भाषेच्या जास्तीच्या तासिका घेण्यात आल्या.

### ◈ सामाजिक जाणीव

**१. नागरीवस्ती गट उपक्रम**

या वर्षासाठी उपक्रमाची जबाबदारी सचिनदादा ओव्हाळ यांची होती. एकूण ३२ मुलांनी यामध्ये नियमित सहभाग घेतला. नागरीवस्ती भेटी व काही कामाचा अनुभव विद्यार्थ्यांनी या उपक्रमात घेतला.

**२. सहाध्याय दिन**

सहाध्याय दिनाच्या निमित्ताने या वर्षी राजा दिनकर केळकर संग्रहालय, कार्ले-भाजे लेणी, गुरुद्वारा, आयसर, व सायन्स सेंटर अशा विविध ठिकाणी वर्गांच्या भेटी झाल्या. वेल्हे-पानशेत परिसरातील शाळांमधे मुलांनी शिकवले.

**३. आषाढी एकादशी - भजन व वारी**

दि. १० जुलै रोजी आषाढी एकादशीच्या निमित्ताने प्रशालेत

सामूहिक भजन झाले. इ. ८वी ते १०वीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पुणे केंद्रातील अन्य विभागांतील प्रौढ सदस्य, युवक, युवती यांच्यासह सार्थ भजन अनुभवले. तत्पूर्वी इ. ५वी ते इ. १०वीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी वेगवेगळ्या टप्प्यांवर वारीत सहभागी झाले.

**४. स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन**

दि. १५ ऑगस्ट रोजी मा. संचालकांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. इ. आठवी ते दहावी गटाकडे 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी मातृभूमी पूजन' या विषयावर बोलण्याकरिता वाच. सौगंधदादा देशमुख आले होते. इ. पाचवी ते सातवीच्या गटांमध्ये वर्गश: वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. दि. २६ जानेवारी रोजी मा. संचालकांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. इ. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी Indians by birth, Indians by choice या विषयावर शुभंकरदादा केळकर यांनी व्याख्यान दिले. इ. पाचवी ते सातवीच्या गटासमोर लक्ष्य फौंडेशनच्या अश्विनीताई पळणीटकर यांनी 'ऋणानुबंध सैनिकांशी - कारगिल एक शौर्यगाथा' या विषयावर दृक्-श्राव्य माध्यमातून सादरीकरण केले.

### ◈ मानसिक समृद्धी

**१. विद्यारंभ उपासना**

इ. ५वीची विद्यारंभ उपासना दि. २५ जून रोजी प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख वा. अनघा लवळेकर यांच्या उपस्थितीत झाली.

**२. वर्षारंभ उपासना**

दि. १८ जून २२ रोजी इ. नववी व दहावीची वर्षारंभ उपासना झाली. प्रशालेचे माजी विद्यार्थी व विकासमित्र प्रकल्पाचे समन्वयक अमरदादा परांजपे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याच दिवशी इ. सहावी ते आठवीच्या वर्गांची वर्षारंभ उपासना झाली. युवक कार्यकर्ते अखिलेशदादा कसबेकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**३. साप्ताहिक उपासना व चिंतन**

साप्ताहिक उपासनेत दर शनिवारी लहान गटात शक्तिमंत्र व शिवमंत्राची उपासना झाली. मोठ्या गटात शक्तिमंत्र, विरजामंत्र व गायत्रीमंत्राची उपासना झाली. उपासनेनंतर विविध वक्त्यांनी आपले विचार मुलांसमोर मांडले.

### ◈ शारीरिक कौशल्य

स्वत:च्या शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी व गटातील कामाचा अनुभव घेण्यासाठी वर्षभर नियमितपणे दररोज सायंकाळी युवक व युवती विभागातर्फे विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी दले भरविण्यात आली. दलावर लंगडी, खो-खो, कबड्डी, डॉजबॉल, टेन पासेस, व्हॉलीबॉल, फुटबॉल, फुट क्रिकेट, थ्रो-बॉल, रस्सीखेच, पोहणे व अन्य छोट्या गटात खेळण्याचे खेळ घेण्यात आले. याबरोबरच अथर्वशीर्ष पठण, गणेशोत्सवातील मिरवणूक व प्रात्यक्षिके, विक्री सप्ताह, हिवाळी क्रीडा शिबिर, तंबू शिबिर, गिरीभ्रमण सहली, क्रीडा प्रात्यक्षिके इ. उपक्रम देखील वर्षभरात घेण्यात आले.

### ◈ नेतृत्वगुण विकसन

प्रशालेमध्ये नेतृत्वगुण विकसनासाठी विविध उपक्रम योजले जातात. 'अग्रणी योजना' हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. इ. दहावीमध्ये विविध प्रकारे प्रत्यक्ष नेतृत्व करण्याचा अनुभव अग्रणी घेतात. अग्रणी तासिका, कौशल्य प्रशिक्षण, सरस्वतीपूजन कार्यक्रम, गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमांचे आयोजन इ. कार्यक्रमांमधून नेतृत्वगुण विकसनासाठीचे प्रशिक्षण-अनुभव या गटाला देण्याचा प्रयत्न या वर्षी करण्यात आला.

### ◈ अध्यापक प्रशिक्षण

अध्यापकांसाठी वर्षभर विविध प्रकारच्या प्रशिक्षणांची योजना केली होती. त्यात नवीन शैक्षणिक धोरण, प्रशालेतील नवीन प्रकल्प पद्धती, दैनंदिन जीवनातील त्याचे स्थान व महत्त्व, प्रकल्प वृत्ती/दृष्टिकोन घडवण्याची गरज, क्षमताधिष्ठित शिक्षणक्रम (CBE), विषयश: क्षमता नक्की करणे, काही समान क्षमता, विषयानुसार त्याचे बदलते स्वरूप, विद्यार्थी केंद्रित अध्ययन-अध्यापन पद्धती, स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा मांडणी, प्रशाला भवितव्य लेख मांडणी व चर्चा, भवितव्य लेखात मांडलेल्या उद्दिष्टांच्या कार्यवाहीसाठी गट, बस्तर भागातील काम-अनुभवकथन, डिजिटल वेलनेस, नेतृत्व, अनुभवाधिष्ठित अध्ययन, सर्वंकष मूल्यमापन (CCE) प्रश्नावली तयार करणे असे विषय घेण्यात आले. दर शुक्रवारी विभागाच्या सहविचार समितीच्या बैठकी झाल्या. या बैठकांमधून साप्ताहिक/पाक्षिक/दैनंदिन नियोजन, परीक्षा, अभिव्यक्ती शिबिर, वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम, इयत्तानिहाय धोरणे इ. संबंधातले निर्णय झाले. महिन्यातून एकदा मा. संचालकांबरोबर देखील बैठक झाली.

### ◈ भेटीगाठी

१. दिल्लीच्या शिक्षण संचालनालयातर्फे निवडक २६ अधिमित्र-शिक्षकांनी दि. ३० जाने. २३ रोजी प्रशालेस भेट दिली.
२. विख्यात शास्त्रज्ञ व ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष मा. डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी दि. २४ जाने. २०२३ रोजी इ. ८वी-९वीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रशालेतील प्रकल्पपद्धती दर्शविणारे प्रकल्प प्रदर्शन देखील त्यांनी पाहिले.
३. तामिळनाडूमधील ईशा फाऊंडेशनची 'ईशा होम स्कूल' ही शाळा व तिथे चालणारे शैक्षणिक प्रयोग पाहणे व समजून घेणे याकरिता प्राचार्य वाच. मिलिंदराव नाईक व ह्षिकेशदादा कुलकर्णी यांनी ईशा फाऊंडेशनला भेट दिली.
४. एन्.सी.ई.आर.टी., दिल्ली आयोजित कार्यशाळेत 'अनुभवाधारित शिक्षण पद्धती' या विषयावर नमुना उपक्रम सुचवणे व त्यांचे लेखन करण्यासाठी संस्कृतीताई बापट, वर्षाताई पुराणिक आणि ह्षिकेशदादा कुलकर्णी दिल्लीला जाऊन आले.
५. सी. बी. एस्. इ. तर्फे आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये प्राचार्य वाच. मिलिंदराव नाईक आणि प्रा. प्रणव पुजारी यांनी सहभाग घेतला.

▲▲▲

# २. शैक्षणिक उपक्रम
# संशोधिका

**बुद्धिमत्ता संवर्धन केंद्राच्या** माध्यमातून शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी औपचारिक आणि अनौपचारिक रचनेमध्ये व्यक्तिमत्त्व विकसन, कौशल्य प्रशिक्षण, संकल्पना अध्ययन यासाठीचे वेगवेगळे प्रकल्प राबविले जातात.

| प्रकल्प व भौगोलिक कार्यक्षेत्र | ठळक उपक्रम | शाळा किंवा केंद्र | लाभार्थी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| छोटे सायंटिस्ट्स् - ६ राज्ये | विज्ञान कौशल्य आणि प्रयोग यावर तासिका, शिबिरे, समस्या-परिहार स्पर्धा | ७८१ | ६३,६७० |
| विकासमित्र - वेल्हे तालुका | साप्ताहिक विकासिका, स्पर्धा, निवडक विद्यार्थ्यांसाठी मासिक कार्यशाळा | ४९ | २,१०० |
| अनुभव शाळा - पुणे शहरातील वस्त्या | दैनंदिन तासिका, विविध स्पर्धा, पूरक आहार, सण-उत्सव साजरे करणे, पालक भेटी | ५ केंद्रे | १८० |
| प्रज्ञाविकास - पुणे शहरातील वस्त्या | साप्ताहिक सत्र, व्यक्तिमत्त्व विकसन तासिका, जीवन कौशल्य | ५ केंद्रे | १८९ |
| प्रज्ञाविकास - रोहा | अभ्यास कौशल्य सत्रे | १३ | १,३०० |
| ज्ञानसेतू - ८ राज्ये | अभ्यास दौरे, कार्यशाळा | १०८ | ८,७०२ |
| अन्य शिबिरे - पुणे | विज्ञान प्रयोग, त्रिमिती, स्वयं अध्ययन | - | १६५ |
| एकूण | | | ७६,३०६ |

### ◈ छोटे सायंटिस्ट्स्

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, विज्ञानाची गोडी लागावी तसेच विज्ञान संकल्पना सोप्या कृतींच्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने हा प्रकल्प गेले एक दशकापासून KPIT कंपनीच्या संयुक्त विद्यमाने सुरू आहे. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, आसाम, राजस्थान, झारखंड, नागालँड अशा अन्य राज्यांमध्ये सुद्धा प्रत्यक्ष जाऊन तासिका घेतल्या गेल्या.

इ. ८वी आणि ९वी साठी वेगवेगळ्या प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञान संकल्पना अधिकाधिक चांगल्या समजणे असे प्रकल्पाचे यापूर्वीचे स्वरूप होते. या वर्षी त्याला जोडून पूर्व माध्यमिक गटासाठी (इयत्ता ५वी ते ७वी) विज्ञान शिकण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसन अशी भर घातली गेली. निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य, परिसर अभ्यास, मापन कौशल्य, वर्गीकरण कौशल्य आणि प्रयोग रचना अशा सहा विषयांसाठी त्रिस्तरीय रचना केली गेली. त्या पैकी पहिल्या टप्प्याच्या कार्यपुस्तिका तयार होऊन महाराष्ट्र भरात अंदाजे ४०,००० विद्यार्थ्यांसाठी तासिका घेतल्या गेल्या. वर्षाच्या शेवटी निवडक मुलांसाठी समस्या परिहार स्पर्धा योजली होती. त्याची छोटी ध्वनिचित्रफीत शेवटी दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून पाहता येईल.

वर्षभर झालेल्या तासिकांनंतर फेब्रुवारी महिन्यात पुणे आणि सोलापूर इथे समस्या परिहार स्पर्धा विशेष गाजली. सोप्या कडून अवघड होत गेलेल्या समस्या आणि त्यावर मात करण्यासाठी झुंजणारे ५६ शाळांमधले २२५ विद्यार्थी हे दृश्य खूपच आनंददायी होते. पहिल्या पातळीची समस्या सोडविल्यावर पुढच्या समस्येसाठी आत्मविश्वास आणि धावपळ वाढत होती. आजूबाजूच्या स्पर्धकांचे होणारे सरस काम आपल्या गटाचे काम वेळेत आणि जास्त चांगले कसे होईल यासाठी चुरस निर्माण करत होते. स्पर्धेला भेट देणाऱ्या पाहुण्यांना विद्यार्थी समस्या सोडविण्याच्या आपल्या नावीन्यपूर्ण कल्पना अतिशय उत्साहाने सांगत होते. पुणे शहरातील विद्यार्थ्यांबरोबरच वेल्हे, मावळ अशा ग्रामीण भागातल्या शाळांचे विद्यार्थी सुद्धा यात सहभागी झाले होते आणि बक्षिसे पण मिळवून गेले. प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी श्री. प्रशांतजी वाळूंज यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. 'समोर आलेल्या समस्येवर तुटून पडा. शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करत रहा.' असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे निवृत्त संचालक डॉ. सुनिल मगर यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले.

### ◈ विकासमित्र

२०१९ पासून पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यात विकासमित्र प्रकल्प बजाज ऑटो लि. च्या आर्थिक सहयोगातून सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत वेल्हे तालुक्यातील मावळ, वाजेघर, आंबवणे, पानशेत या चार विभागांतील विद्यार्थी, शिक्षक, व शिक्षण दूत यांच्यासाठी विविध कार्यक्रम योजले गेले.

५१ शाळांमधील २१०० विद्यार्थ्यांपर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून अभ्यास कौशल्ये आणि जीवन कौशल्ये असे विषय घेऊन आपण काम केले.

◈ **ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक विचार आणि उपक्रमांचा विभागाद्वारे विस्तार!**

विविध भौगोलिक, सामाजिक, आर्थिक स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता हे उपक्रम करण्यासाठी उपक्रमांचे सैद्धांतिकीकरण आणि सार्वत्रिकीकरण करणे, अनेक प्रशिक्षकांनी / शिक्षकांनी आपापल्या शाळेत हे उपक्रम आणि त्यातून होणारी विद्यार्थी घडणीची प्रक्रिया सुरू ठेवावी यासाठी शिक्षक प्रशिक्षणे योजणे आणि ह्या उपक्रमांचा अधिकाधिक विस्तार होत असताना त्यातील गुणवत्ता राखली जावी यासाठी छापील आणि ई-साधनांची निर्मिती करणे असे त्रिवेणी काम विभागात होत असते. या वर्षी विभागाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून १० राज्ये, १,०८९ शाळा, ३,९०८ शिक्षक आणि ७६,३०६ विद्यार्थ्यांपर्यंत प्रबोधिनी पोहोचली.

या वर्षभरात एकूण प्रकल्पातील तासिकांचा आशय विद्यार्थ्यांपर्यंत किती प्रमाणात पोहोचतो आहे, हे तपासण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी घेऊन त्याचे विश्लेषण करण्यात आले. तसेच एकूण चार वर्षांच्या प्रकल्पातील आशय, प्रक्रिया आणि त्याचा लाभार्थी विद्यार्थी गटावर झालेला परिणाम तपासण्यासाठी अंतर्गत परीक्षण करण्यात आले. दोन्ही मधून विद्यार्थी गटाला चांगला फायदा झालेला आहे असे निष्कर्ष निघाले आहेत. पुढील प्रकल्पांचे नियोजन करताना याचा चांगला उपयोग होईल.

नियमित तासिकां बरोबरच दर पंधरा दिवसांनी ५वी आणि ८वी मधील निवडक विद्यार्थी गटासाठी दिवसभराच्या आठ कार्यशाळा योजल्या गेल्या. त्यात शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन, सामाजिक जाणीव संवर्धनासाठी कृती कार्य आणि विद्याव्रतासाठी पूर्वतयारी असे स्वरूप होते. वेगवेगळ्या प्रकारच्या शालांतर्गत आणि आंतर शालेय स्पर्धा योजल्या गेल्या. या व्यतिरिक्त सर्व विद्यार्थ्यांना छात्र प्रबोधनचा सुबोध द्वैमासिक अंक वितरित करण्यात आला आणि त्यावर तासिकादेखील घेतल्या गेल्या. गणेशोत्सवात सहा माध्यमिक शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शन भरवले गेले तर विज्ञान दिनाचे औचित्य साधून फेब्रुवारी महिन्यात सर्व प्राथमिक शाळांमध्ये विज्ञान कार्यशाळा घेण्यात आल्या. चार वर्षांच्या प्रकल्पाची मांडणी करणारी १० मिनिटांची ध्वनिचित्रफीत तयार झालेली आहे. शेवटी दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून ती पाहता येईल.

### ◈ अनुभव शाळा व प्रज्ञाविकास - पुणे आणि रोहा

पुणे शहरातील नागरीवस्ती भागात राहणाऱ्या ६ ते ११ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अनुभव शाळा तर १२ ते १५ वर्षे वयोगटातील निवडक विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञाविकास प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून भारत फोर्ज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू आहे.

अनुभव शाळेत विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, शालेय अभ्यासात गती वाढावी, संस्कार आणि मूल्यांची जोपासना व्हावी, शाळेतील विविध स्पर्धांमधील सहभाग वाढावा आणि त्यांना विविध कलागुण दाखवण्याची संधी मिळावी या हेतूने अभ्यासक्रमाची रचना केली आहे. या वर्षी आधीच्या तीन केंद्रांबरोबरच जयभवानी नगर आणि काकडे वस्ती इथे नवीन केंद्रे सुरू करण्यात आली.

प्रज्ञाविकास प्रकल्पात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास कौशल्य, बुद्धिमत्ता संवर्धन, विज्ञान विकास, व्यक्तिमत्त्व विकसन, जीवन कौशल्य ह्या उपविषयांवर आधारित अनुभव शिक्षण देण्याच्या हेतूने दर आठवड्याला दोन दिवस वर्ग घेतले जातात. या वर्षात आधीच्या तीन केंद्रांमध्ये दोन नवीन केंद्रांची (रामनगर आणि पानमळा) भर पडली.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे १०वी पास झालेल्या एका विद्यार्थिनीला पुढील शिक्षणासाठी 'फिदा' शिष्यवृत्ती मिळाली तर दोन विद्यार्थिनी कराटेच्या राष्ट्रीय स्पर्धेत चमकल्या. तसेच दोन गटांनी अन्य शाळांच्या संघाशी स्पर्धा करत समस्या परिहार स्पर्धेत बक्षीस मिळवले.

विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आणि एक्सेल उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य प्रशिक्षण तर १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास मार्गदर्शन वर्ग रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील १३ माध्यमिक शाळांमध्ये घेण्यात आले. दि. २४ जानेवारी रोजी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. श्री. सुभाषराव देशपांडे यांची रोहा भेट झाली. तिथे सुरू असलेल्या अन्य प्रकल्पांना पण त्यांनी भेट दिली व मार्गदर्शन केले.

### ◈ ज्ञानसेतू

ज्ञानसेतू प्रकल्पाच्या माध्यमातून महाविद्यालयीन वयोगटातील स्वयंसेवकांच्या द्वारे अन्य राज्यांतील दुर्गम भागातील माध्यमिक शाळांमध्ये विज्ञान कार्यशाळा घेतल्या जातात. विज्ञान हे साधन वापरून महाविद्यालयीन गटाला राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडावे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश्य आहे. इंटॉक्स आणि ब्लूम कंबशन या कंपन्यांचे अर्थसाहाय्य या वर्षी लाभले. या वर्षीची भर म्हणजे Know Our Country या विषयावरचे प्रदर्शन. या प्रदर्शनामुळे भारताच्या विविधतेची ओळख विद्यार्थी व नागरिक यांना व्हावी हा हेतू होता. त्याशिवाय ऑक्टोबर महिन्यात ५५ जणांनी चार राज्यांत राष्ट्रीय एकात्मता दौरा काढला.

दि. २६ जानेवारीच्या मेळाव्यात भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्री. श्रावण हर्डीकर यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखा वाढीमध्ये युवा गटाची भूमिका या विषयावर युवा गटाला मार्गदर्शन केले. प्रकल्पाला १० वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त ८० शाळांना विज्ञान साहित्य भेट देणे तर १५ स्थानिक संस्था प्रतिनिधींना भेटवस्तू देणे या देखील वर्षभरातल्या ठळक घडामोडी ठरल्या!

### ◈ वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र

वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्राद्वारे विषय अध्यापन, व्यक्तिमत्त्व विकसन, अध्ययन-अध्यापन पद्धती, वर्ग व्यवस्थापन, प्रकल्प पद्धती, भारतीय संस्कृती इ विषयांवर प्रशिक्षणे शैक्षणिक धोरणाला अनुसरून शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांच्यासाठी योजली जातात, तसेच संबंधित उपक्रमांची जोड दिली जाते. या वर्षी महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा, तेलंगणा, आसाम, अंदमान-निकोबार, नागालँड, तामिळनाडू या राज्यांमध्ये विविध संस्थांच्या साहचर्यातून शिक्षक प्रशिक्षणे योजली गेली.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रासंगिक शिक्षक प्रशिक्षणे | ९ राज्ये, १३० शाळा, २००० शिक्षक |
| २ | वा. ना. दांडेकर जन्मशताब्दी कार्यक्रम | |
| | १. शिक्षण व्हावे चैतन्यदायी व्याखानमाला - दूरस्थ | ९ सत्रे<br>एकूण उपस्थिती १२०० |
| | २. शिक्षक प्रशिक्षण - शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन | ४ सत्रे |
| | ३. बी.एड. विद्यार्थी शिक्षकांसाठी कार्यशाळा | १० संस्था, ६७५ शिक्षक |
| | ४. निबंध स्पर्धा | ७ राज्ये, १४४ शिक्षक |

### ◈ वा. ना. दांडेकर जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम

दि. २३ जून हा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ कै. वा. ना. दांडेकर यांचा जन्मदिवस तर २०२२-२३ हे वर्ष त्यांची जन्मशताब्दी! त्या निमित्ताने शिक्षकांसाठी रूप पालटू शिक्षणाचे शिबिर, शिक्षण व्हावे चैतन्यदायी व्याख्यानमाला, नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित निबंध स्पर्धा, विद्यार्थ्यांनी शालेय शिष्यवृत्ती परीक्षेची भीती न बाळगता या परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे जावे तसेच गुणवत्ता वाढावी यासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि नवीन होऊ घातलेल्या शिक्षकांसाठी विविध विषयांवर सत्रे आणि कार्यशाळा घेऊन शिक्षक म्हणून त्यांचा सर्वांगीण विकास करणे यासारखे कार्यक्रम वर्षभर योजण्यात आले. या माध्यमातून अधिकाधिक शिक्षकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला गेला.

### ◈ संशोधन आणि साहित्य निर्मिती

या माध्यमातून प्रकल्पांच्या विस्तारासाठी पूरक असे साहित्य, साधन आणि प्रकल्पाचा परिणाम मोजण्यासाठीचे कृती संशोधन केले जाते.

| | | |
|---|---|---|
| १ | छोटे सायंटिस्ट्स् | १२ संकल्पनांवर आधारित नवीन ४५ प्रयोग कृती,<br>त्यावर छोट्या चित्रफिती,<br>१२ कार्यपत्रके,<br>गुगल क्लासरूम कोर्स- ई साहित्य |
| २ | विकासमित्र | पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी आधारे परीक्षण,<br>शाळांसाठी साहित्य पेटी, कार्यपत्रके |
| ३ | ज्ञानसेतू | भारताची विविध पैलूंनी ओळख करून देणारे know our country प्रदर्शन,<br>फोल्डस्कोप वापरण्यासाठी शिक्षक हस्तपुस्तिका,<br>चार शिक्षकांसाठी ई-प्रशिक्षकचे ११ अंक व एक कला विशेषांक |

शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या कामाचा विस्तार होण्यासाठी या वर्षभरात शिक्षक, कार्यकर्ते यांचे प्रत्यक्ष योगदान व अनेक देणगीदार, हितचिंतक यांचे अर्थसाहाय्य लाभले. स्त्री-शक्ती प्रबोधन शहरी व ग्रामीण, छात्र प्रबोधन, ग्राम विकसन, प्रज्ञा मानस संशोधिका, युवक विज्ञान दल, कला आणि राष्ट्रीय एकात्मता विशेष उद्दिष्ट गट, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर आणि हराळी केंद्र यांच्या बरोबरच्या साहचर्यातून ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण विचारांचा विस्तार प्रभावीपणे करता आला.

▲▲▲

**वृत्तातील विविध माहिती संदर्भात अधिक तपशील पुढील क्यूआर कोडस् स्कॅन करून पाहता येतील.**

**शैक्षणिक उपक्रम संशोधिका**

**छोटे सायंटिस्ट** | **विकासमित्र** | **ज्ञानसेतू** | **शिक्षण व्हावे चैतन्यदायी**

**शैक्षणिक साधन केंद्र**

**सरिता ॲप** | **मेघ ॲप** | **अरण्य ॲप**

# ३. शैक्षणिक साधन केंद्र

आधुनिक तंत्रज्ञान वापरून ज्ञान प्रबोधिनीच्या त्रिवेणी शिक्षण पद्धतीला अनुसरून शैक्षणिक ई-साहित्य निर्मिती करणे आणि दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण व मुक्त शिक्षण देणे हे काम शैक्षणिक साधन केंद्र करते. तसेच शैक्षणिक तंत्रज्ञानातील विविध प्रयोग या केंद्रात केले जातात. शालेय अभ्यासक्रमाशी निगडित ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीनुसार आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चित्रफिती, ई-खेळ, आभासी पद्धतीने अनुभव शिक्षण देणारी ॲप निर्मिती आणि प्रशिक्षणे या वर्षी करण्यात आली.

### ◈ ई - साहित्य निर्मिती

**१. दीक्षा प्रकल्प**

विभागाने केंद्र शासनाच्या दीक्षा प्रकल्पासाठी शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या २००० शैक्षणिक चित्रफिती आत्तापर्यंत तयार केल्या आहेत. हा प्रकल्प शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERT) आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांच्या बरोबर जोडलेला आहे. या वर्षी ३७४ चित्रफितींच्या निर्मितीचे काम पूर्ण करून ते www.diksha.gov.in/explore, http://www.diksha.gov.in/explore या दीक्षा पोर्टलवर आणि ॲपवर प्रकाशित केले गेले. ॲप दोन दशलक्ष वेळा पाहिले गेले. gyanqr असे शोधल्यावर प्रबोधिनीनिर्मित चित्रफिती बघता येतात. प्राथमिकसाठी शालेय अभ्यासक्रमातील मराठी भाषा, परिसर अभ्यास आणि गणित याच्या चित्रफिती उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्याबरोबर माध्यमिकसाठी विज्ञान, गणित, भूगोल या विषयाच्या चित्रफिती उपलब्ध आहेत. या चित्रफिती मराठी, इंग्रजी, हिंदी आणि सांकेतिक भाषेत केल्या गेल्या आहेत. प्राथमिकसाठी हसत-खेळत शिक्षण ही कृती आणि खेळातून शिक्षण देण्यासाठीची मालिका केली गेली. मुलांचे शिक्षणातील प्रश्न शोधणाऱ्या आणि कौशल्य विकसन करणाऱ्या या चित्रफिती आहेत. अनेक शाळांना वर्गाध्यापनासाठी इंटरनेट उपलब्ध नसते, त्यांच्यासाठी दीक्षा ज्ञानवर्धन पेटीमध्ये शैक्षणिक चित्रफिती उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. भारतातील १६ राज्यांत विभागाने निर्मिती केलेल्या शैक्षणिक चित्रफिती शासनाच्या पाठ्यपुस्तकात जोडलेल्या आहेत. महाराष्ट्रात आणि सीमावर्ती राज्यांत शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणाचे काम केले जात आहे. ते या वर्षीही झाले.

**२. ज्ञान प्रबोधिनी आनंदी शिक्षण प्रकल्प**

'मूलभूत साक्षरता आणि संख्यात्मकता (FLN) विकास कार्यक्रम' हा पुणे केंद्रातील शैक्षणिक साधन केंद्र व नागरीवस्ती अभ्यासगट आणि हराळी केंद्र यांचा संयुक्त उपक्रम जुलै २०२२ मध्ये सुरू झाला. डिजिटल सामग्रीचा वापर करून अध्यापन प्रभावी करणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. साधन केंद्राने तयार केलेल्या संसाधनांचा वापर करून, विद्यार्थ्यांची मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रातील गुणवत्ता-आधारित शिक्षण यासाठी यामध्ये प्रयत्न केले जातात. या प्रकल्पात हराळी येथील ४००, पुणे जिल्ह्यातील नागरीवस्त्यांमधील १०० आणि कर्णबधिर विद्यालयातील इ. तिसरी व इ. चौथीतील १०० अशा एकूण ६०० विद्यार्थ्यांचा या वर्षी समावेश होता. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात विषयतज्ज्ञांनी सुचवलेल्या मराठीतील वाचन, श्रुतलेखन आणि लेखन कौशल्ये, गणितातील संख्या ओळखणे, गणना करणे आणि मूलभूत संख्यात्मक कौशल्ये अशा क्षमता तपासण्यासाठी अनौपचारिक आणि अप्रमाणित चाचण्या तयार केल्या होत्या.

कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशिक्षकांसाठी एकूण चार कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. दृकश्राव्य माध्यमांबद्दल साक्षरता निर्माण करणे, भाषा आणि गणित हे विषय खेळातून कसे शिकवायचे याबद्दल यात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रिया सुलभ करण्यासाठी कोणत्या प्रकारची चर्चा करावी, कार्यपत्रकांचे मूल्यांकन आणि मूल्यमापन कसे करावे, तसेच साधन केंद्राने विकसित केलेल्या ॲपमध्ये नोंदी आणि अभिप्राय कसा द्यावा, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

सोळा आठवड्यांच्या अभ्यासक्रमाचे नियोजन तयार करून संबंधित केंद्रांना देण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी चित्रफिती, शिक्षकपुस्तिका आणि विद्यार्थ्यांसाठी कार्यपत्रके यांचा समावेश होता. तीन आठवडे शिक्षकांनी अभ्यासक्रम शिकवणे आणि चौथ्या आठवड्यात मासिक चाचणीद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन असे वर्षभर होत होते. बालजत्रेद्वारे विद्यार्थ्यांच्या भाषिक व गणिती क्षमतांचे मूल्यांकन केले, ज्यात पालकांचाही सहभाग होता. कोणताही विद्यार्थी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण दाखवला जात नाही, हे बालजत्रा मूल्यांकनाचे वैशिष्ट्य आहे. भाषा आणि गणित विषयांची विद्यार्थ्यांची प्रभुत्व पातळी तपासण्यात आली. त्यासाठी प्रशिक्षकांची अध्ययन साहित्य व मूल्यमापन साधनांची निर्मिती याविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यार्थी व पालक या कार्यक्रमाबद्दल समाधानी आहेत.

**३. आभासी प्रयोगशाळा**

मागील वर्षात 'सरिता' ॲप प्रकाशित केले होते. ज्यात गंगा आणि यमुना या नद्यांचा प्रवास अनोख्या पद्धतीने करता येतो. या वर्षी नर्मदा आणि कृष्णा या दोन नद्यांची यात भर घातली. तसेच 'अरण्य' ॲपची निर्मिती केली. ज्यात खेळांमधून वेगवेगळ्या प्रकारच्या जंगलांचा प्रवास आणि सिम्युलेशन मधून वृक्ष लावगड करून बघता येईल. त्याच बरोबर AR आणि ३६० अंशातून

जंगल बघायचा अनुभवसुद्धा मुलांना घेता येईल. जंगल ॲपमधून पर्यावरण प्रबोधनाचे उद्दिष्ट देखील साध्य होणार आहे. याअंतर्गत, Runner Module, Encyclopaedia, Simulator, Store व AR ही modules समाविष्ट आहेत.

**MeghoGraphy Competition** - 'मेघ ॲप'साठी MeghoGraphy नावाची स्पर्धा घेतली गेली. यामध्ये मुलांना ॲप बघून ढगांबद्दल शिकायचे होते. ते झाल्यावर, त्यांनी आपल्या जागेवरून दिसणाऱ्या ढगांचा फोटो काढायचा होता व पाऊस येईल की नाही, हे सांगायचे होते. तसेच हे सर्व त्यांनी कशावरून ओळखले हे सांगायचे होते. यात महाराष्ट्र आणि जम्मू मधील मुलांनी भाग घेतला.

दुर्गम भागांतील शाळांत वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या उपलब्धतेचे प्रमाण कमी आहे. अशा परिस्थितीत आभासी प्रयोगशाळा परिणामकारक ठरू शकतील. अनेक स्थानिक भाषांत आभासी प्रयोगशाळेमार्फत वैज्ञानिक प्रयोग दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले, तर स्वयंअध्ययन, शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिष्कोन, शास्त्रीय विचार, पर्यावरण सजगता इ. कौशल्यांचे विकसन होऊ शकेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२१ साठी देखील हे सुसंगत ठरेल. या दृष्टीने विभागात येत्या काळात आभासी प्रयोगशाळेत इ. सहावी ते इ. दहावी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय अभ्यासक्रमांशी निगडित विज्ञान व सामाजिकशास्त्र या विषयांवर शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ई-प्रात्यक्षिकांची निर्मिती केली जाईल. यासाठी AR, VR, Visual Novel, Gaming Applications विकसित केली जात आहेत. या वर्षी विज्ञान आभासी प्रयोगशाळेत रसायनशास्त्राचे पाच प्रयोग VR मध्ये करण्यात आले. दहावी विज्ञान प्रात्यक्षिकासाठी लागणाऱ्या २० प्रयोगांसाठी 3D मॉडेल तयार करण्यात आले. याच्या प्रोग्रामिंगचे काम सुरू आहे.

**◈ दृक-श्राव्य माध्यम केंद्र**

ज्ञान प्रबोधिनीचे काम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने जून २०२२ पासून दृक-श्राव्य माध्यमांशी संबंधित कामांना सुरुवात झाली. या वर्षी फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर आणि लिंक्ड्इन या समाजमाध्यमांवर प्रबोधिनीच्या कामाची वृत्ते नियमितपणे प्रसारित करण्यात आली. तसेच जुन्या वार्षिक वृत्तांच्या संगणकीकरणाचे काम हाती घेण्यात आले. प्रबोधिनीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या मुलाखती, वार्षिक वृत्त, भवितव्य लेख इत्यादी विषयांवरील नऊ चित्रफिती तयार करण्यात आल्या. त्याचप्रमाणे वर्षभरात झालेले मध्यवर्ती उपक्रम आणि इतर विभागांचे प्रासंगिक उपक्रम मिळून एकूण २४ कार्यक्रमांसाठी चित्रफित निर्मिती प्रक्रियेशी संबंधित विविध सेवा पुरवण्यात आल्या.

| प्रशिक्षण विषय | राज्य | शाळा | लाभार्थी | प्रशिक्षण दिवस | कोणासाठी |
|---|---|---|---|---|---|
| ज्ञानवर्धन पेटीचा वापर | महाराष्ट्र - ५ जिल्हे | ५६ | १५० शिक्षक | ३ | अनुदानित आणि विनाअनुदानित शाळा |
| Web and app based Gamification, Animation, AR-VR | जम्मू - १ जिल्हा | ७३ | ७३ शिक्षक | ३ | जिल्हास्तरीय - सांबा डीसी ऑफिस |
| | जम्मू - ३ जिल्हे (किस्तवार, डोडा, रामबन) | ५० | ५० शिक्षक | ३ | |
| | जम्मू - ७ जिल्हे (जम्मू, संबा, रियासी, पूंछ, राजौरी, उधमपूर, कथुवा) | १५० | १५० शिक्षक | ३ | |
| वैज्ञानिक प्रतिभा विकसन | महाराष्ट्र २० जिल्हे | ५० | ५० शिक्षक | १ | विज्ञान अध्यापक मंडळ, महाराष्ट्र |
| ज्ञानवर्धन पेटीचा वापर आणि मूलभूत साक्षरता | पुणे | १ | ७५ विद्यार्थी, ७ शिक्षक | ३ | हिरे हायस्कूल |
| Gaming, Animation, Video Making | पुणे | १ | ६१ विद्यार्थी | ७ | ज्ञान प्रबोधिनी प्रशाला |
| Know your river, Visual Design, Future Technology AR, VR and Gaming, App development experience | निगडी | १ | ६० विद्यार्थी | ३ | नवनगर विद्यालय |
| चित्रपट अभिरुची आणि संकलन | | १ | ३५ | १० | गुरुकुल |

▲▲▲

## ४. छात्र प्रबोधन

### ◈ मासिक व दिवाळी अंक

गेल्या वर्षभरात ११ नित्य अंक व एक दिवाळी अंक नियमितपणे प्रकाशित झाले व ते १००० सभासदांपर्यंत छापील स्वरूपात व सुमारे २७८ सभासदांपर्यंत ई-अंकाच्या रूपाने वितरित झाले. नित्य दिवाळी अंक, इंग्रजी दिवाळी अंक व सुबोध ग्रामीण दिवाळी अंक मिळून एकूण ३२,००० दिवाळी अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी ८० गावांमधील केंद्रप्रमुख, कार्यकर्ते व शिक्षक यांच्या स्वयंस्फूर्त सहभागामुळे ही नोंदणी होऊ शकली.

### ◈ विविध प्रकाशने

**१. पुस्तके**

वर्षभरात एकूण दहा नवीन पुस्तके प्रकाशित झाली. तर पूर्वप्रकाशित अकरा पुस्तकांपैकी काहींचे पुनर्मुद्रण आणि काहींच्या पुढील आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

**२. दिनदर्शिका**

खास कुमारांसाठी प्रकाशित होत असलेली या वर्षीची दिनदर्शिका पाठपोट २४ पानी छापण्यात आली. पुढील बाजूस ग्रेगोरियन दिनांकासोबत राष्ट्रीय सौर दिनांक, प्रेरणादायी दिनविशेष आहे तर दिनदर्शिकेच्या मागील बाजूस, स्फूर्तिगीते, नावीन्यपूर्ण खेळ-कोडी, प्रेरक लेखमाला, शोध स्वत:चा ही प्रश्नावली, कलाकृती आणि दर महिन्याला एक अशा वर्गोद्दिष्ट स्पर्धेची जोड या दिनदर्शिकेला दिली गेली. या वर्षी एकूण ११,००० दिनदर्शिकांची प्रकाशनपूर्व नोंदणी झाली.

**३. एक पानी व सहा पानी संच**

'मैत्री पुस्तकांशी' व 'जल्लोष वाचनाचा' या प्रकल्पांतर्गत हे संच प्रकाशित होत आहेत. एक पानी एका संचात विविध लेखकांनी लिहिलेल्या ललित लेखांची ४० पुस्तके तर एक पानीच्या दुसऱ्या संचात विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजवलेल्या ४० व्यक्तींच्या प्रेरणादायी कहाण्यांची आर्ट कार्डवर छपाई झाली. तसेच आर्ट कार्डवर छापलेले व लॅमिनेट केलेले बहुरंगी मुखपृष्ठ, मलपृष्ठावर कविता व आतमध्ये दोन कथा असे सहा पानी संचाचे स्वरूप आहे. ४० पुस्तकांमध्ये मिळून ६२ लेखकांच्या ८० कथा व ३३ कवींच्या ४० कविता दिल्या आहेत. त्याशिवाय १२ पुस्तकांचा परिचयही दिला आहे. वरील प्रत्येक पुस्तकात अवघड शब्दांचे अर्थ पानांखाली दिले आहेत व आकलनावर आधारित प्रश्नही दिले आहेत. एक पानी संच सवलतीच्या दरात रु. ५००/- मध्ये उपलब्ध करून देत आहोत. तर सहा पानी संच सवलतीच्या दरात रु. ६००/- मध्ये उपलब्ध करून देणार आहोत.

वर्षभर jpprakashane.org आणि amazon.in या संकेतस्थळांद्वारा पुस्तकांची विक्री झाली.

### ◈ विविध प्रत्यक्ष व दूरस्थ उपक्रम

**१. कुमार साहित्य मेळावे**

जानेवारी व फेब्रुवारी महिन्यामध्ये पुण्यातील २० शाळांमध्ये छात्र प्रबोधनच्या अंकांवर आधारित साहित्य मेळावे झाले. एकूण २० मेळाव्यांमध्ये मिळून १३०० विद्यार्थी सहभागी झाले. या मेळाव्यांसाठी पुणे नगर वाचन मंदिर, पुणे यांच्यातर्फे अर्थसाहाय्य मिळाले होते. छात्र प्रबोधन (ज्ञा. प्र. पुणे) **व पुणे नगर वाचन मंदिर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने** दि. ५ फेब्रुवारी रोजी **कुमार साहित्य** संमेलन आयोजित केले गेले. पेरुगेट भावेस्कूल येथे स. ९ ते सायं. ६ या वेळेत, ४० शाळांमधील ७वी, ८वी, ९वीतील ६३५ विद्यार्थी, ४५ शिक्षक, २० लेखक आणि सुमारे ७५ कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत हे संमेलन झाले. चित्रपट दिगदर्शक दिगपाल लांजेकर, प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट, प्रसिद्ध साहित्यिक डॉ. संजय ढोले, रामानंदतीर्थ विद्यापीठ-नांदेडचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, प्रसिद्ध साहित्यिक नीलिमा गुंडी आणि मल्हार अरणकल्ले यांच्या उपस्थितीत संमेलन झाले. संमेलनामध्ये १२ गटांत लेखन सादरीकरण कार्यशाळा, १२ गटांमध्ये लेखकांशी गप्पा व २० ठिकाणी बुद्धीला चालना देणाऱ्या कल्पक स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या साहित्याने नटलेली साहित्य भिंत आणि पुणे प्रशालेच्या विद्यार्थिनींनी सादर केलेला नाट्याविष्कार अशा भरगच्च कार्यक्रमाने आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागाने हे संमेलन झाले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना एक संमेलन वही, दिनदर्शिका आणि गोष्टींचे एक पुस्तक भेट देण्यात आले. कल्पक स्पर्धेतील एकूण ११९ विजेत्या विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात आली.

**२. प्रबोधन दूत योजना**

शहरी/ग्रामीण भागातील ६वी ते ९वी पैकी कोणत्याही वर्गांना शिकवणाऱ्या, शिक्षणात सकारात्मक बदल घडवून आणू इच्छिणाऱ्या, शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील धडपडणाऱ्या १८६ शाळांमधील (उच्च प्राथमिक, माध्यमिक) प्रत्येकी एक शिक्षक या योजनेत सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढावी व गतिवाचनाचे कौशल्य विकसित व्हावे, साहित्याची अभिरुची वाढावी व त्यातून त्यांच्या मनोविश्वाची व भावविश्वाची मशागत व्हावी, मुक्त अभिव्यक्तीच्या विविध संधी त्यांना उपलब्ध करून द्याव्यात व त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि शिकण्याची हौस, स्वयंविकासाची प्रेरणा व सामाजिक भान वाढावे हे या योजनेचे प्रमुख हेतू आहेत. २४ जिल्ह्यांतील, ८८ तालुक्यांमधील १८६ शाळांमधील शिक्षक या योजनेत दोन गटांमध्ये मिळून सहभागी झाले आहेत. पहिल्यापासून सहभागी असलेल्या ३३

शिक्षकांना दुसऱ्या टप्प्यातील सुमारे रु. १०००/- चे साहित्य तर नव्याने दाखल झालेल्या शिक्षकांना पहिल्या टप्प्यातील सुमारे रु. ८००/- चे साहित्य पाठविण्यात आले. गटाच्या दूरस्थ बैठकी झाल्या व त्यामध्ये वाचनवेग कसा मोजायचा, वाचन कौशल्य कसे विकसित करायचे, या योजनेत दिलेल्या साहित्याचा प्रभावीपणे वापर शिक्षकांनी कसा करावा, वर्गोद्दिष्ट स्पर्धेत सहभागी होऊन वर्गाची एकी कशी वाढवता येईल व सुट्टीत वाचनाची गोडी वाढविण्यासाठी कोणकोणते उपक्रम योजता येतील इ. विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले गेले. झालेल्या उपक्रमांचे निवेदन शिक्षक गुगल फॉर्मद्वारे पाठवत असतात. या योजनेसाठी इंडियन रूट्स, अमेरिका यांच्याद्वारे तसेच डॉ. वामन पारखी व त्यांचे मित्र यांच्याकडूनही अर्थसाहाय्य मिळाले आहे.

**३. प्रबोधन विकासिका**

जुलै २०२२ पासून इ. ५वी ते ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रबोधन विकासिका' हा दूरस्थ मासिक उपक्रम सुरू झाला. ७० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या विकसनासाठी सुमारे दीड तास संवाद कौशल्य, निर्णय कौशल्य व अभ्यास कौशल्य यांपैकी एकेका कौशल्यावर आधारित व्याख्याने व कृतिसत्रे, ब्रेक आउट रूमद्वारे अर्धातास गटागटांत संवाद, खेळ, चर्चा, गप्पा व त्यानंतर सुमारे तासभर विविध क्षेत्रांतल्या कर्तृत्ववान व्यक्तींशी गप्पांचा कार्यक्रम असा एकूण तीन तासांचा कार्यक्रम होता. आत्तापर्यंत आठ कार्यशाळा आणि गप्पांचे कार्यक्रम झाले. हे गप्पांचे कार्यक्रम छात्र प्रबोधनच्या यूट्युब चॅनलवर अपलोड करण्यात आले आहेत.

**४. प्रबोधन संवादक योजना**

ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रक्रियांचा लाभ अनेक मुलामुलींना घेता यावा व पुस्तकी शिक्षणापलीकडे त्यांच्या सर्वांगीण विकसनात डोळसपणे प्रभावी संवादकाची भूमिका पालकांना घेता यावी या उद्देशाने इ. ५वी ते ७वीच्या पालकांसाठी 'प्रबोधन संवादक' योजना एप्रिल २०२२ पासून सुरू आहे. या सर्वांना १५ पुस्तकांचा संच व १२ अंक देण्यात आले. शिवाय छात्र प्रबोधन ई-मासिक दरमहा इ-मेल द्वारे पाठविले. या योजनेत सहभागी झालेल्या सुमारे ६० पालकांसाठी वर्षभर मासिक व्याख्याने व प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम झाले.

**५. जिज्ञासा ग्रंथालय योजना**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाविषयी, साहित्याविषयी कुतूहल, उत्सुकता वाढावी व त्याचबरोबर त्यांच्यातील जिद्द, ज्ञान आणि साहस वाढावे यासाठी जिज्ञासा ग्रंथालय योजना सुरू झाली! अमेरिकास्थित स्वप्नीता दाते यांनी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन, अमेरिकाद्वारे दिलेल्या देणगीतून ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. या योजनेत सहा शाळा सहभागी झाल्या असून त्यातील एकूण २८५ विद्यार्थी या ग्रंथालयाचा लाभ घेत आहेत. या ग्रंथालयात छात्र प्रबोधनतर्फे २०० पुस्तकांचा संच शाळांना दिला जाणार असून त्यापैकी १२० पुस्तके पाठविण्यात आली आहेत.

**◈ संख्यात्मक आढावा**

१. ३२,००० दिवाळी अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी
२. ११,००० दिनदर्शिकांची प्रकाशनपूर्व नोंदणी
३. एकूण २० कुमार साहित्य मेळाव्यांमध्ये मिळून १३०० विद्यार्थी सहभागी
४. प्रबोधन दूत मध्ये २४ जिल्ह्यांतील, ८८ तालुक्यांमधील १८६ शाळांमधील शिक्षक सहभागी
५. प्रबोधन विकासिका योजनेत ७० विद्यार्थी सहभागी
६. प्रबोधन संवादक योजनेत ६० पालक सहभागी
७. जिज्ञासा ग्रंथालय योजनेत २८५ विद्यार्थी सहभागी
८. 'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धेत १९ शाळांमधील २७ संघ सहभागी
९. अभिवाचन स्पर्धेत १९ शाळांमधील ३० संघ सहभागी

**◈ स्पर्धा**

**१. राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : 'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धा व अभिवाचन स्पर्धा**

या स्पर्धांमध्ये १९ शाळांमधील २७ संघांनी हस्तलिखिते तर १९ शाळांमधील ३० संघांनी अभिवाचनाच्या चित्रफिती छात्र प्रबोधनच्या कार्यालयात पाठवल्या. या स्पर्धांचे दोन स्तरांवर परीक्षण करण्यात आले. दोन्ही संघातील क्रमांकप्राप्त संघांना अनुक्रमे रु. ३०००/-, २५००/-, २०००/- इतकी बक्षिसे (पुस्तकरूपाने व रोख असे संमिश्रपणे), सन्मान चिन्ह व प्रशस्तिपत्र देण्यात आले. तर उत्तेजनार्थ एकूण आठ संघांना प्रत्येकी रु. १०००/- व प्रशस्तिपत्र आणि विशेष गुणवत्ता प्राप्त एकूण १६ संघांना प्रशस्तिपत्र व मैत्री-पुस्तकांची हा एक पानी ४० पुस्तकांचा संच देण्यात आला. दोन्ही स्पर्धा संयोजनासाठी व बक्षिसांसाठी मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी व श्री. दत्ता टोळ यांच्याकडून अर्थसाहाय्य मिळाले.

**२. वर्गोद्दिष्ट स्पर्धा**

वर्गाची एकी वाढायला, ठरवून एखादी गोष्ट वर्गाने मिळून पूर्ण करण्यातला आनंद आणि आत्मविश्वास मिळवायला छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित दिनदर्शिकेमध्ये वर्गोद्दिष्ट स्पर्धा जाहीर करण्यात आली. या स्पर्धेला शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जानेवारी महिन्यात वर्गातील विद्यार्थ्यांनी मिळून किमान १००० सूर्य नमस्कार घालणे, फेब्रुवारी महिन्यात वर्गातील विद्यार्थ्यांनी मिळून किमान १०० झाडांना पाट्या लावण्याचे (प्रत्येकी किमान दोन) उद्दिष्ट होते. मार्च महिन्यात वर्गातील विद्यार्थ्यांनी आठवड्याभरात मिळून किमान ८०० तास अभ्यास करण्याचे (प्रत्येकी किमान १५ तास) उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे. या स्पर्धेत आठ शाळांमधील १२ वर्ग सहभागी झाले आहेत. लवकरच त्यांचे परीक्षण करून निर्णय जाहीर केला जाईल.

# ५. नेतृत्व संवर्धन केंद्र

नेतृत्व संवर्धन केंद्राच्या भवितव्य लेखात निवडलेल्या तीनही क्षेत्रांमध्ये (प्रशासकीय, सामाजिक, संघटनात्मक) या वर्षी काम झाले. प्रशासकीय नेतृत्वगुण विकसन वर्गांमध्ये (जिज्ञासा व आकांक्षा) कोरोनाच्या आपत्तीकाळामुळे दोन वर्षांच्या खंडानंतर पहिल्यांदाच संपूर्ण अभ्यासक्रम राबवला गेला. यातील सहभागी प्रशिक्षणार्थींच्या पुढाकाराने महाविद्यालयीन वयोगटासाठी उपक्रमांचे आयोजन झाले.

संघटनात्मक नेतृत्वगुण विकसनाचा वर्ग (उन्मेष-२) 'स्व'-रूपवर्धिनी या संघटनेतील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी पुन्हा सुरू झाला. सामाजिक नेतृत्वगुण विकसनासाठी एकूण १८ महाविद्यालयांमध्ये संपर्क होऊन अपेक्षित प्रशिक्षणार्थींचा शोध घेण्यात आला. या शिवाय प्रबोधिनीतील विविध विभाग, केंद्रे यांबरोबरच विविध संस्था, संघटना, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते इ. साठी नेतृत्वगुणांच्या प्रशिक्षणाची सत्रे घेतली गेली. सहा जणांच्या सदस्य गटाने मिळून १८-३० वयोगटातील एकूण १०० जणांचे नियमित (दैनंदिन / साप्ताहिक) वर्ग, सुमारे १५०० जणांसाठी प्रासंगिक कार्यशाळा / व्याख्याने, अंदाजे ३००० जणांशी विविध माध्यमांतून संपर्क इ. साध्य केले.

### ◈ प्रशासकीय नेतृत्वगुण विकसन

नेतृत्व पायाभरणी (फौंडेशन) आणि स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी (प्रिपरेटरी) वर्ग जुलै २०२२ ते मार्च २०२३ दरम्यान झाले. या वर्गांचे दोन वर्षांचे अभ्यासक्रम असतात. त्याचा संख्यात्मक आढावा पुढील तक्त्यात पाहता येईल.

| तपशील | जिज्ञासा-१७ (बेसिक) | आकांक्षा-९ (ॲडव्हान्स ) | एकूण |
|---|---|---|---|
| सहभागी संख्या | ६१ | १९ | ८० विद्यार्थी |
| UPSC तयारी (प्रिपरेटरी) सत्रे | १५० | १४८ | २९८ सत्रे |
| नेतृत्व पायाभरणी (फौंडेशन) सत्रे | २२ | १४ | ३६ सत्रे |
| निवासी उपक्रमांचे दिवस | १७ | १८ | ३५ दिवस |

या वर्गात प्रशासकीय रचना समजून घेण्यासाठी ग्रामीण परिचय शिबिर (तीन दिवस), तालुका अभ्यास शिबिर (तीन दिवस) व जिल्हा अभ्यास शिबिर (चार दिवस) या उपक्रमांची योजना असते. यंदा ग्रामीण परिचय शिबिरे वेल्हे भागातील नऊ गावांमध्ये, तालुका अभ्यास शिबिरे खेड व जुन्नर तालुक्यांमध्ये व जिल्हा अभ्यास शिबिर सोलापूर जिल्ह्यात झाले. या शिबिराचा अहवाल शेवटी जोडलेला क्यूआर कोड स्कॅन करून पाहता येईल.

जिज्ञासा व आकांक्षा वर्गांसाठी विशेष सत्रांमध्ये वाच. विवेकराव कुलकर्णी यांचे Temperament Preserverance during UPSC Process या विषयावर मार्गदर्शन व अमरावती येथील प्रयास सेवांकुर या संस्थेचे संचालक मा. अविनाश सावजी यांचे 'जीवन ध्येये - का? कधी? व कशी ठरवावीत' या विषयावर अनुभव मांडत प्रेरक व्याख्यान झाले.

विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने पुण्यातील चार महाविद्यालयांमध्ये संकल्प व्याख्यानमाला हा उपक्रम झाला. त्या अंतर्गत विविध मान्यवरांची अनुभवकथने झाली. सर्व महाविद्यालयांमध्ये मिळून एकूण ५५०-६०० युवकांचा यात सहभाग होता.

| | |
|---|---|
| मॉडर्न महाविद्यालय | मा. सुनील दाढे (माजी प्रशासकीय अधिकारी) |
| फर्ग्युसन महाविद्यालय | मा. किरण पळसुले (माजी वायुसेना उप-प्रमुख) व मा. राही सरनोबत (आंतरराष्ट्रीय नेमबाज) |
| कमिन्स महाविद्यालय | मा. सारंग गोसावी (प्रमुख, असीम फाऊंडेशन) |
| सर परशुराम भाऊ महाविद्यालय | मा. सुदर्शन हसबनीस (माजी लष्कर उप-प्रमुख) |

फेब्रु-मार्च दरम्यान झालेल्या मुलाखत स्पर्धेत ५५ गटांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी ४६ गटांनी मुलाखती घेतल्या, तर ४० गटांनी त्याचे शब्दांकन, मनोगत, छायाचित्रे व ध्वनिमुद्रण इ. जमा केले. या सर्वांचे मूल्यमापन होऊन दि. १८ मार्च रोजी पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला सुमारे १०० युवक, युवती उपस्थित होते, यामध्ये एकूण आठ गटांना मिळून रू. १२,०००/- ची बक्षिसे व भेटी देण्यात आल्या. रामकृष्ण मठ, पुणे येथील प्रमुख स्वामी श्रीकांतानंदजी हे प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित होते. त्यांनी नेतृत्वाचे विविध आयाम मांडत नेतृत्वासाठी आवश्यक गुण अनुभवाच्या आधारे मांडले.

केंद्रात शिकणाऱ्या आणि शिकून बाहेर पडलेल्या सुमारे ६० विद्यार्थ्यांसाठी वर्षभर नियमित अभ्यासिका चालवण्यात आली. जून महिन्यात या विद्यार्थ्यांसाठी रायरेश्वर येथे गिरिभ्रमण सहल झाली. या गटाचे नियमित साप्ताहिक उपासनेच्या निमित्ताने वाचन व चिंतन झाले.

निवडक १०० माजी विद्यार्थ्यांशी संपर्क करून त्यांचे सध्या चालू असलेल्या कामाचे, अभ्यासाचे तपशील संकलित करण्यात आले. त्या आधारे या गटातील काही जणांसाठी 'स्व'-व्यवस्थापन आणि

ध्येयदर्शन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा मार्च महिन्यात झाली. त्याचबरोबर केंद्रातील अभ्यासक्रमाची परिणामकारकता समजून घेण्याकरिता २० माजी विद्यार्थी निवडून त्यांच्या सविस्तर मुलाखती घेण्यात आल्या.

### ◈ संघटनात्मक नेतृत्वगुण विकसन

'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या २५ युवक कार्यकर्त्यांसाठी सप्टेंबरमध्ये संघटनात्मक नेतृत्व प्रशिक्षण वर्ग (उन्मेष २) सुरू केला. यामध्ये वेगवेगळ्या सहा विषयांची प्रत्येकी १० सत्रे घेण्यात येणार आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत नियोजन-कार्यवाही कौशल्य, स्व-विकास व व्यवस्थापन, अभ्यास-विचार कौशल्य व प्रेरणा विकसन आणि संक्रमण या चार विषयांची मिळून एकूण ४० सत्रे पूर्ण झाली. केळद (ता. वेल्हे) गावातील साहस शिबिर व निगडी येथील स्वामी विवेकानंद अभ्यास शिबिर अशी दोन निवासी शिबिरे झाली.

वर्गामध्ये प्रेरणादायी व वैचारिक पुस्तके वाचनासाठी दरवेळी नियमित अर्धा तास देण्यात आला होता. ज्यामध्ये गटाची 'जिद्दीची लोभस रूपं' व 'आमची जडणघडण' ही दोन पुस्तके वाचून झाली. या वर्गासंबंधी 'स्व'-रूपवर्धिनी मधील पदाधिकाऱ्यांबरोबर समन्वयाच्या तीन बैठका घेण्यात आल्या. प्रशिक्षण वर्गात शिकलेल्या गोष्टींचे वर्धिनीतल्या कार्यक्रमातील उपयोजन, वर्गातील सत्रे, उपक्रमांबाबतचा मागोवा व अपेक्षित सहकार्य यावर सविस्तर चर्चा या बैठकींमध्ये झाल्या. तीन वेगेवगळ्या संस्थांमधील कार्यकर्त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व नेतृत्व विकसनासाठी कार्यशाळा / प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याबाबत संपर्क झाला. पुढील वर्षात हे वर्ग सुरू होतील.

### ◈ सामाजिक नेतृत्वगुण विकसन

एखाद्या समस्येचा समाजावर होणारा परिणाम समजून ती समस्या सोडवण्यासाठी आपल्या बरोबर गट जमा करणारा व ती मुळापासून सोडवण्यासाठी परिणामकारक प्रयत्न करणारा म्हणजे सामाजिक नेता. असे सामाजिक नेतृत्व करण्याची क्षमता तयार व्हावी म्हणून योग्य अनुभवांची व कौशल्य प्रशिक्षणाची योजना पुढील काळात नेतृत्व संवर्धन केंद्र करणार आहे. या साठी एकूण तीन वर्षांची योजना असेल. पाहिल्या वर्षी दोन महिन्यांचे तीन वर्ग, दुसऱ्या वर्षी एक वर्ष अर्धवेळ सामाजिक कामाचा अनुभव (Internship) व शेवटच्या वर्षी एक समस्या सोडवण्यासाठी पूर्णवेळ कामाचा अनुभव असे योजले आहे.

सामाजिक नेतृत्वाची ही योजना यशस्वी होण्यासाठी सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे असे सामाजिक काम करण्याची इच्छा व क्षमता असलेले युवक-युवती शोधणे. म्हणून या वर्गाला येण्याच्या आधी सामाजिक जाणीव असणाऱ्या व नेतृत्व करण्याची इच्छा असणाऱ्या विविध विद्यार्थ्यांना शोधण्यासाठी महाविद्यालयातील NSS च्या गटांमध्ये एकदिवसीय नेतृत्व परिचय कार्यशाळा घेणे, एका दिवसाची सामाजिक कृती करण्याची संधी उपलब्ध करून देणे, आभासी स्वरूपात विविध सामाजिक नेतृत्वाची उदाहरणे असलेल्या व्यक्तींची माहिती पाठवणे, प्रत्यक्ष अनुभवकथन ठेवणे असे उपक्रम राबवले गेले. यांतून महाविद्यालयीन वयोगटातील एकूण १२५ विद्यार्थी संपर्कात आले.

### ◈ वेल्हे येथील प्रशिक्षण केंद्र

वेल्हे येथे उभारण्यात येणाऱ्या ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम वर्षभर चालू होते. या ठिकाणी चार मजल्यांची वास्तू उभी करण्याचा संकल्प आहे. प्रत्येकी ४० जणांचे दोन निवासी कक्ष, ५० जणांसाठी दोन सभागृहे, २०० जणांसाठीचे एक मोठे सभागृह, स्वयंपाकघर, भोजनगृह अशा व्यवस्था यामध्ये असतील. चारही मजल्यांच्या slabs चे काम पूर्ण झाले असून वीटकाम व अन्य सुविधांचे काम लवकरच पूर्ण होईल. डिसेंबर २३ अखेरीस बांधकाम पूर्ण होऊन मार्च २४ पर्यंत केंद्र वापरते होण्याच्या दृष्टीने नियोजन झाले आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक निधीपैकी ६०% रक्कम जमा झाली आहे. उर्वरित रक्कम जमा करण्यासाठी येत्या वर्षभरात प्रयत्न करणार आहोत.

### ◈ अन्य गटांसाठी नेतृत्वगुण विकसन सत्रे

समाजातील विविध संस्था, संघटना आणि गट यांच्यासाठी नेतृत्व प्रशिक्षणाची सत्रे या वर्षी घेण्यात आली. त्यामध्ये शिवम प्रतिष्ठान, कराड आयोजित राजकीय (राष्ट्रवादी युवक काँग्रेस) कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात 'कार्यकर्त्याकडून नेतृत्वाकडे' या विषयावर सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील १५० युवा कार्यकर्ते सहभागी होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ITI महाविद्यालयांच्या व अन्य युवक, युवतींसाठी मुलाखत देण्याचे कौशल्य व Up-skilling' या विषयावरील दूरस्थ व्याख्यानात सुमारे ५० विद्यार्थी उपस्थित होते. चिपळूण येथे TWJ या संस्थेतील नवीन नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी 'नेतृत्व विकसन' या विषयावरील एक सत्र झाले. यामध्ये ३० जण सहभागी होते. ज्ञान प्रबोधिनीतील प्रज्ञा मानस संशोधिकेच्या EGMS पदविका गटासाठी 'नेतृत्व विकसनाची ज्ञान प्रबोधिनीची संकल्पना' या विषयावरील तीन सत्रे आणि 'कल्पक शिक्षक नेतृत्व' या विषयावर एक सत्र घेतले.

**वृत्तातील विविध माहिती संदर्भात अधिक तपशील पुढील क्यूआर कोडस् स्कॅन करून पाहता येतील.**

| ग्रामीण परिचय शिबिर अहवाल | नेतृत्व संवर्धन केंद्राचे सादरीकरण |
|---|---|

▲▲▲

# ६. स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्र

स्पर्धा परीक्षा केंद्राचे कामाचे स्वरूप टप्प्या-टप्प्याने बदलून परीक्षेचा आशय शिकवण्यापेक्षा, त्यावर प्रक्रिया करण्याचे शिक्षण देण्याकडे भर देण्याचे नियोजन केले आहे. स्पर्धा परीक्षांना लागणारी कौशल्ये, क्षमता आणि मानसिक गुणांचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे स्पर्धा परीक्षा केंद्राच्या नावात स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्र असा बदल केला आहे.

भवितव्य लेखामध्ये तीन मुख्य उद्दिष्टे मांडली आहेत. त्यातील किती काम एका वर्षात होऊ शकले याची मांडणी सुरुवातीला केली आहे.

**◈ Networking (अधिकारी संपर्क, भेटी दौरे)**

**१. सोलापूर (६ अधिकारी)**

वाच. विवेक कुलकर्णी आणि वाच. सविता कुलकर्णी सोलापूर परिसरातील आपल्या विविध अधिकाऱ्यांना भेटले. सोलापूर मध्ये उपजिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी, तहसीलदार, वित्त व लेखाधिकारी, मंत्रालय कक्ष अधिकारी, पोलीस उप अधीक्षक व महापालिका उपायुक्त यांची भेट झाली. त्यांच्याबरोबर प्रशासनातील सद्य परिस्थिती, आव्हाने, राजकीय घडामोडींचे परिणाम, वारीची तयारी या विषयी मोकळ्या गप्पा झाल्या.

**२. विदर्भ, छत्तीसगड (६४ अधिकारी)**

पूर्व विदर्भ आणि छत्तीसगड येथे ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना वाच. विवेक कुलकर्णी आणि वाच. सविता कुलकर्णी भेटले. पूर्व विदर्भातील दहा जिल्हे (नागपूर, उमरेड, ब्रह्मपुरी, वडसा, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, देवरी, वर्धा) तसेच रायपूर व दुर्ग हे छत्तीसगडमधील दोन जिल्हे अशा एकूण बारा जिल्ह्यांमध्ये प्रवास झाला. विदर्भामधील एमपीएससी आणि यूपीएससीच्या प्रत्येकी २५ आणि छत्तीसगडमध्ये १४ अशा एकूण ६४ अधिकाऱ्यांच्या भेटी झाल्या. यामध्ये काही कुटुंबभेटी, कार्यालय भेटी तसेच दोन मोठे अधिकारी मेळावे झाले. विविध भेटी आणि मेळाव्यांमध्ये सर्व अधिकाऱ्यांशी बोलताना त्यांच्या कामातील महत्त्वाचे टप्पे, यशाचे मानबिंदू तसेच अडचणी अशा मुद्द्यांवर बोलणे झाले.

**३. बीड, अंबाजोगाई (३ अधिकारी)**

वाच. विवेक कुलकर्णी यांच्या बीड येथे दोन आणि अंबाजोगाई येथे एक अशा अधिकारी भेटी झाल्या. तसेच त्यांच्या कुटुंबाबरोबर भेट झाली व त्यांच्या कामाबद्दल व एकूण बीड जिल्ह्यातील प्रश्नांबद्दल चर्चा झाली.

**४. मुंबई-ठाणे (१० अधिकारी)**

भिवंडी येथे वाच. विवेक कुलकर्णी व वाच. सविता कुलकर्णी हे यूपीएससी अधिकारी कस्तुरी सुळेच्या लग्नाला गेले असता तिथे अनेक विद्यार्थी आणि आता विविध पदांवर काम करणारे अधिकारी भेटले. ठाणे महापालिका आयुक्त, उपायुक्त यांची कुटुंबभेट आणि गप्पा झाल्या. अलिबाग तहसीलदार आणि पनवेल तहसीलदार यांच्या घरी कुटुंबभेट, गप्पा आणि रात्री जेवण झाले.

**५. अमृतसर, जम्मू, चंदीगड, हिमाचल प्रदेश (१२ अधिकारी)**

अमृतसर येथे कस्टम आयुक्त, IB अधिकारी यांच्या भेटी होऊन पंजाब प्रश्न आणि सद्य:स्थिती यावर चर्चा झाली. जम्मू येथे दोन महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या आयपीएस अधिकारी आणि कुटुंबभेटी झाल्या. जम्मू-काश्मीर मधील सुरक्षा यावर चर्चा झाली. चंदीगड येथे १९९८ च्या तुकडीचे सचिव पदावरील आयएएस अधिकारी, चंदीगड मेट्रो संचालक, उच्च शिक्षण अधिकारी, अतिरिक्त आयकर अधिकारी, सायबर प्रमुख, आणि एसपी, केंद्र सरकार मध्ये कौशल्य विकास विभागात काम करणारे अधिकारी अशा सगळ्यांबरोबर गप्पा आणि भोजन झाले. हिमाचल प्रदेशामध्ये cantonment भागातील Defense Estate Service अधिकारी यांच्याशी गप्पा झाल्या.

**६. धाराशीव - सोलापूर (९ अधिकारी)**

धाराशीव येथे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या बरोबर निवास आणि भोजन व गप्पा झाल्या. जिल्ह्यामधील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबी आणि अडचणी याविषयी त्यांनी सविस्तर गप्पा मारल्या. सोलापूर येथे कार्यरत असलेले सहा एमपीएससी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, पोलीस उपायुक्त, जिल्हा परिषद वित्त अधिकारी, तहसीलदार आणि कस्टम सेवेतील सहआयुक्त हे सोलापूर प्रबोधिनी मध्ये भेटायला आले असता प्रबोधिनीत मणिपूरचे विद्यार्थी या अधिकाऱ्यांना भेटले. या सर्वांबरोबर राज्य सेवेतील विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. सोलापूर महापालिका आयुक्त निवासात त्यांच्याशी गप्पा झाल्या.

**७. डेहराडून, मसूरी, दिल्ली, अलिगढ (१०३ अधिकारी)**

मसूरी येथील लाल बहादूर शास्त्री प्रशासकीय प्रशिक्षण अकादमी येथे प्रशिक्षण घेणारे १४ मराठी आयएएस अधिकारी तसेच फेज ५ साठी आलेले श्री. विकास खारगे (मुख्यमंत्र्यांचे स्वीय साहाय्यक) यांच्या भेटी व गप्पा झाल्या. डेहराडून येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अधिकारी प्रशिक्षण अकादमी येथे १७ भारतीय वन अधिकाऱ्यांच्या बरोबर गप्पा झाल्या. दोन्ही ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम, त्यातील अद्ययावतता तसेच सेवेतील विविध आव्हानांविषयीही चर्चा झाली आणि अर्थातच दोन्हीही अकादमी खूपच सविस्तर बघायला मिळाल्या. डेहराडून येथे आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांसह कुटुंबभेटी आणि गप्पा झाल्या. दिल्ली येथे महाराष्ट्र सदनमध्ये ४० अधिकाऱ्यांचा मेळावा झाला.

दिल्ली येथे राष्ट्रपती भवन, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय डाक कार्यालय, अलिगढ येथे पोलीस DIG कार्यालय अशा वेगळ्या भेटी झाल्या. दिल्लीमध्ये कार्यरत असलेल्या २००८च्या तुकडीतील सहा आयएएस अधिकाऱ्यांबरोबर एक छोटा मेळावा झाला. तसेच आपल्या अधिकारी नेटवर्क मधील सहा ज्येष्ठ mentor अधिकाऱ्यांबरोबर एकत्र गप्पा झाल्या. अलिगढ येथे दोन अधिकारी कार्यरत आहेत, त्यांच्या घरी निवास आणि गप्पा झाल्या.

वर्षभरात दौऱ्यांच्या माध्यमातून एकूण २०७ अधिकारी भेटी झाल्या. तसेच अन्य अनौपचारिक कार्यक्रम, भेट यामध्ये सुमारे २५ अधिकारी भेटी झाल्या.

### ◈ क्रिटिकल थिंकिंग प्रशिक्षणे

१. राजकीय क्षेत्रामध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या सदस्यांसाठी DISOM या संस्थेतर्फे वर्षभराचा नेतृत्व प्रशिक्षण वर्ग घेतला जातो. त्यामध्ये तीन दिवस क्रिटिकल थिंकिंग कौशल्य प्रशिक्षण वर्ग हिमाचल प्रदेशात पालमपूर येथे संवेदना संस्थेत वाच. सविता कुलकर्णी, वाच. विवेक कुलकर्णी, श्री. अमोल फाळके आणि डॉ. दीपक गुप्ते या चौघांनी घेतला.

२. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतील शालेय पदविका वर्गाच्या शालेय समुपदेशकांसाठी तीन दिवसांचा क्रिटिकल थिंकिंग प्रशिक्षण वर्ग वाच. सविता कुलकर्णी, श्री. अमोल फाळके आणि डॉ. दीपक गुप्ते या तिघांनी घेतला.

### ◈ स्पर्धात्मक अभिवृत्ती मापन चाचणी

स्पर्धा परीक्षेला आवश्यक असलेल्या बौद्धिक क्षमता, अभ्यास कौशल्य, आणि मानसिक गुणाची चाचणी करून त्याच्या आधारे सद्यःस्थितीचा अंदाज घेऊन परीक्षेचा निर्णय घेण्यास मदत व्हावी म्हणून पाच चाचण्यांची एक battery तयार केली आहे. ती दूरस्थ उपलब्ध करून त्याच्या आधारे समुपदेशन केले जाणार आहे. स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेताना याचा उपयोग होईल.

### ◈ विशेष उपक्रम

#### १. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पत्नींचे मेळावे

ज्ञान प्रबोधिनीतील अधिकाऱ्यांच्या भेटी किंवा मेळावे या प्रसंगी त्यांच्या पत्नीची भेट होत असते. असे लक्षात आले की या मुली उच्चशिक्षित आहेत, सुसंस्कारित आहेत पण नवऱ्याच्या बदलीमुळे लग्नानंतर स्थिर होऊ शकत नाहीत. त्यांच्या करिअरचे प्रश्न निर्माण होतात. नवऱ्याची आव्हानात्मक नोकरी असल्यामुळे घरातल्या अनेक आव्हानांना पत्नीला एकटे सामोरे जावे लागते, तेही अगदी नवीन राज्यात. अशावेळी मानसिक, भावनिक, बौद्धिक आधार हवा असतो. ही गरज लक्षात घेऊन ज्ञान प्रबोधिनी परिवारातील अधिकाऱ्यांच्या पत्नींचा व्हॉट्स्ॲप ग्रुप करण्यात आला. त्यात ६० जणी सहभागी आहेत. प्रत्येक बैठकीला २५ ते ३० इतकी उपस्थिती असते. ज्येष्ठ अधिकारी नीलकंठ आव्हाड, पंजाब यांच्या पत्नी प्राजक्ता आव्हाड आणि वाच. सविता कुलकर्णी या गटासाठी अधिमित्र म्हणून काम करतात. आत्तापर्यंत या गटाच्या चार दूरस्थ बैठकी झाल्या. यामध्ये प्रत्येक वेळी दोन किंवा तीन जणी आपले बदल्या आणि करियर विषयीचे अनुभव सांगतात अन् त्यातल्या अडचणी मांडतात. पालकत्व या विषयावर देखील चर्चा सुरू केली आहे.

#### २. कला व ताण व्यवस्थापन तंत्र - कार्यशाळा

ज्ञान प्रबोधिनी कला गटाच्या साहाय्याने डॉ. शीतल हरपळे यांचे 'कला व ताण व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. ताण म्हणजे काय, कलेच्या माध्यमातून ताणाचे कसे व्यवस्थापन करावे याचे तंत्र समजावून देण्यात आले. यामध्ये "४A" वर भर देण्यात आला. १) Avoid, २) Alter, ३) Accept, ४) Adapt.

#### ३. अधुरा नाट्यप्रयोग

अधुरा या हिंदी एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले होते. नाटकाचे लेखन बंगलोर येथील नाट्य संस्थेचे सुरंजय पाटील व विवेक विजयकुमारन यांनी केले व नाटकचे सादरीकरण विवेक विजयकुमारन यांनी केले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना अनुभवास येणारे चढउतार याचे सादरीकरण केल्यामुळे मुलांना ते नाटक आपलेसे वाटले.

### ◈ अभिनंदन

१. केंद्रीय लोकसेवा आयोग २०२२ परीक्षेचा अंतिम निकाल लागला असून केंद्रातील नऊ विद्यार्थी अंतिम यादीमध्ये निवडले गेले.
   १. वसंत दाभोळकर, २. दिव्या गुंडे,
   ३. आशिष पाटील, ४. लोकेश पाटील,
   ५. मानसी साकोर, ६. श्रुती कोकाटे,
   ७. अक्षय नेर्ले, ८. सागर देडे, ९. अतुल ढाकणे

२. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अंतिम परीक्षेत (CRPF) केंद्राचे सहा विद्यार्थी अंतिम यादीमध्ये निवडले गेले.

३. केंद्राची २००८ च्या यूपीएससीच्या तुकडीची विद्यार्थिनी श्रीमती संपदा मेहता (IAS) यांची मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वीय सचिव म्हणून नियुक्ती झाली.

### ◈ नियमित उपक्रम

#### १. यूपीएससी नियमित वर्ग २०२२-२३

यूपीएससीची या वर्षी Facilitation तुकडी झाली. ज्या विद्यार्थ्यांनी पदवी पूर्ण केलेली आहे व प्राथमिक तयारी पूर्ण झालेली आहे अशा विद्यार्थ्यांसाठी हा वर्ग असतो. मुलाखत घेऊन या वर्गासाठी विद्यार्थ्यांची निवड केली गेली. एकूण ६५ विद्यार्थ्यांनी वर्गाला प्रवेश घेतला. केंद्राच्या माजी विद्यार्थ्यांनी विषय परिचय सत्रे घेतली आणि अधिमित्र म्हणूनही काम केले. सराव परीक्षा, स्व-नियंत्रण, वैयक्तिक समुपदेशन, कौशल्य प्रशिक्षण, क्षमताविकसन, वृत्तीघडण, उपासना आणि चिंतन असे उपक्रम झाले.

* **वर्षारंभ उपासना –** वर्षारंभ उपासनेला नव्या वर्गातील विद्यार्थी, अभ्यासिकेतील विद्यार्थी व नवीन वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक प्रत्यक्ष येऊन तर काही पालक दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. वैभव निंबाळकर (आयपीएस, आसाम) उपस्थित होते. त्यांनी कामातील काही अनुभव सांगितले. तसेच आसाम येथे झालेल्या गोळीबारात त्यांना गोळी लागली, त्याचेही अनुभव सांगितले.
* **सीमावर्ती राज्य संपर्क गट व राष्ट्रीय एकात्मता गटचर्चा** – मा. वैभव निंबाळकर (आयपीएस, आसाम) यांनी राष्ट्रीय एकात्मता कार्यादिशा गट, NINS SPG आणि सीमावर्ती प्रांतातील काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी मोकळेपणाने संवाद साधला.
* **वैयक्तिक समुपदेशन सत्र –** नियमित वर्गातील विद्यार्थ्यांचे वैयक्तिक समुपदेशन प्रत्येकी अर्धा तास वाच. सविताताई कुलकर्णी यांनी घेतले. सर्व विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाच्या तीन फेऱ्या झाल्या.
* **पालक मेळावा –** पालक मेळाव्यामध्ये एकूण २९ विद्यार्थ्यांच्या ४८ पालकांनी प्रत्यक्ष प्रबोधिनीत येऊन सहभाग घेतला, तर २२ विद्यार्थ्यांचे ३९ पालक दूरस्थ पद्धतीने पालक मेळाव्यात सहभागी झाले. या मेळाव्यामध्ये वाच. सविताताईंनी केंद्राच्या प्रशिक्षण पद्धतीबद्दल संवाद साधला व वाच. विवेक कुलकर्णी यांनी एकूण स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व त्यासाठीच्या तयारीमध्ये पालकांची व इतर कुटुंबियांची भूमिका या विषयी पालकांशी संवाद साधला. मृणाली जोशी (आयएएस, उत्तर प्रदेश) हिने विद्यार्थ्यांच्या तयारीत पालकांची भूमिका या विषयी तिचे अनुभव सांगितले.
* **UPSC 0th Attempt** - यूपीएससी मुख्य परीक्षा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यावर परीक्षा झाली. एकूण १२५० गुणांचे पाच अनिवार्य पेपर झाले. (प्रत्येकी २५० गुण). यूपीएससी पूर्वपरीक्षेसाठी १३ सराव चाचण्यांची मालिका झाली.
* **साप्ताहिक उपासना –** शनिवारी नियमित वर्ग व अभ्यासिका सदस्य यांची साप्ताहिक उपासना असते. उपासनेच्यावेळी चिंतनात वाच. साविताताई व वाच. विवेक कुलकर्णी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर संवाद साधतात.

**२. यूपीएससी प्रेरणा वर्ग**

यूपीएससी मुलाखत तयारीसाठी प्रेरणा वर्गाला ३८ विद्यार्थी होते. मुलाखत कशी द्यावी, सहा गट मुलाखती, यूपीएससी अंतिम मुलाखत दिलेल्या विद्यार्थ्यांची तीन अनुभवकथने, महत्त्वाच्या विषयांवरच्या चित्रफिती दाखवून त्यावर चर्चा आणि विद्यार्थ्यांनी तयारी करून दिलेले सेमिनार इत्यादी सत्रे यामध्ये झाली. वाच. राजीव रानडे सरांबरोबर सर्व ३८ विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मार्गदर्शन झाले. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय कार्यालय / अधिकारी भेटी, मुलाखत सराव इत्यादीचे नियोजनही केले होते. सराव मुलखतीच्या तीन फेऱ्या झाल्या.

▲▲▲

## भावपूर्ण श्रद्धांजली!!

१. श्री. त्र्यं. ना. तथा बाळासाहेब लिमये हे ज्ञान प्रबोधिनीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक ज्येष्ठ सदस्य होते. वृत्तांत वर्षात त्यांचे दुःखद निधन झाले. श्री. लिमये प्रबोधिनीच्या तांत्रिक कौशल्य उपक्रमांचे वेळोवेळी मार्गदर्शक होते. सोल्डरिंग स्कूल, उद्वाहक विभाग यातील कामांमध्ये त्यांनी भाग घेतला. अलिकडच्या काळात फलप्रक्रिया उद्योग, सेंद्रीय शेती इ. वरही ते संशोधन व मार्गदर्शन करीत असत. सुमारे ९० वर्षे आयुर्मान लाभलेल्या या सततोद्योगी अध्यापकास श्रद्धांजली!

२. ज्ञान प्रबोधिनीचे सदस्य श्री. अविनाश म. कुलकर्णी यांचे वृत्तांत वर्षात अपघाती दुःखद निधन झाले. ते प्रबोधिनीच्या व्यापार, उद्योग विभागात बंगलोर कार्यालयाचे काम मोठ्या धडाडीने पाहात होते. १९८५ नंतर अन्य ठिकाणी नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने गेलेले असले तरी प्रबोधिनीशी त्यांचा संबंध शेवटपर्यंत टिकून राहिला होता. मोटार कार अपघातात मेंदूस इजा झाल्यामुळे त्यांचे अकाली निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

३. बीड जिल्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदाम भोंडवे यांचे दि. २१ फेब्रुवारी २०२३ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. त्यांनी बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील डोमरी येथील स्वतःच्या गावात ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी १९८६ मध्ये सोनदरा गुरुकुलाची स्थापना केली होती. त्यांनी व त्यांच्या पत्नी सिंधूताई यांनी या गुरुकुलाच्या कामासाठी अपार कष्ट करत पूर्णपणे वाहून घेतले होते. गुरुकुलाच्या विद्यार्थ्यांमध्ये सुदाम भोंडवे हे 'काका' म्हणून परिचित होते तर सिंधुताई या 'मामी' म्हणून परिचित होत्या. सिंधुताई भोंडवे, त्यांचा स्नुषा कार्तिकी भोंडवे व नात आनंदी यांचेही या अपघातात दुर्दैवी निधन झाले. प्रबोधिनीशी जवळून संबंध असणाऱ्या या सर्वांचे दुर्दैवी निधन ही प्रबोधिनी परिवारातील सर्व स्नेहींसाठी देखील धक्कादायक घटना आहे.

४. निगडी केंद्राच्या साहाय्यक समितीचे सुरुवातीपासूनचे सदस्य श्री. व्यंकटेश पांडे तथा पांडे काका यांचे दीर्घ आजाराने दि. ४ मार्च २०२३ रोजी दुःखद निधन झाले. निगडी प्राधिकरण भागात चांगल्या शैक्षणिक संस्थेचे काम सुरू व्हावे यासाठी स्थानिक लोकांनी केलेल्या कामात पांडे काका अग्रस्थानी होते. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!!

# ७. प्रज्ञा मानस संशोधिका

प्रज्ञा मानस संशोधिका विविध उपक्रमांद्वारा २०२२-२३ या वर्षात पन्नास हजारांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचली. यात संशोधनातील प्रतिसादी व्यक्तींसोबतच थेट उपक्रमातील सहभागी लाभार्थींपर्यंत तसेच विद्यावाचस्पती पदवी व अन्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी अशी मोठी व्याप्ती आहे.

**◈ संशोधन उपविभाग**

**१. ओळख स्पर्शाची 360° (ओळख स्पर्शाची)**

बजाज फायनान्सने साहाय्य केलेल्या या प्रकल्पात १ली ते ८वीच्या मुलांसाठी, तसेच पालक आणि संस्थाचालकांसाठी लैंगिक दुर्वर्तन या विषयाच्या सत्रांचे कृतिशील पद्धतीने नियोजन आणि आखणी झाली. पुणे परिसरातील ६०+ शाळांमध्ये, १३३ क्षेत्र प्रशिक्षक २७,८४० मुलांपर्यंत पोहोचले. तसेच ३७००+ पालक आणि पाच शाळांमध्ये शिक्षक, इतर कर्मचारी यांच्यासाठी आत्तापर्यंत हे सत्र झाले आहे. यानिमित्ताने 'इटुकली पिटुकली-मुले आम्ही धिटुकली' हे मुलांसाठी लिहिलेले गीत अतिशय सुंदर प्रकारे animation तंत्राचा वापर करून तयार झाले. प्रकल्पाच्या 'खजिना गोष्टींचा' या पॉडकास्ट सिरीजद्वारा चार गोष्टींचे पॉडकास्ट प्रसारित करण्यात आले.

**२. संयम**

ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट सोबत चालू असलेल्या या प्रकल्पाच्या पुढील टप्प्यात या शैक्षणिक वर्षात पुण्यातील एकूण ५६ शाळा आणि एका वस्तीमधून ८,५८७ विद्यार्थ्यांपर्यंत संयमचे विषय पोहोचविण्यात यश आले आहे. यासाठी १९५ प्रशिक्षकांनी काम केले. एकूण २६६ सत्रातून ७०० पेक्षा अधिक पालकांपर्यंत विषय पोहोचला. या प्रकल्पातील प्रदत्तावर आधारित तीन संशोधन निबंध लिहिले गेले असून, नियतकालिकात प्रसिद्धीसाठी पाठविण्यात आले आहेत.

**३. डेरवण येथील संस्थेच्या कामाचा चिकित्सक अभ्यास**

चिपळूणजवळील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट (SVJCT-डेरवण) या संस्थेने गेल्या पंचवीसहून अधिक वर्षांमध्ये ग्रामीण भागातील समाजासाठी शिक्षण, वैद्यकीय उपचार व दारिद्र्य निर्मूलनासाठी केलेल्या विविध प्रकारच्या कामाचा तेथील स्थानिक लोकांच्या जीवन गुणवत्तेवर आणि परिसराच्या सामाजिक-आर्थिक विकासावर झालेल्या परिणामांचा साक्षेपी (Critical) अभ्यास करणे हा या प्रकल्पाचा हेतू होता. त्यासाठी विविध प्रकारच्या प्रश्नावल्यांचा वापर करून १५ जणांनी रत्नागिरी जिल्ह्यातील आठ गावांतून ७९० प्रतिसादकर्त्यांचा प्रदत्त त्या-त्या गावातून गोळा केला. तसेच रुग्णालय, शाळा आणि स्थानिक परिसरातून संचालक आणि विश्वस्तांपासून वैद्यक विशेषज्ञ/अध्यापक/प्रशिक्षक/प्रकल्प प्रमुख अशा सुमारे १५० संक्षिप्त किंवा दीर्घ मुलाखती झाल्या. या संख्यात्मक आणि गुणात्मक प्रदत्ताचे योग्य ते विश्लेषण करून संस्थाचालकांना त्याचा अहवाल सादर केला गेला. डॉ. सुवर्णा पाटील (वैद्यकीय संचालक, डेरवण हॉस्पिटल) यांच्या सहकार्याने हा प्रकल्प पूर्ण झाला.

**४. कोविड परिस्थितीतील महिला अधिकाऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा अभ्यास**

राष्ट्रीय महिला आयोगाने २०-२१ मध्ये संमत केलेला MKSSS-SSMM सोबतच्या प्रकल्पात महाराष्ट्रभरातील पोलीस (१५३) व प्रशासनातील (२०१) अशा एकूण ३५४ महिला अधिकाऱ्यांचा प्रदत्त गोळा झाला. या सर्व अधिकाऱ्यांसाठी वाच. अनघा लवळेकर आणि डॉ. दीपक गुप्ते यांनी 'विचारभान' ही दूरस्थ कार्यशाळा दोन वेळा घेतली. राष्ट्रीय महिला आयोगाकडून आलेल्या अभिप्रायावरून सांख्यिकीय विश्लेषणात भर घालून सुधारित प्रकल्प अहवालाचे काम पूर्ण करून तो महर्षी कर्वे संस्थेला सादर केला.

**५. विद्यावाचस्पती संशोधन केंद्र**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या विद्यावाचस्पती संशोधन केंद्रातील विद्यार्थी वाच. धनश्री सोवनी, वाच. रणजितसिंह भोगल आणि वाच. कीर्ती गोहेल या तिघांना विद्यावाचस्पती पदवी मिळाली. २२-२३ या वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या २२ विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती कार्यशाळा झाली. त्याशिवाय विद्यापीठातून संशोधन विषय मान्य झालेल्या सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक यांची एक संयुक्त बैठक दि. १७ फेब्रु. २३ रोजी आयोजित केली होती.

**६. परिसंवाद/ परिषदा**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद/ परिषदांमध्ये संशोधकांनी एकूण आठ निबंधांचे सादरीकरण केले.

**◈ मनोमापन शास्त्र उपविभाग**

**१. रचना अभिक्षमता मापन चाचणी**

Design Thinking Aptitude मोजण्यासाठी 'रचना' अभिक्षमता मापन चाचणी निर्मितीचे काम २०१८ ते २०२२ या कालावधीत शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यात आले. प्रमाणीकरणासाठी २०० विद्यार्थ्यांचे प्रदत्त संकलन झाले. ही चाचणी वापरून डिझाइनिंगच्या क्षेत्रातील अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आणि समुपदेशनाचे काम सुरू झाले आहे.

**२. चाचण्या आढावा**

पूर्वी केलेल्या आढावा वृत्ताचा मागोवा आणि २०१८ ते २०२२ या पाच वर्षांत विभागात विकसित केलेल्या व विक्रीसाठी

### ◈ वेगळा प्रयोग

नांदेड शहरात गेली दोन वर्षे काही संस्थांसाठी विभागातर्फे प्रशिक्षण घेत आहोत. तेथील गरज लक्षात घेता या वर्षी प्रथमच प्र.मा.सं. आणि अॅड एचआर कन्सल्टन्सी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील सामाजिक संस्था, मोठे व मध्यम व्यापारी, राजकीय व्यक्ती अशांकरिता प्र.मा. सं. नांदेड शहरात काय काय पद्धतीची सेवा पुरवू शकते यावर सत्रे आयोजित केली होती. याचा पुढचा टप्पा म्हणून तीन दिवस स्थानिक नोकरदार, व्यावसायिक यांच्यासाठी पाच तासांचा 'विचार कौशल्ये' प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रशिक्षणात तीन दिवसांत १२ संस्थांमधून ९० जण सहभागी झाले. 'अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची इथे खूप गरज आहे' असे नंतर अनेकांनी भेटून सांगितले.

उपलब्ध असलेल्या चाचण्यांच्या विक्रीचा एक मागोवा घेण्यात आला. तसेच सर्व उपविभागांतून या चाचण्यांचा त्यांच्या कामातील सध्याचा वापर, भविष्यातील गरज व तेथे तयार झालेल्या चाचण्या याविषयी माहिती एकत्र केली आहे.

### ◈ मानव संसाधन विकास विभाग

संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये चाचणीकाम आणि प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. तसेच काही विद्यार्थ्यांचे सुद्धा चाचणीकाम झाले. या वर्षात विभागातर्फे एकूण ५४७ व्यक्तींचे मनोमापन आणि ५८७ व्यक्तींचे प्रशिक्षण झाले. त्याशिवाय विद्यार्थी गटातील चाचणी काम १३४३ इतके झाले. बजाज ऑटो लिमिटेड, किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड, ऑरस टेक प्रा. लि., विवेकानंद रुग्णालय, लातूर, परिवार सुपर मार्केट, क्लासिक फॅशन, गुरुजी रुग्णालय, नेताजी बोस महविद्यालय, वॉव ग्राफिक डिझाईन - सर्व नांदेड, इत्यादी ठिकाणी काम झाले.

### ◈ अभिक्षमतामापन, व्यवसाय मार्गदर्शन (संगणकीय चाचणी सेवा)

१. एकूण ५०००+ विद्यार्थ्यांसाठी iA, २००+ swayam आणि १५० iTap साठी चाचणीकाम झाले.
२. वर्षभरात दोनदा Career Advisor Training Programme (CATP) चे तीन दिवसीय प्रशिक्षण झाले. एकूण ३१ जणांचे प्रशिक्षण झाले.
३. एमकेसीएल सोबत अभिक्षमता मापन चाचणीसाठी एक वर्षाचा करार करण्यात आला.
४. एमकेसीएल ट्रेनर्स (भांडूप आणि गोरेगाव) यांच्यासाठी दि. १७ जानेवारी २३ रोजी Orientation programme झाला.

### ◈ क्षमता विकसन उपविभाग

**१. बाल विकास शिबिर**

आभासी व प्रत्यक्ष अशा दोन्ही पद्धतींनी हे शिबिर घेतले गेले. चारही शिबिरांमध्ये मिळून २६२ मुले सहभागी झाली होती. निरंतर बाल विकास उपक्रमामध्ये ६० मुलांनी सहभाग घेतला.

**२. सुजाण पालकत्व कार्यशाळा**

सुजाण पालकत्व कार्यशाळा पूर्णपणे आभासी पद्धतीने घेतली गेली. या कार्यशाळेला एकूण १५ पालक दंपती उपस्थित होते.

**३. प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा**

नागरीवस्ती अभ्यास गटातील 'बाल विकास केंद्र' यातील प्रशिक्षक, 'नवचेतना' प्रकल्पांतर्गत चाकण येथील 'नवोन्मेष' शाळेतील शिक्षक आणि हराळी येथील 'आनंद शाळा' आणि 'विकासिका' प्रकल्पातील प्रशिक्षकांसाठी व स्वेच्छेने शिकू इच्छिणाऱ्यांसाठी अशा पाच कार्यशाळा मिळून एकूण १४८ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

**४. नवचेतना प्रकल्प** (CSR)

हा एडीएम फौंडेशनने अर्थसाहाय्य केलेला प्रकल्प आहे. चाकण येथील 'नवोन्मेष' शाळेतील ५वी ते ७वीच्या १६७ विद्यार्थ्यांचा या प्रकल्पात सहभाग होता. १६ प्रशिक्षकांनी २४ सत्रे घेतली.

**५. सक्षम प्रकल्प** (CSR)

मुळशी परिसरातील कातकरी समाजातील बाल, कुमार (१२०) आणि युवा (२०) गटाच्या बौद्धिक व सामाजिक विकासासाठी हा प्रकल्प रोहन बिल्डर्सच्या अर्थसाहाय्यातून राबवला जातो. मुळशी भागातील सहा कातकरी वस्त्या व वनवासी कल्याण आश्रमाकडून चालवले जाणारे 'माले' येथील वसतिगृह अशा ठिकाणी ही सत्रे घेतली जातात. या प्रकल्पात सहभागी मुलांच्या पालकांची एकत्रित पालक सभा देखील घेतली गेली.

**६. प्रज्ञा-मैत्र**

प्रज्ञा-मैत्रची सहावी तुकडी प्रत्यक्ष व दूरस्थ पद्धतीने ऑगस्ट २२ मध्ये आणि 'Parenting Children with High-Potentials Lecture Series' ही तुकडी प्रथमच इंग्रजी माध्यमातून दूरस्थ पद्धतीने सप्टेंबर २२ मध्ये सुरू झाली. एकूण ५२ कुटुंबांचा यात सहभाग आहे. जुलै आणि ऑक्टोबरच्या सत्रात मिळून एकूण अकरा मैत्रेय प्रज्ञावंततेचा अनुभवत असलेला स्वाध्याय गटात मांडणार आहेत.

**७. प्रज्ञा प्रबोधन वर्ग**

उच्च क्षमता असणाऱ्या ५वी ते १०वीतील विद्यार्थ्यांसाठीच्या या प्रकल्पात २२-२३ या शैक्षणिक वर्षात किशोर गटात (५वी व ६वी) ४६ तर कुमार गटात (७ वी, ८वी व ९वी) ४२ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कुमार गटाच्या अभ्यासक्रमामध्ये स्वयंअध्ययन कौशल्य, विषयाधारित अभ्यासक्रम व मानसिक विकसन याचे नियोजन केले होते. तीसहून अधिक पालकांना दूरस्थ सत्रांमधून REBT ही संकल्पना अनघा पंडित यांनी समजावून सांगितली. कुमारगटासाठी युवक-युवती विभागाच्या मदतीने दल सुरू करण्यात आले. दोन्ही गटांचे निवासी शिबिर ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्रात आयोजित करण्यात आले होते. किशोर गटासाठी 'सृजनशीलता' व कुमार गटासाठी नेतृत्वविकसन, सामाजिक जाणीव संवर्धन व विद्याव्रत संस्कार हे शिबिराचे उद्दिष्ट होते.

### ◈ मार्गदर्शन- समुपदेशन

चाकण येथील महिंद्रा आणि महिंद्रा या कंपनीतील कामगारांच्या वैयक्तिक समुपदेशन करण्याच्या प्रकल्पात १९ जणांचे समुपदेशन करण्यात आले. प्रत्येक कामगाराचे आधी मनोमापन करण्यात आले. प्रत्येकाची समुपदेशनाची सात ते आठ सत्रे पूर्ण झाली.

उपचारात्मक अध्ययन (Remedial teaching) ही सेवा एप्रिल २२ पासून सुरू करण्यात आली. सध्या ११ विद्यार्थी उपचारात्मक अध्ययन घेत आहेत. त्यांच्या शालेय प्रगतीमध्ये सकारात्मक बदल दिसून आले आहेत. पालकांसाठी 'आम्ही, मुले आणि आमचा screentime' कार्यशाळा घेतली गेली (संख्या ४२). यात संवाद, स्व-नियंत्रण अशा विषयांवर सत्रे घेतली गेली. अभ्यास कसा करावा, याची कल्पना नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षात दोनवेळा स्व-अभ्यास कौशल्य कार्यशाळा झाली.

ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूरसाठी मार्गदर्शन आणि समुपदेशन विभागातर्फे माध्यमिक प्रशालेतील मुलांसाठी समुपदेशन/सल्ला सेवा सुरू केली. मुलांच्या गरजांप्रमाणे त्यांचे मानसशास्त्रीय मापन केले गेले. शिक्षकांना उपचारात्मक अध्ययनासाठीचे प्राथमिक प्रशिक्षण दिले गेले आहे.

### ◈ शैक्षणिक उपविभाग

सन २२-२३ पासून 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' संलग्न दोन्ही पदविका अभ्यासक्रमांचा अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात आला. Education of Gifted: Methods and Strategies अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आणि त्याचे नाव Post Graduate Diploma in Psychology and Nurture of Giftedness असे करण्यात आले. अभ्यासक्रमामध्ये भारतीय शिक्षणपद्धतीवरील भर वाढविण्यात आला आहे.

या वर्षी महाराष्ट्रातील नऊ पेक्षा अधिक जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला. संभाषण व स्वयंअध्ययन कौशल्य, भावनिक व्यवस्थापन, REBT उपचार पद्धती, चिकित्सात्मक विचार विकसन, Mindfulness, well-being, प्रेरणा, लैंगिकता प्रशिक्षण, सर्वांगीण बालविकास, Change making, Facilitation skills इ. विषय अभ्यासक्रमात होते. दोन्ही पदविकांच्या मिळून २७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त प्रत्यक्ष समाजाभिमुख कामांमध्ये सहभाग व वर्गातील शिक्षणाचे उपयोजन देखील झाले.

#### १. शालेय मानसशास्त्र पदविका : माजी विद्यार्थी संमेलन

दि. १४ जानेवारी २३ रोजी 'शालेय मानसशास्त्र पदविका' माजी विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे संबंध दृढ व्हावेत, तसेच या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रबोधिनीचे काम विस्तारावे, या उद्देशाने सर्व २७ तुकड्यांमधील विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. सुमारे १५० विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. ज्यांनी शिक्षण आणि मानसशास्त्र क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे अशा डॉ. मालती कलमाडी, वैशाली देशपांडे, शुभदा पेंढारकर आणि श्री. अभय ठकार, या चार माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव सांगितले. ज्ञान, तळमळ, बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्र प्रथम ही वृत्ती त्यांना प्रबोधिनीतून मिळाली याचा विशेष उल्लेख त्यांनी केला. वाच. अजित कानिटकर यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि आजचा मेळावा म्हणजे मूल्यांचे, समविचारी व्यक्तींचे व विद्यार्थी-शिक्षक एकत्र काय शिकले याचे पुनर्मिलन आहे असे यथार्थ वर्णन केले. माजी विद्यार्थ्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी काम करून दरी दूर करण्याचे आवाहन त्यांनी केले. वाच. अनघा लवळेकर यांनी या विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा मानस संशोधिकेसोबत काम करण्याच्या भविष्यातील संधी विशद केल्या.

#### २. वर्षारंभ समारंभ

विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या उद्देशाबाबत स्पष्टता येण्यासाठी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला वर्षारंभ उपासना आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांनी विद्यार्जन 'व्रत' म्हणून करावे अशी अपेक्षा गुरू या उपासनेत व्यक्त करतात. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय ढोले (संचालक, इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेज सेंटर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) उपस्थित होते.

#### ३. कौतुक समारंभ

करोना साथीमुळे १९-२० व २०-२१ च्या सर्व विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ होऊ शकला नव्हता, तो या वर्षी केला. यासाठी पुणे विद्यापीठाचे माजी मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. एम्. शेजवळ उपस्थित होते.

### ◈ अन्य महत्त्वाचे

१. मा. वाच. उषाताई खिरे व वाच. धनश्री सोवनी यांच्या Intelligence, Creativity and Giftedness : An Indian Perspective या पुस्तकाची प्रत अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातील ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ डॉ. रॉबर्ट स्टर्नबर्ग यांना दिली होती. डॉ. स्टर्नबर्ग हे ५० हून अधिक वर्षे intelligence व giftedness या संकल्पनांवर संशोधन करीत आहेत. पुस्तक वाचून त्यांचा सकारात्मक अभिप्राय धनश्रीताई सोवनी यांना इमेलद्वारे आला. त्यांनी बुद्धीच्या भारतीय व्यापक संकल्पनेची चालू काळातील प्रासंगिकता व महत्त्व अधोरेखित केले आहे. पाश्चात्य संशोधकांकडून भारतीय संकल्पनांना मिळणारी दाद विशेष आनंद देणारी आहे.

२. सहजीवनाची पाऊलवाट, Role of Psychology and Psychometric Tools for the HR Professionals, My promise to myself अशा विविध विषयांवर श्री. शिरीष जोशी, वाच. अनघा लवळेकर, डॉ. दीपक गुप्ते, गौरी कुलकर्णी अशा सदस्यांची विविध ठिकाणी व्याख्याने झाली,

३. जानेवारी २२ ते डिसेंबर २२ या काळात अंतर्गत गुणवत्तावाढ या दिशेने सर्व सदस्यांसाठी विविध प्रशिक्षणे झाली.

▲▲▲

# ८. संस्कृत संस्कृति संशोधिका

## ◈ पौरोहित्य उपविभाग

या वर्षभरात ५,५०० पेक्षा अधिक संस्कार संत्रिकेद्वारा ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने झाले. यामध्ये मुख्यत: श्राद्ध व वेदपूजन या संस्कारांची संख्या जास्त असते. विवाह, उपनयन, वास्तुशांती याही संस्कारांची संख्या आता वाढती आहे. पुणे व डोंबिवली येथील ४५ महिला व पुरुष पुरोहितांचा गट संत्रिकेच्या माध्यमातून मागील वर्षभर कार्यरत होता. महाराष्ट्रातील प्रशासकीय विभागातील अमरावती, औरंगाबाद, नागपूर विभागात तुलनेने प्रबोधिनी पद्धतीने संस्कार कमी होतात. पण विवाह संस्काराच्या माध्यमातून प्रबोधिनीची संस्कार पद्धती हळूहळू इथे पोहोचते आहे. गुजराथ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू येथेही प्रबोधिनीचे संस्कार पोहोचत आहेत. आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरदेशीय, आंतरप्रांतीय विवाहासाठी वधू-वर ज्ञान प्रबोधिनीच्या 'सार्थ विवाह संस्कारपद्धती' कडे वळत आहेत. परदेशात दूरस्थ पद्धतीने होणाऱ्या संस्कारांची संख्याही वाढती आहे.

**१. विशेष अनुभव : संस्कारात् द्विज उच्यते।**

श्री सहस्त्रार्जुन सोमवंशीय क्षत्रिय समाजातर्फे सामूहिक उपनयन संस्कार दि. २ डिसेंबर २२ रोजी आयोजित केला होता. प्रबोधिनी पद्धतीने या संस्काराचे पौरोहित्य करण्यात आले. असा कार्यक्रम संत्रिकेतर्फे प्रथमच करण्यात आला. श्री सहस्त्रार्जुन सोमवंशीय क्षत्रिय समाजाचे प्रतिनिधी कार्यक्रम निश्चितीसाठी विभागात भेटले व त्यांनी त्यांच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

संत्रिकेसाठी सामूहिक उपनयन संस्काराचे सूत्र संचालन करणे अवघड नव्हते. पण बटूंचा वयोगट ८ ते ३५ वर्षे असा होता. प्रबोधिनीच्या पद्धतीने संस्कार सार्थ होणे महत्त्वाचे असते. त्याचा विचार करता वय ८ ते १६ व १७ ते ३५ असे दोन गट केले. दोन्ही गटांसाठी पुरोहिता वाच. सुजाता बापट व सौ. सुरेखा लिखिते यांनी दूरस्थ पद्धतीने पोथीचा आशय समजावून सांगणारे सत्र संस्कारापूर्वी घेतले. पालकांच्या प्रश्नांना उत्तर मिळावे यासाठी १. मुंज का करावी आणि केव्हा करावी?, २. मुंज कशी होणार आहे?, ३. मुलींची मुंज करता येते का? अशा तीन ध्वनिचित्रफिती यूट्यूबवर प्रकाशित केल्या गेल्या. संस्काराच्या आदल्या दिवशी सर्व तयारी पुरोहितांनी केली. त्यामुळे प्रत्यक्ष संस्काराच्या दिवशी ५७ मुले आणि दोन मुलींचा उपनयन संस्कार उत्साहपूर्ण वातावरणात व्यवस्थित झाला. संत्रिकेचे २४ सदस्य, दोन संवादिनी सदस्या आणि दोन युवती विभाग सदस्या या संस्कारात पौरोहित्य मार्गदर्शनासाठी उपस्थित होत्या. त्यामुळे अन्य संघटनेबरोबर काम, गटकार्यातील सहभाग, नेमके नियोजन व त्यानुसार कार्यक्रम यातून संत्रिकेच्या पुरोहित गटासाठीही हा समृद्ध करणारा अनुभव ठरला.

**२. अन्य महत्त्वाचे**

१. सर्वपित्री अमावास्यानिमित्ताने महालय श्राद्ध (प्रत्यक्ष आणि दूरस्थ पद्धतीने एकूण सहभागी १४०) - सुरेखाताई लिखिते, विद्याश्रीताई पुरंदरे
२. 'एक क्षण आनंदाचा' सामाजिक संस्था चालविणाऱ्या अक्षय भोईटे यांच्या वर्गात सत्यनारायण (२० मुले व दोन ताई उपस्थित) - वाच. मनीषा शेटे
३. सकाळ माध्यम समूहाच्या 'तनिष्का' या महिलांच्या गटात श्री सूक्ताचे महत्त्व या विषयावर व्याख्यान - वाच. आर्या जोशी
४. श्री. विवेक सावंत (अध्यक्ष, MKCL) यांच्या कुटुंबात प्रबोधिनी पद्धतीने विवाह - ऋताताई जोगळेकर, संध्याताई कुलकर्णी
५. नागरीवस्ती मधील युवतीचा प्रबोधिनी पद्धतीने विवाह - मीराताई होळकर
६. ज्ञान प्रबोधिनीच्या शुक्रवार पेठ येथील नवीन वास्तूचे भूमिपूजन - सुरेखाताई लिखिते, मंगलताई म्हांदी
७. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या दुर्गा देसाई hemetology and Oncology च्या वास्तूचे भूमिपूजन - वाच. सुजाता बापट
८. नाळवट (ता.वेल्हे) येथे विहीर लोकार्पण - माधुरीताई करवडे
९. बेटर इंडिया या ई-वृत्तनियतकालिकात Wedding to Funeral - smashing stereotypes या विषयावर महिला पुरोहितेची मुलाखत - चित्राताई चंद्रचूड

## ◈ संशोधन व व्याख्याने

१. 'भारतीय मुस्लीम स्त्रियांना शिक्षणामुळे मिळणारी संधी प्रेरणा व आत्मविश्वास याचा अभ्यास' या प्रकल्पाचे प्रबोधिनी अंतर्गत गटात सादरीकरण झाले. या विषयाला अनुसरून २१ मुस्लिम महिलांच्या मुलाखती असलेला अहवाल मांडण्यात आला. वाच. मनीषा शेटे आणि मानसी बोडस यांनी या प्रकल्पाचे काम केले.
२. वाच. मनीषा शेटे यांचा Kurma in Indian culture हा निबंध प्रकाशित झाला. (Vol.II - felicitation Volume for Dr. P. P. Jogalekar -Animals in Archaeology )
३. अरुणाचल प्रदेशातील इदू मिश्मी आणि आदी जनजातींच्या निधनोत्तर विधीवर आधारित अभ्यास प्रकल्प पूर्ण झाला. या विषयासाठी वाच. आर्या जोशी यांना एशियाटिक सोसायटी, मुंबई यांची शिष्यवृत्ती मिळाली होती.

# ९. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र

## ◈ व्याख्याने व कार्यशाळा

### १. संविधान कार्यशाळा

२८ मे रोजी 'संविधान का आणि कसे समजून घ्यायचे' याला धरून तीन तासांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेमध्ये वेगवेगळे अभ्यासनमुने, उदाहरणे, प्रसंग यातून संविधान कसे वास्तवात उतरते, ते वास्तवात उतरताना नक्की काय अडथळे येतात, यामध्ये आपली काय भूमिका असू शकते या विषयी संवाद झाला. २६ जणांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

### २. वैश्विक मानवी मूल्ये सत्रे आणि विशेष उद्दिष्ट गट

Army Institute of Technology च्या अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षाच्या ३०० विद्यार्थ्यांसाठी वैश्विक मानवी मूल्ये (Universal Human Values) यावर इंग्रजीमध्ये प्रत्यक्ष दोन सत्रे श्री. अमोल फाळके यांनी घेतली. वैश्विक मानवी मूल्ये यावर प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांचा विशेष उद्दिष्ट गट तयार झाला. त्यात १२ जण सहभागी झाले आहेत. या सर्वांच्या सहभागाने अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला गेला. श्री. अमोल फाळके यांनी AICTE तर्फे होणाऱ्या UHV-I, UHV-II, Morning Sessions या प्रशिक्षणवर्गांमध्ये सहभाग घेऊन ते पूर्ण केले.

### ३. क्रिटिकल थिंकिंग

DISOM संस्थेद्वारे सामाजिक-राजकीय क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्यांसाठी 'क्रिटिकल थिंकिंग' या विषयावर ऑक्टोबर २२ मध्ये हिमाचल प्रदेशात कांग्रा येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून श्री. अमोल फाळके यांनी सहभाग घेतला. तसेच पंजाब, हिमाचल प्रदेश, चंदीगड मध्ये कार्यरत व प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या.

### ४. Learning to Performing

या विषयावर प्रज्ञा मानस संशोधिका आणि सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र याच्या संयुक्त विद्यमाने अभ्यासक्रम तयार करून त्याबद्दलचा प्रस्ताव श्री. आशिष पुराणिक (Vice Principle, BMCC) यांना पाठवला. BMCC ने प्रस्तावाला मान्यता दिली असून पुढील वर्षी हा अभ्यासक्रम राबवला जाईल.

### ५. अन्य महत्त्वाचे

फेब्रुवारी महिन्यात श्री. अमोल फाळके Pune International Centre ने आयोजित केलेल्या पर्यावरण उत्सवात वादविवाद स्पर्धेच्या अंतिम फेरीत परीक्षक म्हणून सहभागी झाले; तसेच 'निवडणुका, लोकशाही आणि प्रशासन' या विषयावर MKCL ने आयोजित केलेल्या परिसंवादात त्यांनी सहभाग घेतला.

## ◈ प्रबोधिनी अंतर्गत साहचर्य

मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी झालेल्या 'Critical Thinking for Counselling' या कार्यशाळेत नियोजक व प्रशिक्षक म्हणून श्री. अमोल फाळके यांनी सहभाग घेतला. नेतृत्व संवर्धन केंद्राच्या आकांक्षा ९च्या विद्यार्थ्यांसाठी 'Critical Thinking' बद्दल नऊ सत्रांची मालिका घेतली. 'नेतृत्व संवर्धन' या विषयावर Post Graduate Diploma in Education of Gifted च्या विद्यार्थ्यांसाठी तीन सत्रे, आकांक्षा ९ व जिज्ञासा-१७ च्या गटासाठी 'परस्पर नातेसंबंध' याबद्दल कार्यशाळा व सत्रे आणि 'नेतृत्वगुण आणि मूल्ये' यावर सत्र घेतले. 'श्रवणकौशल्य' याबद्दल 'स्व'-रूपवर्धिनीच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र घेतले. नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थिनीने सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्रात काम करण्याचा अनुभव घेतला.

| गटाचे नाव व तपशील | उद्दिष्ट | उपक्रम |
|---|---|---|
| प्रभातचिंतन गट (११ सदस्य, ६ नियमित, दैनंदिन दूरस्थ बैठकी - एप्रिल ते जून) | प्रबोधिनी व संबंधित साहित्य यांचे सातत्यपूर्ण वाचन, मनन, चिंतन, संवाद करणे | जिज्ञासापूर्ती भाग १ व भाग २, 'रामदास काय म्हणाले?' यांचे वाचन व त्यावर गटात काही संवाद झाले. |
| आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण अभ्यासगट (७० सदस्य, ८ बैठकी, ४ व्याख्याने) | आंतरराष्ट्रीय घटक, परराष्ट्रसंबंध -धोरण यांचा भारताच्या एकात्मतेवर व सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे | व्याख्याने : Crunch Time - प्रा. श्रीराम चौलिया, 'पाकिस्तानातील सद्य घडामोडी व त्याचे भारतासाठी महत्त्वाचे परिणाम' - प्रसाददादा पवार, The India Way 2.0 - नचिकेतदादा नित्सुरे, 'अमेरिका समजून घेताना - भाग १ : अमेरिकन युद्धे व परराष्ट्र धोरण' - डॉ. सुनील गोखले |
| श्री अरविंद तत्त्वज्ञान अभ्यासगट (२७ सदस्य, १९ बैठकी, पाक्षिक) | राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिने भारतीय संस्कृतीचा पाया या पुस्तकाचा अभ्यास करणे व प्रख्यायिका अभ्यासणाऱ्या 'गाथा' गटाला आशय पुरवठा करणे | अभ्यास करून गटात सदस्यांची मांडणी व संवाद, प्रश्नोत्तरे आणि शेवटी अर्धा तास ज्ञा. प्र. चे सहकार्यवाह मा. विश्वनाथ गुर्जर यांचे विवेचन - अशा प्रकारे पुस्तकाची एकंदर २३० पाने अभ्यासली. (ध्वनिमुद्रणे, टिपणे, शब्दांकन उपलब्ध) |

# १०. नैसर्गिक संसाधने विभाग

## ◈ पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

भोर, वेल्हे व मुळशी तालुक्यातील डोंगराळ भागातील दुर्गम गावांमधील पाणी टंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली काही वर्षे विभागातर्फे सातत्याने विशेष भर देण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी त्यात महाबळेश्वर तालुक्याची भर पडली आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत पाणी टंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेण्यात येत आहे. तीन वर्षांहून अधिक काळ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येत आहे. पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरे विकास, नवीन विहीर खोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणी साठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात येत आहेत. श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज मात्र पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधी व अन्य देणग्यांमधून करण्यात येत असते.

### १. विहीर खोदाई व बांधकाम उपक्रम

यंदाच्या वर्षी दोन विहिरींचे खोदकाम पूर्ण करून त्याभोवती आवश्यक त्या उंचीचे संरक्षक कठडे बांधण्याचे काम एका ठिकाणी पूर्ण झाले. माळेगाव व पोमगाव या दोनही गावांत (ता. मुळशी) विहिरीचे खोदकाम पूर्ण करण्यात आले. या दोनही गावातील दुर्गम धनगर वस्त्यांना या विहिरींचा विशेष फायदा होणार आहे. जनावरांसाठी पाण्याची सोय झाल्याने स्थानिक दूधव्यवसायालाही लाभ होणार आहे. माळेगाव येथील कामास केपीआयटी टेक्नॉलॉजीजचे अर्थसाहाय्य मिळाले, तर पोमगाव येथील विहिरीस पर्सिस्टंट फौंडेशनचे साहाय्य मिळाले.

गेल्या वर्षी बांधलेल्या मुगाव (ता. मुळशी) येथील विहिरीचे लोकार्पण ज्ञान प्रबोधिनीचे संचालक गिरीशराव बापट यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यवाह सुभाषराव देशपांडे हेही यावेळी उपस्थित होते. या विहिरीसाठी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे साहाय्य लाभले. अशाच प्रकारे गेल्या वर्षी बांधलेल्या धडवली (ता. मुळशी) येथील विहिरीचे लोकार्पण ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे प्रमुख मनोजराव देवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या विहिरीसाठी अर्थसाहाय्य देणाऱ्या इनरव्हील क्लबच्या प्रतिभाताई दलालही यावेळी उपस्थित होत्या. नाळवट (ता. वेल्हे) येथेही गेल्या वर्षी बांधलेल्या विहिरीचे केपीआयटी टेक्नॉलॉजीज या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी शाश्वत मित्रा यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञान प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते यशवंतराव लिमये हे होते.

बांधकाम करण्यात आलेल्या सर्व विहिरींच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली. यंदाच्या विहिरींची कामे धरून विभागातर्फे आत्तापर्यंत ३६ विहिरींचे खोदकाम व बांधकाम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.

### २. फेरोसिमेंट टाकी बांधकाम

पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण १७ गावे/वस्त्यांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम या वर्षी करण्यात आले. यांपैकी पुणे जिल्ह्यात आठ तर सातारा, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यात प्रत्येकी दोन टाक्या आणि सोलापूर जिल्ह्यात तीन टाक्या बांधण्यात आल्या. यंदाच्या वर्षी बांधलेल्या टाक्या धरून विभागातर्फे आत्तापर्यंत एकूण ५७ टाक्या बांधल्या आहेत. या सर्व लोकसहभागातून बांधलेल्या आहेत हे विशेष! या सर्व ठिकाणी ग्रामस्थांनी चौथरे बांधून देण्यास मदत केली. वेल्ह्यात बांधलेल्या सातही टाक्यांची तसेच ठाणे, नाशिक व सातारा जिल्ह्यात बांधलेल्या टाक्यांची क्षमता १५ हजार लिटर इतकी आहे. सोलापूर जिल्ह्यातील दोन आणि भोर तालुक्यातील एका टाकीची क्षमता १८ हजार लिटर इतकी आहे. यंदाच्या वर्षी ३० हजार लिटर क्षमतेची टाकी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील भांब या एकमेव गावात बांधण्यात आली. यंदाच्या वर्षी या उपक्रमात ठाणे व नाशिक या दोन नवीन जिल्ह्यांची भर पडली आहे.

या सतरा टाक्यांसाठी पॉलिवन पॉलिमर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, रोटरी क्लब ऑफ शनिवारवाडा चॅरिटेबल ट्रस्ट, दाबके ट्रस्ट (पुणे), ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन, अमेरिका अशा अनेकांचे अर्थसाहाय्य लाभले. मुंबईतील जलवर्धिनी संस्थेचे उल्हास परांजपे यांचे या फेरोसिमेंट टाकी बांधकामासाठी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभले.

### ३. नळपाणी योजना

या वर्षी महाबळेश्वर तालुक्यातील दोन गावांमध्ये तर वेल्हे तालुक्यातील एका गावात नळपाणी योजनेचे काम करण्यात आले. महाबळेश्वर तालुक्यात तापोळ्यापासून सुमारे ३५ किमी. अंतरावर असणाऱ्या दुर्गम साळोशी गावात तीन किमी. अंतरावर असलेल्या डोंगरातील झऱ्यामधून पाणी आणले आहे. यासाठी दीड इंच व्यासाचा एचडीपी पाईप वापरण्यात आला. त्यामुळे आता एप्रिल व मे महिन्यातील तीव्र पाणी टंचाईच्या काळात गावाला पाणी उपलब्ध होऊ शकणार आहे. या योजनेसाठी गावाने एक लक्ष रुपयांची लोकवर्गणी गोळा केली असून पाईपलाईनसाठीचे खोदकाम व प्लंबिंगही चिकाटीने पूर्ण केले आहे. उर्वरित खर्चासाठी

अमेरिकेतील सेव्ह इंडिअन फार्मर्सचे अर्थसाहाय्य लाभले.

महाबळेश्वर तालुक्यातील कासरुड गावात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरीपासून गावातील साठवण टाकीपर्यंत पाणी आणण्यात येणार आहे. यासाठी एक हजार मीटर लांबीची अडीच इंची पाईपलाईन टाकण्यात येत आहे. पाईपलाईनच्या खरेदीसाठी सेव्ह इंडिअन फार्मर्स, अमेरिका यांचे सहकार्य लाभले. वेल्हे येथील निगडे बुद्रुक गावातील कोकरेवस्ती येथेही प्रबोधिनीने बांधलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरीवरून तीनशे मीटर लांबीच्या एचडीपी पाईपलाईनद्वारे गावापर्यंत पाणी आणण्यात आले आहे. ही पाईपलाईन दीड इंच व्यासाची आहे. यासाठी पुण्यातील कृतज्ञता ट्रस्टचे सहकार्य लाभले. या तीनही गावांमध्ये पाईपलाईनसाठी चर खोदणे, पाईपलाईन टाकणे व बुजविणे ही कामे लोकांनी श्रमदानातून केली हे विशेष!

### ◈ पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

मांगदरी (ता. वेल्हे) येथे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सरकारी बंधाऱ्यातील ३०४ मीटर लांबीचा व आठ मीटर रुंदीचा सरासरी एक मीटर खोलीचा गाळ काढला. या काढलेल्या दगडमाती स्वरूपातील गाळातून ८३० मीटर लांब व १२ फुट रुंदीचा सारंगीचा पाणंद रस्ता तेथील जागेवरील अतिक्रमणे हटवून तयार करण्यात आला. अशाच प्रकारे बकुळीच्या वळण बंधाऱ्यातील २५ मीटर लांबीचा व सात मीटर रुंदीचा सरासरी एक मीटर खोलीचा गाळ काढण्यात आला. यातून ३६० मीटरचा सारंगी-निगडे जोड रस्ता तयार झाला. यासाठी ग्रामस्थांनी ३,२२,०००/- रुपयांची लोकवर्गणी गोळा करून गाळ वाहून नेण्यासाठीचा ट्रॅक्टरचा खर्च केला. गाळ खोदण्यासाठी लावलेल्या जेसीबी मशीनचा १,५१,०००/- रुपयांचा खर्च प्रकल्पाच्या विकास निधीतून केला.

### १. झरे विकास कार्यक्रम

मळे (ता. भोर) येथे नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेल्या झऱ्याचे पाणी साठवण्यासाठी मळेकरवाडी व ढेबेवाडी असे दोन डवरे खोल करण्यात आले. यासाठी ४८६ भूसुरुंगांद्वारे तळात १२ फूट रुंद व सरासरी १२ फूट खोल असे साठवणुकीचे टाके तयार झाले आहे. भूसुरुंगाद्वारे उडालेली दगडमाती काढण्याचे काम ग्रामस्थांनी स्वखर्चाने जेसीबीद्वारे केले. याचा उपयोग मळ्यातील सुमारे ३३ धनगर व त्यांच्या सुमारे ५० जनावरांना होणार आहे. अशाच प्रकारे खोपडेवाडी-पळसगाणे येथे जुन्या शासकीय विहिरीचे खोलीकरण करण्यात आले. त्यासाठी निघालेली दगडमाती ग्रामस्थांनी श्रमदानाने व स्वखर्चाने छोटी क्रेन लावून बाहेर टाकली. सहा धनगर कुटुंबे व ६० जनावरांना याचा फायदा होणार आहे.

### ◈ समाज दर्शन उपक्रमातील सहभाग : प्रशिक्षण वर्ग

सोलापूर ज्ञान प्रबोधिनीच्या बालविकास मंदिर प्रशालेत 'समाज दर्शन' उपक्रमाचे दरवर्षी नियोजन केले जाते. यंदाच्या 'आमचा गाव आमचा विकास' या विषयांतर्गत सहभागी विद्यार्थी व शिक्षकांना प्रबोधिनीच्या ग्रामीण भागातील कार्याची माहिती देणे व गाव भेट कशाप्रकारे करावी याबाबत विभागातर्फे दूरस्थ पद्धतीने २०० मुले व २०० मुली व शिक्षक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

### ◈ श्रमकार्य उपक्रम

पुण्यातील केपीआयटी टेक्नोलॉजीजच्या अभियंत्यांनी पासली गावाजवळील ओढ्यावर एक वनराई बंधारा श्रमदानाने घातला. यात २३ मुले आणि दोन मुली असे २५ जण सहभागी होते. मोसे खोऱ्यातील (ता. मुळशी) दुर्गम अशा माळेगाव गावातील धनगरवस्तीमधील विहीर बांधकामात युवक विभागातील १४ युवकांनी एक दिवसाचे श्रमकार्य केले. या युवकांनी खडी, वाळू व बांधकामाचे दगड विहिरीपाशी वाहून आणण्याचे काम केले. पासली खोऱ्यातील (ता. वेल्हे) दुर्गम अशा खोपडेवाडी गावात धनगरवस्तीवरील पलाशगाणी येथील जुन्या विहिरीच्या खोलीकरण कामात युवक विभागातील १५ युवकांनी एक दिवसाचे श्रमकार्य करून दगडमाती बाहेर काढण्यास मदत केली.

### ◈ सौर पॅनेल व दिवे जुळणी प्रशिक्षण

१. शिवापूर (ता. हवेली) येथील कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील सहा विद्यार्थ्यांसाठी तसेच नागरीवस्ती गटातील चार मुले व सहा मुली व दोन महिला यांच्यासाठी आठवडाभराचा सौर पॅनेल जुळणी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.
२. प्रबोधिनीच्या हराळी केंद्रातील कृषी महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांसाठी पुण्यात १५ दिवसांचा सौर पॅनेल जुळणी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.
३. भोर तालुक्यातील वेळू गावातील सोलर पॅनल उत्पादन करणाऱ्या 'मॅक्स पॉवर' या कंपनीमध्ये निवडक प्रशिक्षणार्थींची अभ्याससहल आयोजित करण्यात आली होती.

### ◈ सौर दिवे वाटप

१. मुळशी तालुक्यातील वरसगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील मोसे खुर्द ग्राम पंचायतीमधील धडवली गावातील धनगरवस्तीवर ३० सौर दिव्यांचे सवलतीच्या दरात वाटप करण्यात आले. या धनगरवस्तीवर अद्यापही वीज पोहोचलेली नाही. याच परिसरातील तव ग्रामपंचायतीमध्येही ३५ सौर दिवे अशाच प्रकारे वितरित करण्यात आले. या दिवे व पॅनेल्सची जुळणी नागरीवस्ती अभ्यासगटातर्फे करण्यात आली.
२. भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात समारंभपूर्वक याचे वाटप करण्यात आले. या धनगरवस्तीवर तीन सौर पथदिवे ग्रामस्थांच्या लोकसहभागातून बसविण्यात आले.
३. पुण्यातील इनरव्हील क्लबने २७० सौर दिवे खरेदी करून त्याचे खेड व भोर तालुक्यात वाटप केले.

# ११. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

कौशल्य प्रशिक्षण केंद्र हे कौशल्याधारित शिक्षणाचे केंद्र १९८४ पासून पुण्याजवळील खेड-शिवापूर गावी सुरू आहे. शिवगंगा खोऱ्यातील गावांना या प्रकारच्या शिक्षणाचा फायदा व्हावा व बदलत्या औद्योगिक रचनेसाठी याचा उपयोग करता यावा अशा प्रेरणेतून हे काम निरंतर सुरू आहे.

### ◈ वर्गांचे तपशील

| क्र. | वर्गाचे नाव | तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १ | तारतंत्री यंत्रचालक | दोन वर्ग - एक पूर्ण व एक चालू | दोन्ही मिळून २१ विद्यार्थी |
| २ | स्वयंकातारी यंत्रचालक | दोन वर्ग - एक पूर्ण व एक चालू | दोन्ही मिळून १६ विद्यार्थी |
| ३ | सौर पट्टिका निर्मिती | एक वर्ग | ८ विद्यार्थी |
| ४ | सौर दिवे निर्मिती | एक वर्ग | २५ विद्यार्थी |
| ५ | संगणक टायपिंग | एक वर्ग | ४ विद्यार्थी |

### ◈ महत्त्वाचे उपक्रम

१. उद्योजकता कार्यशाळा - झाडांसाठी संरक्षक जाळ्या बनवणे, तिरंग्यासाठी स्टँड बनवणे असे उपक्रम विद्यार्थ्यांनी केले. त्याशिवाय कातारी यंत्र वापरून एखादे उत्पादन तयार करावे व ते विक्रीयोग्य असावे असे ठरवले गेले. त्यामुळे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने छोटा ध्वज तयार करावा, असे विद्यार्थ्यांनी मिळून ठरवले व त्यासाठी आवश्यक प्रयोग केले व ध्वज तयार केला.

२. दि. २४ नोव्हें. २२ रोजी केंद्रातील १९८४ ते १९९४ या वर्षांमधील तुकड्यांचा माजी विद्यार्थी मेळावा झाला. केंद्रात झालेल्या या मेळाव्यात या दहा तुकड्यांमधील एकूण २८ सदस्य सहभागी झाले होते.

### ◈ अध्यापक व विद्यार्थ्यांच्या क्षेत्रभेटी

१. दि. ३० जुलै २२ रोजी साळुंब्रे व शिवापूर केंद्रातील अध्यापक वर्गाची भेट पाबळ येथील विज्ञान आश्रमास योजली होती. आश्रमाचे प्रमुख डॉ. योगेश कुलकर्णी यांचीही भेट झाली.

२. दि. १३ सप्टें. २२ रोजी केंद्रातील दोन तुकड्यांमधील १६ विद्यार्थ्यांनी व अध्यापक श्री. किरण कुलकर्णी, श्री. सुनील कुलकर्णी आणि श्री. दत्तात्रय धोत्रे यांनी सिन्युमरो निर्माण प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला भेट दिली.

३. इलेक्ट्रिशियन तुकडीतील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट दि. २१ नोव्हें. २२ रोजी पुणे मेट्रो येथे गेली होती. तारतंत्री आणि कातारी यंत्रचालक (शिवापूर) या दोन तुकड्यांचे विद्यार्थी आणि प्रशिक्षक असे एकूण २४ सदस्य उपस्थित होते.

४. २० विद्यार्थी आणि अध्यापकांनी प्रजासत्ताक दिनाचे ध्वजवंदन किल्ले रोहिडा येथे केले. या निमित्ताने सदस्यांची अनौपचारिक सहल झाली.

### ◈ केंद्राला मान्यवरांच्या भेटी

१. सौर विषयतज्ज्ञ श्री. अरविंद करंदीकर यांनी दि. १३ एप्रिल २२ रोजी केंद्रातील सौर कक्षास भेट दिली.

२. दि. १३ एप्रिल २२ रोजी केंद्रातील नव्याने तयार करण्यात आलेल्या स्वयंकातारी कक्षाचे उद्घाटन झाले. उद्घाटनास GKN Sinter Metals Pvt. Ltd. कंपनीचे अधिकारी श्री. राजेश मिराणी (Director, India Operations), श्री. सचिन असोले (Finance Controller), श्री. सुधीर पोळ (DGM, HR), श्रीमती अंशू गुप्ता (Sr. Executive, HR) व श्री. निखिल दरेकर (Asst Manager, HR) होते. सदर कक्षांमधील उपकरणे याच कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून घेतली आहेत.

३. दि. २ जुलै २२ रोजी Sodales Labs Pvt. Ltd. कंपनीचे प्रमुख श्री. रवी कुमार पंडित व त्यांचे ५३ सहकारी आले होते. केंद्रात वृक्षारोपणाचा कार्यक्रम त्या दिवशी योजला होता. सुमारे ६० फळझाडे व फुलझाडांची लागवड करण्यात आली.

४. दि. ४ ऑक्टो. २२ रोजी खंडेनवमीनिमित्त दर वर्षीप्रमाणे केंद्रामध्ये यंत्रपूजन व उपासना झाली. यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे उद्योजक माजी विद्यार्थी व शिवापूर केंद्रात दीर्घकाळ काम केलेले श्री. मिलिंद संत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

५. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन (अमेरिका) चे सदस्य श्री. ओंकार नातू यांची दि. ८ नोव्हें. २२ रोजी केंद्रास भेट झाली.

६. दि. १७ नोव्हें. २२ रोजी Bloom Combustion India Pvt. Ltd. कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट केंद्रामध्ये योजली होती. यासाठी कंपनीतर्फे श्री. अविनाश सुर्वे, श्रीमती वैशाली प्रधान, श्रीमती अदिती ताम्हणकर व श्री. सुरेश ढाकणे उपस्थित होते.

▲▲▲

**ज्ञान प्रबोधिनीत म्हणली जाणारी विविध प्रेरणादायी व देभक्तीपर पद्ये ऐकण्यासाठी पुढील क्यू आर कोड स्कॅन करावा.**

**प्रबोधन गीते**

# १२. स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

## ◈ आर्थिक स्वावलंबन, स्वयंरोजगार

### १. संपदा प्रकल्प

सायबेज कंपनीच्या मदतीने वेल्हे तालुक्यातील नऊ गावांमधून २०२१ सालापासून चालू असलेल्या संपदा प्रकल्पांतर्गत महिलांची स्वयंरोजगार प्रशिक्षणे घेणे, महिलांनी उत्पादन करणे, त्याची स्टॉलद्वारे विक्री करणे अपेक्षित आहे. सध्या ३०० महिलांसाठी हे काम चालू आहे. या वर्षात महिलांनी १६७ प्रशिक्षणांद्वारे विविध स्वयंरोजगार कौशल्ये शिकली. एकूण ४७ ठिकाणी स्टॉलद्वारे पाच लक्ष रुपयांच्या उत्पादनांची विक्री झाली. या वर्षी २५ महिलांचे उत्पादन दहा ते पंचवीस हजार रुपयांनी वाढले.

### २. हरित ऊर्जा प्रकल्प

नेपियर गवतापासून छोट्या ब्रिकेट रूपात इंधन उत्पादित करण्याच्या कामाला अडवली गावातील 'हरित ऊर्जा बचत गटाच्या' सभासदांनी सुरुवात केली. ग्लोबंट कंपनीच्या आर्थिक तर गंगोत्री कंपनीच्या तांत्रिक मदतीने हा प्रकल्प एकूण तीन वर्षांत पूर्ण करायचा आहे. या प्रकल्पात ५० एकर जमिनीवर नेपियर गवताची लागवड करून त्या गवताला वाळवून, त्याची पूड करून, त्यापासून मशीनच्या साहाय्याने इंधन कांडी बनवायची आहे. त्यासाठी यंत्रसामग्रीची खरेदी केली.

### ३. नवदिशा नेतृत्व प्रकल्प

वेल्ह्यातील मावळ भागातील महिलांमध्ये स्थानिक नेतृत्व तयार व्हावे, या उद्देशाने नवदिशा नेतृत्व प्रकल्प चालतो. स्वयंरोजगार प्रशिक्षणे घेणे, त्याचे उत्पादन स्वतः करणे आणि गावातील महिलांकडून करून घेणे, महिला ग्रामसभेचे आयोजन करून गावातील महिलांचे प्रश्न सभेसमोर मांडणे, दक्षता समितीचे काम समजून घेणे, कुटुंबाचा अर्थसंकल्प मांडायला शिकणे अशा अनेक गोष्टी महिलांनी वर्षभरात केल्या. त्यासोबतच त्या सहलीलाही जाऊन आल्या आणि गावातील महिलांच्या गाववार स्वतंत्र सहलींचे आयोजन देखील केले. हळूहळू या महिला सहभागी ऐवजी संयोजक बनू लागल्या आहेत. कोणताही प्रकल्प आपल्या गावातल्या महिलांसाठी कसा व का करायचा, त्यांच्या गरजा काय आहेत, त्या पूर्ण कशा करायच्या हे त्यांना समजू लागले आहे.

### ४. अर्थसखी प्रकल्प

महिलांची आर्थिक साक्षरता वाढायची असेल, तर त्यांना बँकेपर्यंत नेणारी, आर्थिक विषय सोपेपणाने उलगडून सांगणारी व मैत्रीपूर्ण आणि कृतिशील मदत करणारी अर्थसखी मिळाली तर गावातल्या महिलांचा आर्थिक विषयातला आत्मविश्वास वाढेल. या विश्वासाने हवेली तालुक्यातील पाच गावांमध्ये प्रकल्प सुरू केला. त्यामध्ये आधार कार्ड व पॅन कार्ड काढणे, बँकेत खाते काढणे व ते आधार खात्याला जोडणे, सुकन्या योजना, पंतप्रधान विमा योजना (PMBY PMJJBY), एटीएम कार्ड काढणे, नवे पीपीएफ खाते काढणे, ई-श्रम कार्ड काढणे अशी कामे केली. तीन महिन्यात २२५ कामे पाच अर्थसख्यांच्या मदतीने करता आली. पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यावर भागातील ८५ गावांमध्ये ३४ अर्थसख्यांच्या मदतीने ३,२२५ कामे केली. हे सर्व रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनच्या मदतीमुळे प्रत्यक्षात येऊ शकले. या सर्व कामावरील Financial Literacy in rural women: Case study of five villages from Haveli Taluka (Dr. Medhavinee Watve, Suvarna Gokhale, Chitrali Kumbhojkar) हा संशोधन निबंध International Research Journal Of Multi disiplinary Studies च्या सप्टेंबरच्या अंकात प्रकाशित झाला.

## ◈ आरोग्य

आरोग्याच्या कामात जाणीव-जागृती आणि विविध तपासण्या, तसेच त्या तपासण्यांमधून काही विशेष उपचारांची गरज असेल तर ते होण्यासाठीचे अनुधावन असे काम विभागातून केले जाते. या कामासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या वैद्यकीय क्षेत्रातल्या माजी विद्यार्थिनी आणि त्यांचे संबंधित गट गेली २० वर्षांहून अधिक काळ काम करीत आहेत. पाटणकर नर्सिंग होम, पाटणकर ट्रस्ट, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, डॉ. संगीताताई कोहोली आणि त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे या वर्षीही सहकार्य मिळाले. ज्यांची मुले त्यांच्या जवळ नाहीत, त्यांना वैद्यकीय बाबतीतले सहकार्य करणे, औषधे आणायला जाणे शक्य नसेल तर आणून देणे, व्यवस्थित घेतात ना ते तपासणे इ. कामे कार्यकर्त्या करत आहेत. विविध तपासण्यांचे तपशील पुढील तक्त्यात दिले आहेत.

| क्र. | तपासणी तपशील | संख्या |
|---|---|---|
| १. | गरोदर माता तपासणी | मासिक १२ तपासण्या झाल्या ४५२ महिला |
| २. | HPV | दोन वेळा तपासणी |
| ३. | बाल आरोग्य तपासणी | २९७ बालके |
| ४. | नवजात शिशू तपासणी | दोन तपासण्या, ४४ शिशुंची तपासणी |
| ५. | मोतीबिंदू तपासणी | तीन गावांमध्ये मिळून ११० जणांची तपासणी व सात जणांवर उपचार |
| ६. | दात तपासणी | ३० OPD मधून २७९ जणांची तपासणी |
| ७. | ज्येष्ठ नागरिक साहाय्य | चार गावे ९२ ज्येष्ठ नागरिक |

## ◈ समूहगुण विकसन

### १. किशोर-किशोरी विकास

या वर्षी कल्याण, कुसगाव, वरवे, कुरुंगवडी या चार शाळांत इ. ८वी ते १०वीतील किशोर-किशोरींसाठी दहा पाक्षिक तासिका घेतल्या. त्यात पंचकोष विकसनाची प्रस्तावना व इकिगाई (जगण्याची कला) या आधारे ध्येय, आवड, छंद, करियर, क्षेत्र व गरज या गोष्टी त्यांना समजावून सांगितल्या. पूर्वतयारीसाठी श्रिया संस्थेतील सात जण व्याख्यान द्यायला आले होते. वर्षअखेर चार शाळांतील मिळून १३३ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार वरवे गावातील शिवनेरी मंगल कार्यालयात झाला. विद्यार्थ्यांनी यावेळी संकल्प कथन केले. संस्कार कार्यक्रमाला श्रिया संस्थेचे ३५ जण उपस्थित होते. आचार्य म्हणून माळेगावचे कीर्तनकार नवनाथ महाराज लिम्हण लाभले. विद्याव्रत संस्काराबद्दल माहिती देण्याच्या निमित्ताने १०५ पालकांच्या गृहभेटी घेतल्या, त्याचा खूप चांगला उपयोग झाला.

### २. युवती विकास

वर्षभर वेल्हे तालुक्यातील महाविद्यालयांमधील युवतींचे एकत्रीकरण करून, त्यांच्यासाठी महिन्यातून दोन वेळा कृतीरूप/चर्चा सत्र, विचारांसाठी व्याख्यान अशा स्वरूपात कार्यक्रम आयोजित केले होते. त्यातून काही युवती या संघटनेत सहभागी झाल्या. कातकरी प्रकल्पातील मुलांसाठी खेळ व गाणी घेणे, गावातील लहान मुलांसाठी दलांच्या माध्यमातून खेळ घेणे, संगणक शिकता-शिकता वेगवेगळ्या कामांची माहिती संगणकावर एकत्रित करणे, गावोगावी कामांसाठी सर्वेक्षण करणे अशा अनेक उपक्रमांत त्या सहभागी झाल्या आणि त्यांचे स्वतःचेच शिक्षण यात होत गेले. अशा ३० युवतींचा गट नियमित कामात सहभागी झाला.

## ◈ वंचित विकास

### १. एकल महिला

आठ वर्षांपासून सुरू असलेल्या एकल महिलांच्या कामाचे स्वरूप विविध सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे आणि त्याचा लाभ मिळवून देणे असे आहे. आत्तापर्यंत ८० महिलांना सरकारी योजनेचा लाभ मिळाला आहे. आजवरच्या कामामध्ये संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना या योजनांमधून आत्तापर्यंत ४० लाख रुपये महिलांच्या खात्यामध्ये जमा झाले आहेत. या वर्षी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन अमेरिका, यांच्या मदतीने एकल महिलांना खेळते भांडवल देण्यात आले, ज्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल व त्या स्वयंपूर्ण होतील. तसेच मा. सावितााई भागवत यांच्या मदतीमुळे अनेक एकल महिलांना आधार देता आला आणि त्यांच्या मुलींसाठी शिक्षणाचे दार खुले झाले.

## ◈ कातकरी विकास

### १. मुलांचे शिबिर

इ. १ली ते ७वीच्या ६५ कातकरी मुलांचे शिबिर दि. २४ व २५ डिसेंबरला झाले. यात स्वच्छता आणि शिक्षण हे विषय होते. मोठ्या गटासाठी शिक्षणावर आधारित चित्रफीत दाखवून चर्चा घेतली. निसर्गातील गोष्टींचा वापर करून काही बनवायची संधी त्यांना दिली. तसेच घर सुंदर व स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे असेही सांगितले. मुलांनी स्वतःसाठी रुमाल तयार केले. शारीरिक स्वच्छता, चित्रवाचन, परिसर स्वच्छता, लहान गटासाठी गोष्ट सांगून त्यावर चर्चा, स्पर्शांचे खेळ, दल, नैसर्गिक गोष्टींचा वापर करून चित्र काढणे, गंमत खेळ, चित्रांमधील फरक ओळखणे अशा सत्रांचे नियोजन करण्यात आले होते.

### २. साताऱ्यातील श्रमजीवी संस्थेस भेट

दि. २१ मार्च रोजी कातकरी वस्तीतील २४ जण आणि युवती विभागातील सहा कार्यकर्त्या अशा ३० जणांनी खैरे-वलंग गावाला व श्रमजीवी संस्थेला भेट दिली. श्रमजीवी संस्थेने स्थापन केलेल्या वेगवेगळ्या कातकरी व्यावसायिकांच्या सोसायट्या, पतसंस्था, मत्स्यबीज उत्पादन केंद्र याबद्दल संस्थेचे कार्यकर्ते विठ्ठल कोळेकर यांनी माहिती दिली. या सोबतच पोलादपूर येथील बोरज वस्तीलाही गटाने भेट दिली.

### ३. सहनिवास

घरापासून शाळा लांब असल्याने शिक्षणापासून मुली वंचित राहू नयेत म्हणून गेल्या नऊ वर्षांपासून आपण मुलींसाठी सहनिवास सुरू केला आहे. या वर्षी ५वी ते पदवी पर्यंतच्या ३० मुली सहनिवासात होत्या. एकत्रित राहणे, रोजची कामे गटात करणे, अभ्यासात एकत्रितपणे मोठ्यांनी लहानांचा अभ्यास घेणे, स्वतःचा अभ्यास अभ्यासिकेत करणे, वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञांकडून शिकणे असे त्यांनी एकत्र राहून केले. पुण्यातील गानवर्धन संस्थेच्या परिणीतााई मराठे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नियमितपणे वर्ग घेतले आणि सहा मुली उत्तम गुणांनी पेटी वादनाची पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्या. इंग्रजी बोलण्याचा सराव करणे, जगात चालू असलेल्या विविध गोष्टींची माहिती ताईकडून घेणे असे

> **◈ नवी उमेद**
>
> लग्न झाल्यानंतर मुलींचे नाव बदलते. हे नाव कागदोपत्री लागणे महत्त्वाचे असते. पण हे अनेक मुलामुलींना माहिती नसते असे एका सर्वेक्षणातून लक्षात आले. शासनातील अनेक योजनांसाठी कागदपत्रे गरजेची असतात. त्यादृष्टीने अशा महत्त्वाच्या गोष्टी 'नवी उमेद' या नावाने मुलामुलींना सांगायचे ठरवले. ज्यांचे लग्न होऊन चार-पाच वर्षे झाली आहेत किंवा ज्यांचे लग्न आता ठरण्यात आहे अशा २०० जणींसाठी हे काम केले. लग्नाचे प्रमाणपत्र लग्न झाल्यावर २१ दिवसांत आपण मिळवायचे असते. अर्ज केल्यानंतर ग्रामीण भागात ग्रामसेवक आपल्याला ते देऊ शकतात. लग्नानंतर जे बदललेले नाव आहे ते आधार कार्ड आणि पॅन कार्ड वर बदलावे लागेल, अशा गोष्टींबद्दलची माहिती यात दिली.



ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांचे अभिव्यक्ती सादरीकरण



छोटे सायंटिस्टस् समस्या परिहार स्पर्धेतील एक क्षण




पंख फुलवूया प्रतिभेचे या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यातील क्षणचित्र



कुमार साहित्य संमेलन उद्घाटन प्रसंगी विद्यार्थी व मान्यवर




नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थ्यांचे केळद (ता. वेल्हे)
येथील साहस शिबिर



नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थ्यांच्या ग्रामीण परिचय शिबिरात
वेल्हे भागातील शाळेला भेट



आनंदी शिक्षण प्रकल्प प्रशिक्षण वर्ग




स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्राच्या प्रेरणा वर्गातील
विद्यार्थ्यांच्या गावभेटींचे क्षणचित्र



प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे कांदिवली येथे महिंद्रा कंपनीमध्ये प्रशिक्षण



सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्रात श्रीराम चौलिया भाषण करताना



सामूहिक उपनयन संस्कारात सहभागी बटू व संत्रिका गट



मुगाव, ता. मुळशी येथे प्रबोधिनीने खोदलेली विहीर



धडवली येथील विहीर लोकार्पण कार्यक्रमातील क्षणचित्र



कौशल्य प्रशिक्षण केंद्रात खंडेनवमीनिमित्त यंत्रपूजन, शिवापूर



नागरीवस्ती अभ्यासगटातील युवतींचे सौर दिवे जुळणी प्रशिक्षण



स्त्री शक्ती ग्रामीण विभागाचा हिरकणी विस्तार मेळावा



समतोल दिवाळी अंक प्रकाशन कार्यक्रम



युवती विभागाच्या ग्रामीण परिचय शिबिरातील गटकार्य




युवक विभागातर्फे कोथरूड येथे रक्तदान शिबिर



अभ्यासपर्व पुस्तक प्रकाशन सोहळ्यात उपस्थित
माजी केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर




अवसर फौंडेशनचे प्रतिनिधी साळुंब्रे येथील
नवीन कामाचे उद्‌घाटन करताना




हराळी केंद्र कृषी विद्यालयातील ठिबक संच जोडणीचे प्रात्यक्षिक



हराळी केंद्र युवतींसाठी जास्वंद वर्ग



सोलापूरमधील "मी गणपती बोलतोय" कार्यक्रमातील क्षणचित्र



निगडीच्या क्रीडाकुल रौप्य महोत्सवानिमित्त
डोंबिवली येथे प्रात्यक्षिके करताना खेळाडू



कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांची पुणे मेट्रोच्या कामाला क्षेत्र भेट



अंबाजोगाई केंद्रातर्फे वस्त्यांवरील मुलामुलींना हार बनवण्याचे प्रशिक्षण



बदलापूर संपर्क केंद्राला मा. संचालक गिरीशराव बापट यांची भेट



चिपळूण मधील अध्यापकांना दुर्दम्य आशावादी या
डॉ. माशेलकर यांच्या चरित्राचे वाटप



शिरूर मधील संवादिनी कार्यकर्त्यांचा गट



ज्ञान प्रबोधिनी प्रशाला अल्युम्नाय फौंडेशनतर्फे उद्योजक माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

वेगवेगळे उपक्रम देखील त्यांनी केले. आजवर सहनिवासात राहून सहा जणींनी त्यांचे पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. एक जण नर्सिंग करून स्वतःच्या पायावर उभी आहे, एकीने संगणकातील शिक्षण घेतले तर दोघी फॅशन डिझायनिंगचा कोर्स करीत आहेत. यामुळे मुलींचे लग्नाचे वय देखील योग्य तेवढे पुढे गेले आहे.

**◈ विस्तार**

**१. हिरकणी**

हिरकणी हा ० ते ६ वयोगटातील मुलांच्या मातांचे प्रशिक्षण करणारा उपक्रम या वर्षी नऊ गावात झाला. या उपक्रमात आजवर ८५ गावांतील ९८६ माता सहभागी झाल्या आहेत. मातांसाठी उपयुक्त ठरलेल्या या प्रशिक्षणाचा अन्यत्र प्रसार व्हावा, त्यानिमित्ताने प्रबोधिनीचा विस्तार व्हावा म्हणून दि. ७ जानेवारी २३ रोजी हिरकणी प्रकल्पाच्या उपलब्धीचे एक सादरीकरण प्रबोधिनीत झाले. त्याला ६३ जण उपस्थित होते. मा. वाच. उमा बापट (बाल मानसज्ज्ञ) यांचे मार्गदर्शन या कार्यक्रमात झाले. शासकीय सेवेतील ICDS प्रकल्पाच्या पर्यवेक्षिका व सात संस्था प्रतिनिधी याला उपस्थित होत्या. येत्या वर्षीसाठी १० गावांमध्ये सत्र घेण्याची मागणी स्वतः पर्यवेक्षिकांनी नोंदवली. मुलांच्या विकासातील कारक कौशल्ये, इंद्रिय विकास आणि बौद्धिक विकासात माता कशी सहभागी होऊ शकते या विषयीचे हे प्रशिक्षण सगळ्यांनी मनापासून समजून घेतले.

**◈ अन्य प्रकल्प**

**१. स्वाधार**

वेल्हे तालुक्यातील १८ गाव मावळ भागातील पाच गावांसाठी 'स्वाधार' प्रकल्प कोफोर्जच्या आर्थिक मदतीने सुरू आहे. सुरुवातीला स्वाधार प्रकल्पाची माहिती भागातील सर्वांपर्यंत पोहोचावी यासाठी १७ गावांमधील २६५ महिलांचा मेळावा आयोजित केला होता. यात स्वयंरोजगार करणाऱ्या गावातील महिलांनीच मार्गदर्शन केले.

स्वयंरोजगार प्रशिक्षणामध्ये चार गावातील ९० जणांसाठी गांडूळखत निर्मिती प्रशिक्षण घेतले गेले. प्रशिक्षण झाल्यानंतर सहा ठिकाणी गांडूळखताचे बेड बसवण्यात आले. आजवर ३५० किलो खताची विक्री झाली.

चार गावांमधून महिलांचे वरई लाही, वरई लाडू, चिवडा, शंकरपाळे, कैरी लोणचे, करवंद जाम, वडापाव, कांदा भजी याचेही प्रशिक्षण झाले. मढेघाटावर सहलीसाठी, पर्यटनासाठी जाणाऱ्या लोकांचा विचार करून गेळगाणे येथे असे खाद्यपदार्थ बनवण्यास शिकवले व त्यांची विक्री करणारे स्थिर विक्री केंद्र सुरू केले.

जंगलतोड आणि महिलांचे कष्ट कमी व्हावेत, यासाठी निर्धूर चुलीचे प्रात्यक्षिक झाले. चार गावांतील ५५ जणांना चूल दिली.

**२. दल**

या उपक्रमाच्या अंतर्गत वर्षभर गावपातळीवर स्थानिक युवतींनी खेळ घेतले, दिवाळी सुट्टीत शिबिर घेतले, तर तीन गावांतील २२ मुलांची सहल पुण्याला आणली. एकूण २४ गावांत झालेल्या साप्ताहिक दलांत ४७० मुलामुलींचा सहभाग होता.

**३. दापोली कृषी विद्यापीठास भेट**

सात गावांतील १७ जणांनी कृषी विद्यापीठाला भेट दिली. शेतीविषयी कोणकोणते अभ्यासक्रम चालू आहेत हे त्यांनी पहिले. बी-बियाणे, कलम करणे, विविध जातींचे भात उत्पादन असे सगळे गावकऱ्यांनी पहिले.

**४. पर्यावरण वारी**

६६ गावांतील ७५० महिला, युवती व मुले यांच्या सहभागाने दापोडे ते वेल्हे अशा पदयात्रेच्या पर्यावरण वारीचे आयोजन केले होते. वारी नंतर मेळाव्याला वैद्य पौर्णिमा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. मुलांनी काही कार्यक्रम सादर केले आणि कोफोर्ज कंपनीतील अधिकाऱ्यांनी १८ गाव मावळ या चॅनलचे उद्घाटन केले.

**५. ज्वाला प्रकल्प**

वैयक्तिक देणगीदारांच्या अर्थसाहाय्याने ५० तर बोस्टन सायंटिफिक या कंपनीच्या आर्थिक मदतीने ३० अशा एकूण ८० निर्धूर चुलींचे वाटप या वर्षी केले. शेतातील जैव कचऱ्यापासून बनवलेल्या पेलेट या चुलीसाठी वापरल्या जातात. चुली वाटप करायला डिसेंबर महिन्यात या कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांनी प्रकल्पाला भेट दिली आणि महिलांचे अनुभव ऐकले.

**६. नवरात्र काळात मेळावे**

या वर्षी ४६ गावांत नवरात्र मेळावे झाले. त्यात ११७५ महिला सहभागी झाल्या होत्या. या वर्षीचे विषय स्वयंरोजगार प्रशिक्षण, हिमोग्लोबिन तपासणी आणि आर्थिक साक्षरता वाढण्यासाठी अर्थसखी प्रकल्पाची माहिती असे होते. यापैकी कुठल्या तरी विषयाचे दोन प्रकारचे कार्यक्रम घेतले गेले. स्थानिक महिलांनी पुढाकार घेऊन हे नियोजन केले. विशेष म्हणजे हिमोग्लोबिन तपासणीमधून असे लक्षात आले की वेल्हे भागातील मेळाव्याला आलेल्या बहुतेक महिलांचे हिमोग्लोबिन हे १० पेक्षा जास्त होते. काही स्थानिक कार्यक्रम याला जोडले गेले. कुठे भारती विद्यापीठच्या डॉक्टरांनी जंत गोळी वाटप केले तर कुठे काविळीची टेस्ट करून दिली. काही मेळाव्याला ICDS च्या महिला अधिकारी सहभागी झाल्या तर काही ठिकाणी कृषी अधिकाऱ्यांनी मेळाव्यात जमलेल्या महिलांना माहिती सांगितली. काही गावात स्वयंरोजगार प्रशिक्षणामध्ये कोकम सरबत, मसाला शेंगदाणे, क्विलींग पणती, भरतकाम, साळीपासून लाह्या बनवणे असे वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण घेतले. अशा प्रकारे गावातल्या महिलांना मोकळीक देणारे हे मेळावे 'स्त्री-शक्तीचा जागर' म्हणून अतिशय उत्साहाने पार पडले!

**७. अन्य विशेष**

विभागाच्या कामावर केलेल्या १६ लघुचित्रफीती यू-ट्यूब चॅनलवर या वर्षी अपलोड केल्या. तसेच महिला दिनानिमित्ताने विभागाचे संकेतस्थळ सुरू झाले.

▲▲▲

# १३. संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

संवादिनीचे सर्व घटक आठ गटांच्या माध्यमातून 'केल्याने होत आहे रे आधि केलेची पाहिजे' या समर्थांच्या उक्तिची शब्दशः प्रचिती देत संस्कार आणि सामर्थ्य यांच्या समन्वयातून देशाचे भवितव्य असलेल्या पुढच्या पिढीला विविध प्रकारे संवादाच्या माध्यमातून सक्षम बनवण्याचा, घडवण्याचा अविरत प्रयत्न करत आहेत. या गटांचे संक्षिप्त वृत्त पुढीलप्रमाणे -

◈ **महत्त्वाचे उपक्रम**

१. समूहगुण प्रशिक्षण : संवादिनीच्या भवितव्य लेखामधे स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेबरोबर पूरक कार्यदिशा म्हणून समूहगुण विकसन कार्यदिशेचा उल्लेख केलेला आहे. संघटनात्मक कामातील समूहगुण प्रशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन गट सदस्यांसाठी काही कार्यशाळा ठरवल्या. आज्ञांचा सराव, सदस्यांचा सकारात्मक व वस्तुनिष्ठ परिचय, बैठकी का? आणि कशा?, वृत्तलेखन, मनोगत लेखन या विषयांवर मीराताई शेटे, रश्मीताई जोशी, प्रज्ञाताई प्रभुदेसाई, वीणाताई लिमये आणि साधनाताई सेठीया यांनी वर्षभरात कार्यशाळा घेतल्या.

२. संवादिनी स्नेहमेळावा : दि. २४ फेब्रुवारी २३ रोजी १०० सदस्यांच्या उपस्थितीत स्नेहमेळावा झाला. यावेळी आधुनिक नवरात्रात केलेल्या महिलांच्या कायदेविषयक अभ्यासाची थोडक्यात मांडणी आठ जणींनी केली. गेल्या काही वर्षांत विशेष कार्यरत असणाऱ्या व गटबांधणीत मोलाचा सहभाग देणाऱ्या अर्चनाताई शिवानी, आरतीताई देशपांडे, समृद्धीताई देशमुख, मानसीताई कर्वे आणि वैशालीताई कुलकर्णी यांना या वर्षीचा 'कृतिशील संवादिनी' पुरस्कार देण्यात आला.

३. निरामय संस्थेच्या किशोरी शक्ती प्रकल्पांतर्गत २३ वस्त्यांवरील मुलींच्या मे महिन्यातील निवासी शिबिरामध्ये संवादिनीच्या ४६ सदस्यांनी ५२५ मुलींसाठी ३३ विषयांवर सत्रे घेतली.

◈ **विद्याव्रत**

१. पालवी गटाबरोबर ज्ञानदा शाळेतील सत्रांमध्ये विद्याव्रत गटाने सहभाग घेतला.

२. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेबरोबर दापोडे गावात चार सत्रे सदस्यांनी घेतली.

३. दि. ३० एप्रिल ते ७ मे विद्याव्रत शिबिर झाले. त्यात ४५ व्रतार्थींचा सहभाग होता. विभागाने स्वतंत्रपणे घेतलेले हे पहिले शिबिर होते. जोपासना सत्रातील सात व्रतार्थी ताई-दादा मदतीला आले होते, ज्यांनी शिबिरातील ६०% जबाबदाऱ्या घेतल्या. पालकांचा सहभाग देखील लक्षणीय होता.

४. व्रतार्थींसाठी वर्षभर जोपासना सत्रे झाली. सायकल सहल, विनित वर्तक यांच्याशी स्पेस विषयक चर्चा, सोंडेसरफळ येथे भात लावणी, साप्ताहिक उपासना, गणपती विसर्जन मिरवणूक पाहणे, रांगोळी सजावट करणे, भूगावला शेतावर वसुबारसेच्या दिवशी गोपूजन, प्रबोधिनी परिचय, पर्वती चढणे स्पर्धा असे अनेक उपक्रम जोपासना सत्रांमध्ये झाले.

◈ **मासिक बैठक**

संवादिनीचे प्रवेशद्वार असणाऱ्या मासिक बैठकीत व्यावहारिक कौशल्य, सामाजिक बांधिलकी, आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकसन या उद्दिष्टांवर आधारित व्याख्याने आयोजित केली जातात. या वर्षी पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली. या बैठकांना सरासरी ६० सदस्यांची उपस्थिती होती.

| विषय | वक्ते |
|---|---|
| प्रबोधिनी समजून घेताना | मा. सुभाषराव देशपांडे |
| लक्ष्मीचे वाहन घुबड | डॉ. सुरुची पांडे |
| जीवनशैली व आपले आरोग्य | डॉ. शेखर कुलकर्णी |
| महिला सुरक्षा कायदा परिसंवाद | संयुक्त उपक्रम : संवादिनी व प्रज्ञा मानस संशोधिका |
| घुमान सायकल यात्रा | डॉ. निरुपमा भावे, डॉ. सुरेखा कोकणे, हेमलता राव |
| पालकत्व एक परीक्षा | गटचर्चा |
| 'फालुन दाफा' एक ध्यानधारणा तंत्र | मा. आनंद पोफळे आणि गट |

◈ **कौशल्य गट**

१३ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना जीवन कौशल्यांविषयी मार्गदर्शन करण्यासाठी स्वजाणीव आणि स्वीकार, स्वयंशिस्त, व्यावहारिक आणि संवाद कौशल्य, ध्येय निश्चिती आणि वेळेचे नियोजन इ. विषयांवर एक तासांची आठ सत्रे, संवाद, गटचर्चा कृतिखेळांच्या माध्यमातून गटातर्फे घेतली जातात. या वर्षी एकूण ३८ सत्रांमधून ४८९ मुलांपर्यंत हे विषय पोहोचले.

◈ **विकासिका गट**

इ.५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षण रुजावे म्हणून या गटातर्फे सत्रे घेतली जातात. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात 'भारत माझा देश आहे' या प्रतिज्ञेचा अर्थ आणि इतिहास या गटातील सदस्यांनी पुणे आणि पुण्याबाहेरच्या २५ शाळांमधील ७५९७ विद्याध्यापर्यंत पोचवला. त्याशिवाय विनोबा भावे लिखित 'सप्तशक्ती' या पुस्तकाचा अभ्यास करून त्याचे पाच ठिकाणी संवादात्मक सादरीकरण केले.

◈ **ओळख स्पर्शाची**

मुले, पालक, शिक्षक यांच्यामध्ये मुलांच्या लैंगिक

शोषणासंबंधी जाणीव-जागृती व्हावी म्हणून इ. २री ते ७वी साठी कार्यशाळा, प्रशिक्षक प्रशिक्षणे गटातर्फे घेतली जातात. या वर्षी पुढीलप्रमाणे काम झाले.

| कार्यशाळा/प्रशिक्षण | विद्यार्थी/प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|
| एकूण चार | २४४० (१ली ते ७वी) |
| हराळी, डोंबिवली, अंबाजोगाई प्रशिक्षक प्रशिक्षण | ५३ |
| ओळख स्पर्शाची ३६० डिग्री प्रकल्प | ३४०० पालक, २८००० मुले |

### ◈ समतोल

संवादिनीतर्फे जून २२ ते मे २३ पर्यंत प्रकाशित केलेल्या सहा अंकांचे सूत्र विषय पुढीलप्रमाणे होते.
१. सुदृढ समाज, २. स्वातंत्र्य (अतिथी संपादक अमितीताई बेहेरे) ३. संकीर्ण, ४. जाहिरात विश्व, ५. प्रेरणा (अतिथी संपादक - मेघा घांग्रेकर, गायत्री गोडबोले), ६. युवारंग (दिवाळी अंक - सुप्रसिद्ध कवी गीतकार मा. वैभव जोशी यांच्या हस्ते प्रकाशन)

मराठबोली पुणे, राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत समतोलला द्वितीय क्रमांक मिळाला. तर अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा संकीर्ण विभागात उत्कृष्ट दीवाळी अंकाचा प्रथम पुरस्कार देखील मिळाला. वर्षभरात मध्यवर्ती, औंध व पौड रस्ता येथील गटांनी संपादनाचा अनुभव घेतला.

### ◈ पालवी

दि. १२ सप्टेंबर २२ ते २१ फेब्रुवारी २३ पर्यंत इ. २री ते ७वी साठी दोन शाळांमधे पालवी गटातर्फे व्यक्तिमत्त्व विकसन सत्रे झाली. शेवटचे सत्र 'गंमत जत्रा' स्वरूपाचे होते. त्यात logical / analytical thinking आणि भावनिक बुद्धिमत्तेवर आधारित कोडी व कृती खेळ घेतले. याला मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### ◈ उमलत्या वयाशी जुळवून घेताना

| कार्यशाळा नाव | कार्यशाळा संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| संयम २ - प्रशिक्षण टप्पा २ (क्षेत्र प्रशिक्षक) | २ | १२१ |
| उमलत्या.. प्रशिक्षक प्रशिक्षण | २ | ४४ |
| उमलत्या.. परिचय सत्र | १ | ३० |
| उमलत्या.. कार्यशाळा | ३ | १५१ |
| विविध विषय व्याख्याने | ३ | ११२ |
| बहर जोपासताना कार्यशाळा | ४ | २९० पालक |
| ओळख स्पर्शाची ३६० डिग्री (क्षेत्र प्रशिक्षकांचे प्रशिक्षण) | | ९५ |

प्रज्ञा मानस संशोधिका आणि संवादिनीच्या एकत्रित प्रकल्पांतर्गत झालेल्या कार्यशाळांचा आढावा -

| | क्षेत्र प्रशिक्षक | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| संयम | ५५९ | २५५८७ |
| HCL युवा साथी | ७० | २३६० |
| Palladium युवा साथी | ३० | १५०० |

▲▲▲

## १४. जिजामाता दल

करोनाकाळात दोन वर्षं एकही आठवडा सुट्टी न घेता दर सोमवारी दल दूरस्थ पद्धतीने भरत होते. या वर्षापासून दर सोमवारी दूरस्थ आणि बुधवारी प्रत्यक्ष दल भरत होते.

१. दि. ८ जुलै २०२२ रोजी वर्षारंभ उपासना झाली.
२. सदस्यांनी भगवद्गीतेवरील २०० प्रश्न सोडवायला घेतलेले आहेत. हा प्रकल्प पुढील वर्षापर्यंत चालू राहील.
३. माधवीताई जोशी यांनी कनकधारा स्तोत्राची दलावर माहिती दिली.
४. झेलमताई वाटवे यांच्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या 'वाटचाल' या मासिकात छापून आलेल्या 'खिडकी' या लेखाला प्रथम पारितोषिक मिळाले. तो लेख त्यांनी दलावर वाचून दाखवला.
५. सुहासिनीताई दांडेकर यांनी समर्थ रामदासांच्या वाङ्मयावर असलेल्या निबंध स्पर्धेत भाग घेतला होता. 'मुखे बोलण्यासारखे चालताहे' या विषयावर लिहिलेल्या निबंधाला त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले. तो लेख त्यांनी दलावर वाचून दाखवला.
६. या वर्षापासून 'प्रबोधिनीचे पथदर्शी' यांवर व्याख्यान आयोजित करत आहोत. त्यासाठी माधवीताई जोशी यांना स्वामी अरविंद यांवर व्याख्यान देण्यासाठी बोलावले होते.
७. ११ एप्रिल या दिवशी संचालक भेट होती. इतक्या वर्षांमध्ये प्रथमच वर्षारंभ आणि वर्षाचा शेवटचा दिवस या दोन्ही वेळेला माननीय संचालकांचे मार्गदर्शन आम्हाला मिळाले.
८. पुढच्या वर्षी दल १४ जून रोजी सुरू होईल.
९. वैशालीताई दुबळे आणि कालिंदीताई केळकर पुढील वर्षीच्या प्रतोद असतील.

▲▲▲

# १५. नागरीवस्ती अभ्यासगट

### ◈ वस्तीभेटी व कुटुंबभेटी

पुढील दहा वर्षांत संवाद, संपर्क, सर्वेक्षण या मार्फत प्रबोधिनी १०० वस्त्यांमध्ये १०,००० कुटुंबांमार्फत सर्व वयोगटांसाठी ५०,००० लोकांपर्यंत पोहोचलेली असेल असे विभागाने ठरवले आहे. या वर्षी वस्तीभेटी, कुटुंब सर्वेक्षण व प्रकल्प या निमित्ताने १५ वस्त्यांमधील १,०४४ कुटुंबांमधील ३,३६० लोकांपर्यंत संपर्क झाला.

| क्र. | वस्तीचे नाव | कुटुंब संख्या |
|---|---|---|
| १. | अप्पर इंदिरानगर, सरगम चाळ - दोन भेटी | १०० |
| | विद्यार्थ्यांचे कुटुंब सर्वेक्षण | २१५ |
| २. | वारजे माळवाडी - तीन भेटी | २३ |
| ३. | हडपसर नानावटी नगर - सहा भेटी | ५० |
| ४. | काशिवाडी - तीन भेटी | ४५ |
| ५. | वडारवाडी गुंजाळवाडी - पाच भेटी | ७५ |
| | पी.एम.सी कॉलनी | २५ |
| ६. | रामोशीवाडी युवक सर्वेक्षण | ४५ |
| ७. | जोशी वाडा सदशिव पेठ - पाच भेटी | ५२ |
| ८. | कालवड लोहगाव / विकास नगर | २५ |
| ९. | विश्रांतवाडी | ४० |
| १०. | फुलेनगर आळंदी रस्ता | २० |
| ११. | वडगावशेरी | ३० |
| १२. | गणेश नगर : ओटा वसाहत | ३० |
| १३. | सातचाळ | २० |
| १४. | कर्वेनगर माईसाहेब ठाकरे वसाहत | १५ |
| १५. | लक्ष्मीनगर, पर्वती | ३० |
| | विद्यार्थ्यांचे कुटुंब सर्वेक्षण | २०४ |

### ◈ महिला संघटन, प्रबोधन व प्रशिक्षण

नागरीवस्ती भागातील स्त्रियांचे संघटन सावित्री दल या नावाने केले जाते. विविध वस्त्यांमध्ये व ज्ञान प्रबोधिनीच्या वास्तूमध्ये त्यांचे कार्यक्रम घेतले जातात. पुढील दहा वर्षांत सहविचार गटामार्फत सर्व वस्त्या मिळून १०,००० महिलांचा संपर्क, संवाद झालेला असेल व त्यातील ३,००० महिलांचे संघटन झालेले असेल आणि सावित्री दलाच्या पाच शाखा होतील, असे उद्दिष्ट विभागाने समोर ठेवले आहे.

या वर्षी झालेल्या कार्यक्रमांमधून ८२४ महिलांशी संपर्क झाला, त्याचे तपशील पुढील तक्त्यात आहेत -

| क्र. | उपक्रम | काय घेतले | संख्या |
|---|---|---|---|
| १. | महिला सहविचार बैठक - पाक्षिक | कार्यक्रमाचे निवेदन व नियोजन | ७ |
| २. | आषाढी एकादशी २०२२ | पंचपदी व निरुपणा-सहित भजन | ६५ |
| ३. | वस्तीतील महिलांच्या भेटी | अप्पर इंदिरानगर, काशिवाडी, वडारवाडी | १२ |
| ४. | उद्योजकता प्रशिक्षण व स्वयंरोजगार | बांबू प्रशिक्षण - दोन वर्ग झाले | २० |
| ५. | शारदोत्सव - उद्योजक मेळावा | सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, वैचारिक सत्र, प्रदर्शन | १६० |
| ६. | आधुनिक नवरात्र (दि. ३ ते १२ जानेवारी, सावित्रीबाई फुले जयंती ते जिजामाता जयंती) | विविध राज्यांचा अभ्यास करून PPT द्वारे मांडणी - ३० युवती + महिला | ६० |
| ७. | वस्तीभेटी महिलांशी संपर्क | १० वस्त्यांमधून | ५०० |

### ◈ शालेय विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

पुढील दहा वर्षांत सर्व वयोगटांसाठी सर्वांगीण विकास ते सर्वांगीण स्वावलंबन असा प्रवास पूर्ण झालेला असेल, असे उद्दिष्ट विभागाने समोर ठेवले आहे. इ. १ली ते १०वीच्या एकूण ५४३ मुला-मुलींसाठी या वर्षी झालेले उपक्रम पुढीलप्रमाणे -

| उपक्रम | इयत्ता व संख्या | वस्त्या / तास |
|---|---|---|
| विश्वकर्मा शाळा व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्याव्रत : चांगल्या सवयी, चांगला माणूस | इ. ७वीतील १२३ मुले, मुली | ४० तासिका |
| आनंदी शिक्षण प्रकल्प | इ. ३री व ४थीतील १०० मुले, मुली | ४ वस्त्या |
| बालविकास प्रकल्प | इ. २री ते ७वी २०० मुले, मुली + १५ शिक्षक | १० वस्त्या |
| हिरे हायस्कूल - अभ्यास कौशल्य | ५वी ते ७वी तील १२० मुले, मुली | १२ तास |

**विश्वकर्मा शाळा विद्याव्रत संस्कार**

मागील वर्षभर सुखसागर नगर येथील विश्वकर्मा शाळेतील इ. ७वीच्या अ आणि ब या दोन्ही वर्गांवर घड्याळी एक तास या पद्धतीने व्यक्तिमत्त्व विकसनाच्या ४० तासिका घेण्यात आल्या. दि. १० ते १४ एप्रिल २३ या चार दिवसांत त्याच मुलांचा विद्याव्रत संस्कारदेखील झाला. आपल्यातील नको असलेल्या गोष्टी ठरवून जाणीवपूर्वक काढून टाकायच्या, त्यासाठी स्वतः प्रयत्न करायचे आणि चांगल्या सवयी लावून घेण्यासाठी ठरवून सतत प्रयत्न करत राहायचे या दोन्ही गोष्टींसाठी मुलामुलींनी काही संकल्प केले. एकूण ११६ मुलामुलींनी विद्याव्रत घेतले. १५ कार्यकर्त्यांनी काम केले.

### ◈ संस्था, व्यक्ती समन्वय

विविध समाजगटांसाठी काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा परिचय करून घेतला जाईल व त्यांच्या कार्यात शक्य ते सहकार्य, योगदान दिले जाईल या विभागाच्या भवितव्य लेखात मांडलेल्या उद्दिष्टाच्या दृष्टीने या वर्षी तीन संस्थांसोबत काम सुरू झाले आहे.

१. एक क्षण आनंदाचा - अक्षय भोईटे : अप्पर इंदिरानगर, पुणे येथील एक क्षण आनंदाचा या संस्थेला या वर्षी भेट दिली. संस्थेतील ४० मुलांसोबत आनंदी शिक्षण प्रकल्प सुरू आहे.
२. सेवातीर्थ - सचिन गायकवाड : बीड येथील या संस्थेचा ज्ञान प्रबोधिनी परिवाराशी परिचय झाला. संस्थात्मक व वैयक्तिक पातळीवर गरजेनुसार मदत सध्या दिली जाते आहे. या वर्षी सौर दिवे भेट दिले.
३. संकल्प वसतिगृह - विजय भोसले : राशीन येथे सावित्री दलाच्या महिला व युवतींची संस्थाभेट झाली. मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप केले गेले. संस्थेच्या परिचयातून त्यांना या वर्षी सेवा गौरव पुरस्कार मिळाला आहे. या वर्षी सौर दिवे भेट दिले.

### ◈ युवती संघटन

दहा वर्षांत १,००० युवतींपर्यंत संपर्क साधलेला असेल, ५०० युवतींचे कौशल्य प्रशिक्षण व कार्यानुभव यांचा अनुभव घेऊन झालेला असेल या उद्दिष्टाच्या दृष्टीने या वर्षी एकूण १३६ युवतींचा संपर्क झाला व ३१ युवतींचे कौशल्य प्रशिक्षण झाले. त्याचे तपशील पुढील प्रमाणे -

| क्र. | उपक्रम | काय घेतले | संख्या |
|---|---|---|---|
| १. | ज्ञान प्रबोधिनी पातळीवरील युवती संघटन बैठकीत सहभाग | अभ्यासपूर्वक विषय मांडणी, उतारा वाचन व त्यावर चर्चा, मा. संचालकांचे मार्गदर्शन | ८ |
| २. | युवती प्रबोधिका बैठक | पद्य, वैचारिक सत्रे, वाचन व चर्चा | ४ |
| ३. | युवती शिष्यवृत्ती योजना | शिक्षणासाठी मदत व मार्गदर्शन | २० |
| | स्वयंरोजगार | रांगोळी काढायला शिकविली | ११ |
| | | सोलर पॅनेल बनवायला शिकवले | १२ |
| ४. | हिमोग्लोबिन तपासणी | सर्व महिला व युवती हिमोग्लोबिन तपासणी | ८२ |
| ५. | PPT प्रशिक्षण | विविध राज्यांचा अभ्यास PPT द्वारे मांडणे | ८ |
| ६. | युवती प्रतिज्ञाग्रहण | नऊ सदस्यांनी प्रथम प्रतिज्ञ तर दोन सदस्यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली | ११ |
| ७. | युवती शिष्यवृत्ती योजना | महाविद्यालयीन शिक्षणासाठी मदत व मार्गदर्शन | २० |
| ८. | मणिपूर दौरा सहभाग | ज्ञानसेतू अंतर्गत मणिपूर मधील शाळांमधून मुलांसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार | ३ |

▲▲▲

(आजची प्रबोधिनी पान क्र. ५५ वर पुढे चालू)

## ◈ आजची प्रबोधिनी ◈

❖ स्त्री-शक्ती प्रबोधन

१. संवादिनी - पुणे (मध्यवर्ती, पौड रस्ता, औंध), सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर, (समतोल द्वैमासिक, मासिक बैठक, गप्पाकट्टा इ.)
२. स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)- शिवगंगा व गुंजवणी खोरे (बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती विकास, स्वयंरोजगार)

❖ सामाजिक उद्योजकता

१. उद्योजकता विकास केंद्र, पुणे

❖ राष्ट्रीय एकात्मता

१. नागरीवस्ती अभ्यास व सल्ला मार्गदर्शन केंद्र, पुणे
२. ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प (अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)
३. ज्ञानसेतू प्रकल्प (ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू आणि काश्मिर)

❖ नेतृत्व संवर्धन

१. युवक विभाग - पुणे, निगडी, सोलापूर
२. युवती विभाग - पुणे, निगडी
३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे (प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)

# १६. युवक विभाग

| क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १. | दल संख्या | १५ शालेय दले, ८ महाविद्यालयीन दले (सदाशिव पेठ, शुक्रवार पेठ, बिबवेवाडी, सहकारनगर, कर्वेनगर, कोथरूड, वारजे, सिंहगड रस्ता, नांदेड सिटी, गोखलेनगर) |
| २. | उपस्थिती | किशोर - २५०+, कुमार - २००+ , युवक - १५०+ |
| ३. | मार्गदर्शक संख्या | ७० शालेय नियुक्त्या + ३९ महाविद्यालयीन नियुक्त्या |
| ४. | दुर्गभ्रमण | विसापूर, ढाक - बहिरी, राजगड - तोरणा, घनगड, आहुपे घाट - गोरखगड, वैराटगड, केंजळगड - रायरेश्वर, लोहगड, सिंहगड, तिकोना, विसापूर |
| ५. | खेळ | डॉजबॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेसबॉल, स्टंपबॉल, चौरस धावा, दशहस्तांतरण, कबड्डी, नौकायुद्ध, लंगडी, स्केटिंग, लाठीकाठी, खो-खो |
| ६. | स्थळभेटी | नानासाहेब पेशवे समाधी, सावरकर स्मारक, शनिवार वाडा, लाल महाल, पर्वती, केसरी, ओंकारेश्वर मंदिर |
| ७. | विशेष उपक्रम | मातृभूमिपूजन, रक्तदान शिबिर, गुरुद्वारा भेट, एकत्र सिनेमा पाहणे, सामूहिक जोर मारणे, वेल्हे सामाजिक उपक्रम, अभ्यास शिबिर, कांचनबारीची लढाई प्रदर्शनास भेट, पर्वती भेट |
| ८. | प्रासंगिक विषय | शहीद दिन, सुरतची लूट, शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक, हलदी घाटीचे युद्ध, क्रांती दिन, हैदराबाद मुक्तिसंग्राम, २६/११चा हल्ला, पानिपत लढाई, भारतीय महिलांच्या कर्तृत्वाचा अर्थ, पुण्याचा इतिहास आणि रचना, सिंहगड-राजगड-तोरणा मॅरेथॉन, |
| ९. | चरित्रकथन | गुरू गोविंदसिंह, गुरू तेगबहादुर, महाराणा प्रताप, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, योगी अरविंद, लोकमान्य टिळक, जमशेदजी टाटा, आदित्य बिर्ला |

### ◈ महाविद्यालयीन दले

पाच क्रीडा दले आणि तीन विज्ञान दले अशी एकूण आठ महाविद्यालयीन दले वर्षभर साप्ताहिक वारंवारितेने भरत होती. दलांवर नियमित खेळ/विज्ञान अभ्यास/चर्चा, प्रासंगिके, वैचारिके व पद्ये झाली. दलांनी गिर्यारोहण सहली, श्रमदान, विषय परिचय शिबिरे इ. प्रासंगिक उपक्रमसुद्धा आयोजित केले. सर्व दलांवर मिळून साप्ताहिक १५०-१६५ युवकांची सरासरी उपस्थिती होती.

**१. महाविद्यालयीन मार्गदर्शक दल**

महाविद्यालयीन दलांवर नियुक्त ४५ मार्गदर्शकांपैकी २० उपस्थितीने हे दल वर्षभर भरले.

**२. मदतकार्ये, विविध शिबिरे, उपक्रम, वैचारिके व प्रशिक्षण**

- कोथरूड, वारजे, सदाशिव पेठ, सहकारनगर या भागांमध्ये आठ रक्तदान शिबिरे झाली. एकूण ५३० पिशव्या रक्त संकलन झाले.
- दिवाळीमध्ये या वर्षीसुद्धा स्वतःहून कंदील बनवले व ते विकले. याशिवाय सौर पणतीदिवे व सौर पट्टिका बनवून त्यांची विक्री सुद्धा करण्यात आली.
- गणेशोत्सवात एकूण १५० युवकांचा कोथरूड, वारजे, नदीपात्र, सहकारनगर अशा चार ठिकाणी बरची-ध्वज-ढोल-ताशा यांचा सराव झाला. सरावानंतर प्रासंगिकेसुद्धा होत होती. सहकारनगर सरावाच्या ठिकाणी आयपीएस श्री. प्रतिक ठुबे यांचे अनुभवकथन झाले. दि. १४ व १५ ऑगस्ट रोजी १०० युवकांचे गणेशोत्सव युवक शिबिर झाले. यात प्रबोधिनीची गोष्ट, स्वातंत्र्य लढा आणि पुणे यावर खेळ इ. झाले.
- याही वर्षी गणेशमूर्ती विक्री प्रत्यक्ष व दूरस्थ अशा दोन्ही पद्धतीने झाली. सर्वात जास्त ३५० मूर्त्या या वर्षी विकल्या गेल्या. या पूर्ण प्रक्रियेत २० युवक सहभागी होते. सुमारे ३.५ लाखाची उलाढाल पूर्ण उपक्रमातून झाली.
- लालबहादूर शास्त्री दलाची राजगड ते तोरणा अशी दुर्गभ्रमण सहल झाली. शारीरिक क्षमता ताणणे आणि दुर्गांचा इतिहास एवढ्याच गोष्टी न पाहता भौगोलिकदृष्ट्या सुद्धा या दोन दुर्गांना जोडणारी नाळ, आजूबाजूचा प्रदेश, इतर मावळातील दुर्ग, घाटवाटा दृष्टीक्षेपात बसवायचा प्रयत्न केला. एकूण २१ युवकांनी सहलीत सहभाग नोंदवला.

### ◈ शालेय दले

बारा क्रीडा आणि तीन विज्ञान दले अशी पंधरा शालेय दले वर्षभर दैनंदिन किंवा साप्ताहिक वारंवारितेने भरत होती. सर्व दलांवर मिळून साप्ताहिक ५०० किशोर व कुमारांची सरासरी उपस्थिती होती.

**१. सहकारनगर भाग**

सॅम माणेकशॉ दलाने या वर्षी कंदील विक्री उपक्रमात स्वतः कागदी कंदील बनवून विकले. कुमार वयोगटासाठी मल्लखांब आणि कबड्डीच्या शिबिराचे आयोजन केले होते. छत्रपती संभाजी दलावर

किशोर शिबिर झाले, त्यामधून दहा नवीन किशोर दलावर यायला लागले. आषाढी वारीच्या निमित्ताने विविध अभंग आणि त्यांचे अर्थ दलावर समजावून सांगितले. दसऱ्याच्या निमित्ताने सर्वांनी मिळून तेराशे सामूहिक जोर मारले. छ. शिवाजी महाराज दलाने या वर्षी सासवड ते जेजुरी वारीचा टप्पा अनुभवला. दलावर सहा महिने सलग अभ्यासिका व दोन महिने सलग उपासना झाली. सायकल सहल, चित्रपट पाहणे, पथनाट्य सादर करणे इ. उपक्रम देखील झाले. गुरूनानक जयंतीनिमित्त पंधरा मुले आणि पाच मार्गदर्शक गुरुद्वारामध्ये दर्शनासाठी गेले होते.

**२. प्रशालेय भाग**

स्वा. सावरकर दलावर पथक रचनेत सहली झाल्या. मुलांनी गणेशोत्सवात चार हजारपेक्षा जास्त घरांमध्ये जाऊन सार्थ अथर्वशीर्ष पठण केले. पूर्ण दलाचे साने गुरुजी मित्र मंडळासमोर अथर्वशीर्ष पठणाचे महाप्रात्यक्षिक झाले. तीन दिवसांच्या हिवाळी शिबिरात मुलांनी विविध खेळ खेळले आणि ऐतिहासिक ठिकाणांना भेटी दिल्या. शिबिराच्या शेवटी त्यांचा खजिन्याचा खेळ झाला. इ. ७वीसाठी संकल्प साखळी उपक्रमाअंतर्गत दर आठवड्याला काहीतरी एक संकल्प ठरवून तो आठवडाभर पाळायचा अशी रचना बसवली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलाने गणेशोत्सवात दहा प्रात्यक्षिके आणि आठ मिरवणुकांमध्ये सहभाग घेतला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दोन्ही दलांनी मिळून एकूण ७८ ठिकाणी १,००० लोकांना सहभागी करून घेत मातृभूमिपूजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते. दि. २९ डिसें. ते १ जाने. या कालावधीमध्ये इ. ८वी ते १०वीच्या ९८ आणि पंधरा मार्गदर्शक यांचे हिवाळी तंबू शिबिर केळद आणि वेल्हे येथे झाले. शिबिरामध्ये जवळपासच्या दहा गावांमध्ये जाऊन मुलांनी गावातील मुलांचे दल घेतले.

**३. कोथरूड भाग**

क्रांतिवीर चाफेकर दलातील मुलांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने अलंकार पोलीस चौकीतील पोलीस बांधवांना राख्या बांधल्या आणि त्यांच्याशी संवाद साधला. दलावरील कुमारांचे ज्ञान प्रबोधिनीच्या वास्तूमध्ये तीन वेळा निवासी दल झाले. दलावरील अभिनव शाळेमध्ये शिकणाऱ्या कुमारांनी शाळेतील विद्यार्थ्यांचा बरची गट बसवला. त्याचे सादरीकरण शाळेच्या स्पोर्ट्स डेला झाले. गणेशोत्सवामध्ये मुलांनी ५० घरांमध्ये मातृभूमिपूजन केले ज्यामध्ये साधारण ५०० जणांनी सहभाग घेतला. गुरूगोविंदसिंह दलाने दोन महिन्यांत दर रविवारी सायकलवर पुण्यातील ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या आणि पुण्याचा इतिहास समजून घेतला. या वर्षी दलावर एकूण सत्तरहून अधिक नवीन मुले आली. शिवनगरी येथे चालणाऱ्या सेनापती बापट दलाने सलग दोन महिने अभ्यासिका घेतली. क्रीडा प्रात्यक्षिकांच्या पूर्वतयारीसाठी तीन दिवसांचे क्रीडा शिबिर डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात कोथरूड भागातील सर्व दलांसाठी झाले.

**४. गोखलेनगर भाग**

चाणक्य दलातील मुलांनी १००० पणत्या रंगवून भागाबाहेर जाऊन विकल्या. दलाचा २५-३० मुलांचा बरचीचा गट बसवला होता. सरदार वल्लभभाई पटेल दलातील मुलांनी १००० घरांमध्ये जाऊन गणपती अथर्वशीर्ष पठण करण्याचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. महाराजा रणजितसिंग दलातील मुलांनी मराठी दिनानिमित्त एकत्र बसून पुस्तके वाचली. दलावर दादांसह मुलांनीसुद्धा प्रासंगिके घेतली. दि. १३ जूनला मैदानात निवासासाठी आलेल्या माऊलींच्या मुलाखती घेतल्या व पालखीचे दर्शन घेतले. ७५व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भागातील सर्व दलांचे एकत्र मातृभूमिपूजन झाले. भागात दल सुरू होऊन १९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त टेकडीवर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. तीन दलांचे ३० जण यात सहभागी झाले. संध्याकाळी भागाचे एकत्र क्रीडादल गोखलेनगर मैदानावर झाले. ८०+ आजी-माजी युवक व मार्गदर्शक गट मैदानावर होता. दलाचा समारोप गेल्या वर्षभरात ज्या मुलांनी/मार्गदर्शकांनी उल्लेखनीय कामगिरी केली त्यांच्या कौतुक समारंभाने झाला.

### ◈ शालेय विज्ञान दले

गेल्या वर्षी कुमारांसाठी मे २२ मध्ये बालशिक्षण मंदिर, पुणे व ज्ञान प्रबोधिनी भवन येथे अशी एकूण तीन संशोधनात्मक प्रकल्प शिबिरे आयोजित करण्यात आली होती. यात मिळून १४०+ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले. मे महिन्यातील शिबिरांमध्ये महाविद्यालयीन विज्ञान दलांचाही सहभाग होता. गणेशोत्सवाच्या काळात पाच दिवस जीवशास्त्र या विषयावर प्रबोधिनीत प्रदर्शन भरवण्यात आले, तर गोखलेनगर भागात चार ठिकाणी रसायनशास्त्राचे प्रदर्शन भरवले गेले. या शिवाय साप्ताहिक दलांवर मापनशास्त्र, रसायशास्त्रात रसायने ओळखण्याच्या पद्धती, मृत प्राण्याच्या अवयवांचे विच्छेदन असेही विषय झाले. किशोरांसाठी दोन शिबिरे फेब्रुवारी व एप्रिल मध्ये झाली. विज्ञान प्रयोग, निरीक्षणकौशल्य, गाडी बनवणे स्पर्धा असे विषय यांत झाले.

### ◈ क्रीडा प्रात्यक्षिके

दि. ५ फेब्रु. २३ रोजी सुमारे सहा वर्षांनंतर क्रीडा प्रात्यक्षिके सादर झाली. यामध्ये प्रशाला आणि गोखलेनगर भागातील दलांनी संपूर्ण तयारी करून, २५० हून अधिक जणांच्या गटाने प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये दैनंदिन खेळातले क्रीडा प्रकार सोबत कुस्ती, मल्लखांब, संचलन आणि बरची यांचाही समावेश होता. दि. २६ फेब्रु. २३ रोजी कोथरूड आणि सहकारनगर भागातील दलांची क्रीडा प्रात्यक्षिके वीर खाशाबा जाधव क्रीडा निकेतन मैदानावर झाली. यामध्ये दीडशेहून अधिक मुलांनी सहभाग घेतला. दैनंदिन दलावरील खेळांसोबतच आट्यापाट्या, जळत्या बोथाट्या, बाटली-पाणी, लाठीकाठी आणि सामूहिक जोरांच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. दोन्ही प्रात्यक्षिकांच्या शेवटी मा. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

▲▲▲

# १७. युवती विभाग

◈ **प्रशालेय दले**

**(ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील ५वी ते ७वीच्या मुलींचे कमलाबाई सोहोनी दल आणि ८वी ते १०वीच्या मुलींचे कल्पना चावला दल)**

**१. गणेशोत्सव**

कमलाबाई सोहोनी दलावरील इ. ५वी आणि ६वी मुलींना दलावर स्पष्ट उच्चार आणि चालीत अथर्वशीर्ष शिकवले आणि अर्थ समजावून सांगितला. त्यानंतर गणेशोत्सवात मुलींनी २६० घरी जाऊन अथर्वशीर्ष पठण केले. यात ठरवून काही अमहाराष्ट्रीय घरांचा समावेश सुद्धा केला होता. कल्पना चावला दलातील सर्व मुलींनी बर्ची नृत्यात, आणि कमलाबाई सोहनी दलातील ७वी मुलींनी लेझिम गटात सहभाग घेतला. या सर्वांचा एक महिना नियमित सराव झाला. रोजच्या सरावा बरोबर कल्पना चावला दलाचे दोन दिवसांचे निवासी शिबिर झाले. त्यात बरची नृत्याचे नवीन प्रकार आणि त्याला साजेशा घोषणा मुलींनी तयार केल्या.

**२. शारदोत्सव**

दि. २६ सप्टें. ते ४ ऑक्टो. या कलावधीत शारदीय नवरात्राच्या निमित्ताने शक्तीचे विविध रूपात पूजन करण्यात आले. 'या देवी सर्वभूतेषु..' या स्तोत्रातील सात श्लोकांवर आधारित सात उपक्रम झाले. शक्तीरूपातील पूजन म्हणून स्वतःमधील क्षमता ओळखणे आणि वाढवणे, यासाठी दलावर तीन वेगळ्या काठिण्य पातळीच्या अडथळ्यांच्या शर्यती ठराविक वेळात घेण्यात आल्या. आईची मुलाखत आणि तिला कामात मदत करून मुलींनी मातृरूपाचे पूजन केले. आपल्या मातृभूमीत चेतनारूपाने वास करणाऱ्या शक्तीचे पूजन म्हणून दलावर मातृभमिपूजन झाले. इ. १०वी मुलींनी सर्व मुलींच्या घरी जाऊन मातृभूमिपूजन पोथी सांगितली. स्वतः कमवलेल्या लक्ष्मीरूपाचा अनुभव घेण्यासाठी मुलींनी पथकशः विक्री उपक्रमाचा संकल्प केला. इ. १०वी मुलींसाठी उद्योजकता विकास यासाठी प्रा. सुवर्णाताई गोखलेंचे व्याख्यान आयोजित केले होते. ताईंनी त्यांचे विक्री उपक्रमाचे अनुभव सांगत उद्योजकतेतील प्रक्रिया, कल्पकता, जोखीम, विश्लेषण, पारदर्शकता याबद्दल सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. दलावर भोंडल्याचे देखील आयोजन केले होते. क्षुधा शांत करणाऱ्या देवीच्या रूपाचा अनुभव म्हणून पाककलेचा अनुभव घेत मुलींनी वर्गशः खिरापत तयार केली. पारंपरिक पद्धतीने फेर धरून भोंडल्याची गाणी म्हटली. पुण्यातील पेठ भागात चिठ्यांमधील कोडी सोडवत बुद्धीचा परीचय देत पथकशः खजिना-शोध खेळ झाला. श्रीसूक्त शिकून त्याचा अर्थ मुलींनी समजून घेतला आणि मंडळांमध्ये जाऊन श्री सूक्त पठण करून श्रद्धारूपाचा अनुभव घेतला आणि उपक्रमाची सांगता झाली.

**३. विक्री उपक्रम**

दि. १६ ते २२ ऑक्टो. कल्पना चावला दल आणि कमलाबाई दलासाठी 'विक्री सप्ताह' हा पथकशः उपक्रम झाला. यामध्ये भांडवल मिळवण्यापासून शेवटचा हिशोब पूर्ण करेपर्यंत सर्व कामे मुलींनी केली. प्रत्येक पथकाला साहित्य, किंमत, जागा, नियोजन हे सर्व ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. यासाठी इ. १०वीतील मुलींनी मुख्य जबाबदारी घेतली. विक्री सप्ताहाची पूर्व तयारी म्हणून दोन आठवडे त्यांनी आवश्यक सर्वेक्षण करणे, पथकाचे उद्दिष्ट निश्चित करणे, साहित्य ठरवणे, भांडवल उभे करणे, खरेदी, प्रत्येक दिवसाचे पूर्ण पथकाचे विक्री नियोजन, विक्री करण्याच्या जागा व माध्यमे ठरवणे, स्टॉलचे नियोजन करणे, हिशोब करणे, दस्तऐवजीकरण, झालेल्या कामाचे आणि अनुभवांचे निवेदन करणे ही प्रक्रिया केली. विक्री कौशल्य, संवाद कौशल्य याबरोबर वेळ, काम यांचे नियोजन, एकमेकांमध्ये समन्वय ठेवणे ही कौशल्ये सुद्धा वापरण्याची संधी गटाला मिळाली. आपल्यापेक्षा लहान गटाबरोबर सलग एक आठवडा मोठे गटकार्य करण्याचा, गरज लागेल तिथे त्यांना मदत करण्याचा, कौशल्य शिकवण्याचाही अनुभव मुलींना मिळाला. आपापल्या पथकाच्या पूर्ण उपक्रमाची जबाबदारी प्रत्येक पथकातील इ. १०वीतील मुलींनी पूर्ण केली. प्रत्येक पथकाला एक युवती मार्गदर्शन करत होती. मात्र सर्व निर्णय मुलींनी घेतले.

**४. क्रीडा शिबिर**

इ. ५वी ते ८वीच्या वर्गांसाठी दि. २४ ते २७ डिसें. या कालावधीत रेणुका स्वरूपमध्ये स. ७ ते सायं. ७ क्रीडा शिबिर झाले. या वेळेचा मुख्य विषय संरक्षण असा होता. चेतना व्यायाम व संचलन झाल्यानंतर सकाळच्या वेळेत इ. ५-६वीसाठी तायक्वांदो आणि इ. ७-८वीसाठी कलरीपयट्टू या स्वसंरक्षण तंत्राची सत्रे झाले. नंतर दिवसभरात गटकार्य, वैचारिक व स्पर्धेच्या तयारीचे नियोजन होते. गटकार्यांमध्ये प्रथमोपचार म्हणून काय करावे-टाळावे, पद्यावर संचलन बसवणे इ. झाले. वैचारिकांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात उभी केलेली सेना, सध्याचे संरक्षण खात्याचे काम व माहिती आणि अनुभवकथनाची योजना केली गेली. लेफ्ट. जन. सुदर्शन हसबनीस हे अनुभवकथनासाठी आले होते. शेवटच्या दिवशी सात वेगवेगळ्या पथकशः स्पर्धा होऊन शिबिराचा समारोप झाला.

**५. तंबू शिबिर**

ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता यावा, तेथील जीवन पद्धती, समृद्धी आणि प्रश्न यांचा परिचय व्हावा या हेतूने दि. २८ डिसें. २२ ते १ जाने. २३ या कालावधीत कल्पना चावला दलातील इ. ९-१०वी मुलींसाठी कुसगाव येथे तंबू शिबिर झाले. या शिबिरात ७७ मुली आणि सात मार्गदर्शिका सहभागी झाल्या. स.

६:३० ते रा. ११ शिबिरातील दिनक्रम होता. शिबिराची सुरुवात जागा शोधण्यापासून झाली. प्रत्येक पथक शिबिराच्या जागेवर आपापला रस्ता शोधत पोहोचले. पथनाट्य बसवणे, विविध आपत्ती परिस्थितींमध्ये वापरता येतील असे प्रथमोपचार संच तयार करणे व प्रात्यक्षिक दाखवणे, प्रबोधन गीतांमधील ग्रामीण गीतांवर भित्तीपत्रक तयार करणे, आदर्श गावाची प्रतिकृती बनवणे आणि गावातील विविध रचना, व्यवस्थापन यांचे नियोजन करणे अशी गटकार्ये मुलींनी केली. वैचारिक सत्रात प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी प्रबोधिनीच्या ग्रामविकसन कार्याचा प्रवास सांगितला. मुली शिबिरातील एक दिवस आणि रात्र निवासासाठी कुसगाव जवळील दहा गावांमध्ये गेल्या व स्थानिकांच्या घरी राहिल्या. गाव फिरून त्या गावाचा नकाशा तयार करणे, गावातील लोकांच्या मुलाखती घेणे, नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुका, गावातले सण, व्यवसाय, वस्त्या, सुविधा, शाळा, स्थलांतर याबद्दल माहिती मिळवणे, जमीन सारवणे, दूध काढणे, शेतीतील कामे करणे असे अनुभव त्यांनी घेतले. मुलींनी प्रत्येक गावातील मुलामुलींसाठी विज्ञान प्रयोग आणि कलासत्र घेतली.

### ◈ प्रबोध शालेय दले

दि. १६ ते १८ मे २२ प्रबोधिनी सोडून अन्य शाळेतील इ. ५वी ते ७वीच्या मुलींसाठी प्रबोध शालेय शिबिर झाले. यात आठ मार्गदर्शिका आणि ८० मुलींचा गट सहभागी होता. शिबिरातील दिवसाची सुरुवात पद्यसत्राने व्हायची. वैचारिक सत्रात प्रबोधिनी परिचय, छोट्या चित्रफितींवर चर्चा आणि युवतींच्या पथकाधिपती राजमाता जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले व भगिनी निवेदिता या विषयांवर बोलणे झाले. कृतीसत्र, वैज्ञानिक खेळणी बनवणे, मानवी मनोऱ्याचे सादरीकरण, गटाने विज्ञान प्रयोग बघणे आणि स्वतः करणे, भित्तीपत्रक बनवणे अशी सत्रेही झाली. रोज दिवसातले शेवटचे सत्र हे मैदानी खेळासाठी राखीव होते. यात सहभागी व अन्यही नव्याने संपर्कात येणारा प्रबोध शालेय मुलींसाठी गट सरासरी २० ते २५ उपस्थितीने नियमितपणे साप्ताहिक दलासाठी जमतो.

#### १. विज्ञान शिबिर

दि. ४ ते ९ जून २२ इ. ८वी ते १०वीच्या प्रबोध शालेय मुलींसाठी विज्ञान शिबिर झाले. १० युवती आणि २१ शालेय मुलींचा गट यात सहभागी होता. सहभागींना संशोधनात्मक प्रकल्प पद्धतीचे मार्गदर्शन दिले गेले. निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य अशी कौशल्ये विकसित व्हावीत म्हणून हे झाले. स्वतः प्रयोग कसे व कुठले करायचे हे ठरवून प्रकल्पाच्या विषयांच्या प्रयोगांचा आराखडा तयार करून, प्रत्यक्ष प्रयोग करण्याची मजा मुलींनी घेतली. या प्रयोगाच्या नोंदी ठेवून, मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कसे करावे हे सांगितले. असे माहितीचे विश्लेषण करून मुलींनी प्रकल्पाचे लेखी अहवाल सादर केले. या शिबिरात केलेल्या प्रकल्पाचे सादरीकरण व त्यासाठी पारदर्शिका तयार करण्याचे मार्गदर्शन देण्यासाठी सत्र झाले. दि. १९ जून २२ रोजी प्रकल्पांच्या अहवालाचे सादरीकरण झाले.

### ◈ महाविद्यालयीन दले

सरासरी १५ ते २० उपस्थितीने नियमितपणे साप्ताहिक दलासाठी महाविद्यालयीन गट वर्षभर जमत होता. या गटासाठी क्रीडादल, व्याख्याने, कार्यशाळा असे उपक्रम झाले. गणेशोत्सव आणि दीपोत्सवामुळे अधिक युवती संपर्कात आल्या. गणेशोत्सवात बरची, लेझिम आणि वादकगट याबरोबर अथर्वशीर्ष पठणाची योजना केली होती. विविध वयोगटातील २५० युवतींनी यासाठी नावनोंदणी केली. प्रत्यक्षात १५० युवती नियमित दोन महिने सहभागी झाल्या. विभागाची वर्षारंभ उपासना आणि गणेशोत्सवातील प्रबोधिनीतील आरती व त्यानिमित्ताने अनौपचारिक मेळावा यासाठी सुद्धा गट उपस्थित होता. जास्तीत-जास्त लोकांपर्यंत प्रबोधिनीची बरची नृत्यामागची भूमिका पोहोचवण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी धडक प्रात्यक्षिके हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी केला. त्यासाठी सिंहगड रस्ता, हडपसर, सहकारनगर आणि पेठा हे चार भाग निवडून तिथे थोड्या-थोड्या अंतरावरील मंडळांमध्ये संपर्क केले. तिथे छोटी प्रात्यक्षिके आणि भूमिका मांडणी केली. अशी एकाच दिवशी १२ प्रात्यक्षिके केली. पूर्ण प्रक्रियेत एकूण २७ महाविद्यालयीन युवतींनी जबाबदारी घेऊन काम केले. दि. ३० ऑक्टो. रोजी दीपोत्सव झाला. सुमारे ९० महाविद्यालयीन युवती याला उपस्थित होत्या. प्रबोधिनीच्या वास्तूत पणत्या लावणे व पद्यगायन झाले. प्रार्थना म्हणून समारोप झाला.

### ◈ युवती संघटन बैठक

वर्षभर मध्यवर्ती युवती समिती आणि विस्तारित युवती समितीच्या द्वैमासिक पद्धतीने सहा बैठकी झाल्या. पुणे, निगडी, वेल्हे आणि हराळी केंद्रातील प्रमुख युवती सरासरी २० उपस्थितीने या बैठकीसाठी जमत होत्या. सर्व ठिकाणी युवती संघटनाचे काम वाढण्याच्या दृष्टीने आवश्यक चर्चा, प्रशिक्षण, युवतींनी विविध विषयांवर अभ्यासपूर्वक मांडणी करणे, मा. संचालक वाच. गिरीशराव बापट यांचे मार्गदर्शन अशी सत्रे झाली. स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या प्रतिनिधी देखील यात प्रासंगिक सहभागी झाल्या.

### ◈ अन्य महत्त्वाचे

पुणे केंद्रात आषाढी एकादशीनिमित्त दि. १० जुलै २२ रोजी भजन झाले. भजनातील अभंग सांगणाऱ्या गटांच्या सरावाची जबाबदारी युवती विभाग व अन्य तांत्रिक जबाबदारी प्रशालेनी घेतली होती. युवती विभाग, प्रशाला, नागरीवस्ती अभ्यासगट, संवादिनी, युवक विभाग या विभागांतून भजन सांगण्यासाठी गट सहभागी झाले. भजनात ७वी ते १०वीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींशिवाय सुमारे ३००-३५० अन्य सदस्य प्रत्यक्ष सहभागी झाले.

▲▲▲

# १८. उद्योजकता विकास केंद्र

वृत्तांत वर्षात या केंद्राची मांडणी वेगळ्या स्वरूपाची करण्यात आली. केंद्राचे कार्यालयीन काम दोन वर्षे सांभाळणाऱ्या श्री. दीपक कोतकर यांनी स्वतःचा सौर उद्योग सुरू केला. श्रीमती मधुराणी शिखरे यांनीही एका उद्योगास सल्लासेवा देण्यास सुरुवात केली. त्या आधी त्यांनी शिवापूरच्या महिलांसाठी इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या जुळणीचा उद्योग करण्यासाठी पुण्यातील मेल्को या समूहामध्ये चाचण्या घेतल्या. त्यानंतर कार्यालयीन कामाला स्थिर व्यक्ती नेमण्याऐवजी प्रबोधिनीच्या एकूण रचनेत उद्योजकता हा विषय रुजवण्यासाठी विविध रचना करण्यात आल्या.

**◈ सामाजिक उद्योजकता**

प्रबोधिनीचा सन २०२२ ते २०३२ या कालावधीसाठी जो भवितव्य लेख तयार करण्यात आला आहे, त्यामध्ये तेरावी कार्यदिशा सामाजिक उद्योजकता ही आहे. उद्योगातून व्यक्तिगत अथवा सामूहिक नफा मिळवणे स्वागतार्हच आहे. पण ती पारंपरिक उद्योजकता होते. एखाद्या सामाजिक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी अभिनव रचना करून सामाजिक मूल्यवृद्धी (social value addition) जर झाली व असा प्रयत्न आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यास त्याला सामाजिक उद्योजकता म्हटले जाते. प्रबोधिनीत असे प्रयत्न अनेक केंद्रांमधून व विभागांमधून सुरू झाले आहेत.

**१. सोलापूर विडी कामगार**

सोलापूर केंद्राने विडी कामगार महिलांच्या आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी त्यांचे प्राणायाम वर्ग सुरू केले व त्यांना कागदी पिशव्या बनविण्याचा उद्योग सुरू करून देऊन आर्थिक स्वायत्तता दिली. त्यासाठी Prabodhan Women Empowerment नावाची एक भागीदारी फर्म सुरू झाली.

**२. हराळी कृषी महाविद्यालय**

हराळी मधील कृषी महाविद्यालयाचे युवक जीवामृत व अन्य सेंद्रिय निविष्ठा तयार करून त्यांची विक्री करू लागले आहेत. पुण्यातील युवकांनी 'युवक प्रबोधन उद्योग' ही भागीदारी फर्म पूर्वीच स्थापन केली आहे. त्याद्वारे गणेश मूर्तींची विक्री, दिवाळीच्यावेळी आकाशकंदील व तेजोमय या सौर पणत्या तयार करून विकल्या जातात. या व्यवसायातून युवकांचे अभ्यासदौरे व शिबिरे यांचाही खर्च बाहेर पडतो.

**३. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांना राखी विक्री, दिनदर्शिका विक्री, इ. मधून उद्योजकतेचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी गतवर्षात एक Section 8 कंपनी स्थापन केली असून त्याचे सुमारे ४०० सभासद आहेत. त्यापैकी १५० जण स्वतःचे उद्योग व्यवसाय चालवतात. त्यांनी दि. ३० ऑक्टो. २०२२ रोजी एकत्र जमून एक बिझिनेस ग्रुप तयार केला आहे. अनुभवी उद्योजकांनी नव्या स्टार्टअप्स्ना मदत करण्याचे काम त्यात सुरू झाले आहे. असे कल्याणमित्र (mentors) मोठ्या संख्येने उभे राहावेत, हा उद्योजकता विकास केंद्राचा उद्देश यातून साध्य होईल.

**४. प्रज्ञा मानस संशोधिका**

प्रज्ञा मानस संशोधिकेने उद्योजकतेच्या अभिवृत्तीच्या चाचपणीसाठी जी BEAM नावाची चाचणी तयार केली आहे, तिचा प्रसार चालू आहे. विविध उद्योगांना जी डिझाईन ॲप्टिट्यूड लागते, ती तपासण्यासाठी संशोधिकेने गेल्यावर्षी एक नवी चाचणी सिद्ध केली.

**५. स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण**

ग्रामीण भागामध्ये वेल्हे तालुक्यात इंधन कांड्या तयार करण्यासाठी नेपियर जातीच्या हत्ती गवताची लागवड केली आहे. हरित ऊर्जा बचत गट या नावाने स्थानिक महिला हा व्यवसाय चालवतील. ग्लोबंट या कंपनीच्या CSR मधून त्यास प्रारंभिक साहाय्य झाले आहे.

**६. निगडी केंद्र : जैव तंत्रज्ञान**

निगडी केंद्राच्या जैव तंत्रज्ञान विभागाने केंद्र शासनाच्या नीति आयोगाअंतर्गत जे अटल इनोव्हेशन मिशन आहे, त्यांच्याकडे कम्युनिटी सेंटरसाठी प्रस्ताव दिला होता. तो वृत्तांत वर्षात मंजूर झाला. ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation या नावाने एक Section 8 कंपनी स्थापन केली आहे. शेती व जैवतंत्रज्ञान या विषयातील उद्योजकांना त्यांच्या संशोधनाचे उद्योग-व्यवसायात रूपांतर करण्यासाठी ही कंपनी मदत करेल. पुढील वर्षीपासून पाच वर्षे हा प्रकल्प चालणार आहे. व त्याही पुढे हे केंद्र आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे, अशी मांडणी केली आहे.

शालेय पातळीवर इ. ९वी ते १२वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये उद्योजकतेचे गुण अंगी बाणावेत, यासाठी दिल्लीच्या राज्य शिक्षणशास्त्र व संशोधन संस्थेने एक अभ्यासक्रम तयार केला आहे. त्याची पाहणी निगडी गुरुकुलाचे प्रमुख श्री. आदित्य शिंदे यांनी तेथे जाऊन केली. आपल्याकडील अभ्यासक्रमात या गुणांचा समावेश करण्याची हालचाल सुरू केली आहे.

निगडीच्या पालकसंघाने नव्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी गतवर्षात दोन मेळावे घेतले. पालक व शिक्षक यांच्या दोन प्रतिनिधींनी नागपूर येथे जाऊन बांबू उद्योगाचे प्रशिक्षण घेतले.

अशा प्रकारे प्रबोधिनीच्या विविध केंद्रांमध्ये व विभागांमध्ये तसेच विविध वयोगटांसाठी उद्योजकता या विषयाला प्राधान्य देण्यासाठीच्या रचना वृत्तांत वर्षात उभ्या राहिल्या आहेत. आगामी काळात त्यांचे चांगले निष्कर्ष आपल्या हाती येतील.

▲▲▲

# १९. निगडी केंद्र

## ◈ राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा आयुर्वेद परिषद

क्रीडाकुलच्या रौप्यमहोत्सवानिमित्त वर्षभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यापैकीच एक म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा आयुर्वेद परिषद! ही परिषद आयुर्वेद व्यासपीठ व चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय या दोन संस्थांच्या सहयोगाने दि. १८ व १९ फेब्रु. २३ रोजी झाली. या परिषदेला आयुष मंत्रालयाने लोगो सपोर्ट दिला होता. परिषदेसाठी संपूर्ण भारतातून २०४ वैद्य प्रत्यक्ष उपस्थित होते. तर २३० जणांनी दूरस्थ पद्धतीने सहभाग नोंदवला. क्रीडा क्षेत्रामध्ये आयुर्वेदाचे योगदान असणारे वेगवेगळे विषय केंद्रस्थानी ठेवून या परिषदेची रचना करण्यात आली होती.

परिषदेचा उद्घाटन सोहळा श्री. श्रीराम सावरीकर, श्री. विनय वेलणकर, श्री. संजीव सोनवणे, श्री. गोविंद रेड्डी, श्रीमती राही सरनोबत, श्री. श्रीरंग बारणे, श्री. अमर साबळे या मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. सहा विषयांवर अनेक मान्यवर वैद्यांची व्याख्याने व परिसंवाद, विजेता - decoding the athlete या क्रीडाकुल मध्ये केलेल्या संशोधनात्मक लेखांच्या संकलन पुस्तिकेचे प्रकाशन, ४२ निबंध आणि अकरा भित्तीपत्रकांचे सादरीकरण, माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती, कर्मसाधना प्रॅक्टिकल डेमो अशा विविध सत्रांचा समावेश यात होता.

वैद्य धनंजय कुलकर्णी, वाच. गिरीशराव बापट, श्री. सुहास पाटील यांच्या उपस्थितीत समारोपाच्या सत्रात दोन दिवसांच्या अभ्यासपूर्ण मांडणीतून आलेल्या काही मुद्द्यांचा ठराव करून आयुष मंत्रालयाला पाठविण्यात आला.

## ◈ पूर्व प्राथमिक

### शैक्षणिक साधन साहित्य बनविणे स्पर्धा

'रोज नवे ज्ञान दिवे चेतवायाचे' या काव्यपंक्तीनुसार पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षक रोज नवा विचार करत असतात. दरवर्षी ज्या संकल्पना स्पष्टीकरणासाठी नवे प्रश्न उभे राहतात तशी नव्या विचारांना संधी मिळत राहते. या संधीचा फायदा घेत या वर्षी विभागातील शिक्षकांनी अनेक साधनांची निर्मिती केली.

'शैक्षणिक गुणवत्ता' खात्यांतर्गत शैक्षणिक साधन साहित्य स्पर्धेचे आयोजन केले होते. साधनांच्या निर्मितीत आणि उपयोजनात उत्तमता यावी, या उद्देशाने या उपक्रमाला स्पर्धेचे स्वरूप दिलेले होते. साहित्यामध्ये वाचन, गणन, बौद्धिक खेळ, विज्ञान, शारीरिक, भाषा या विषयांचा समावेश होता. स्पर्धेपूर्वी या साधनांची जुजबी मांडणी केली आणि त्यात एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करून आवश्यक तिथे भर, बदल व दुरुस्ती करून त्याचे सुंदर सादरीकरण प्रत्यक्ष स्पर्धेदिवशी केले. स्पर्धेला परीक्षक म्हणून केंद्रातील प्राथमिक गट क्रमांक दोनच्या विभागप्रमुख प्रा. सुवर्णाताई विसे आणि संगणक विभागाच्या प्रमुख प्रा. अनुजाताई भंडारी उपस्थित होत्या. परीक्षकांनी आणि वरिष्ठांनी सर्वांचे साधन साहित्य पाहून खूप कौतुक केले. नवनिर्मित साधन साहित्याचा वापर नियमित होण्यासाठी त्याची रचना अभ्यासक्रमातही बसवली.

## ◈ प्राथमिक गट क्र. १

### विनादप्तर शाळा

या वर्षी प्राथमिक गट क्रमांक १ (पहिली-दुसरी) विभागात दर शनिवारी विनादप्तर शाळेचे नियोजन ठरवले होते. चैतन्यमय आणि उत्साहवर्धक वातावरणात मुलांचे शिक्षण व्हावे, मुलांमध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव मिळावा, परिसरातील प्रकल्पांना भेटी देऊन माहिती मिळवावी, यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते. दर शनिवारी मातीकाम, अभिनय गीत, गोष्ट, कारक कौशल्यांचे खेळ, प्रतिभा विकसनाचे वेगवेगळे खेळ, विज्ञान प्रयोग, क्षेत्रभेटी आदी उपक्रम राबविण्यात आले. या खेळाच्या वेळोवेळी ठेवल्या गेलेल्या नोंदींमधून मुलांच्या बाबत अनेक निरीक्षणे समोर आली.

द्वितीय सत्रामध्ये थोडासा बदल करून कारक कौशल्य विकसनासाठी हस्त-नेत्र, पाद-नेत्र, हस्त-पाद समन्वयाचे २५ खेळ घेण्यात आले. श्रवण कौशल्यावर आधारित ३० खेळ देखील घेण्यात आले. यामुळे कवायत, संगीतावर हालचाली आणि सामूहिक व्यायाम प्रकार यामुळे सांघिक कृती करण्याचा आनंद मुलांना मिळाला.

थोडक्यात दप्तरांच्या ओझ्यातून मुक्तता होऊन एक दिवस मुलांना मनासारखे वावरण्याची, दर शनिवारी शाळेत आनंदाने यायची सवय लागली आणि त्यामुळे उपस्थितीचे प्रमाणदेखील वाढलेले दिसून आले. अनेक शारीरिक, बौद्धिक खेळांमुळे मुलांची कल्पनाशक्ती वाढीस लागली तसेच बहुदिश विचार करण्याची संधी उपलब्ध झाली.

## ◈ प्राथमिक गट क्र.२

### बालशौर्य उपक्रम

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या वर्षी विभागात (तिसरी-चौथी) बालशौर्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांचा अभ्यास करूया असे ठरविण्यात आले. बालशौर्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे कार्य जाणून घेणे, शूरवीरांच्या धाडसातून प्रेरणा मिळविणे, प्रत्यक्ष कृतीतून व अनुभवातून शिकण्याची संधी देणे अशा उद्दिष्टांतून ही कल्पना साकार झाली. दिवाळीच्या सुट्टीआधी वर्गशिक्षकांनी बालशौर्य पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांची निवड केली. आठ वर्गांचे पाच-पाच विद्यार्थ्यांचे गट पाडले, प्रत्येक गटाला एक याप्रमाणे वर्गशः दहा बालशौर्य पुरस्कार प्राप्त मुलांची विभागणी केली. अशा प्रकारे इयत्ता तिसरी व चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी ७५

वर्षांच्या कालावधीत बालशौर्य पुरस्कार मिळविणाऱ्या ७५ ते ८० बालवीरांच्या कार्याचा अभ्यास करून, त्यांच्या माहितीचे संकलन केले. जवळपास चार-पाच महिने विद्यार्थ्यांनी गटात अभ्यास केला. अध्यापकांनी प्रत्येक गटाचे नाटक बसवून तयारी करून घेतली.

या उपक्रमाचे प्रदर्शन व सादरीकरणाचे आयोजन दि. २५ फेब्रु. रोजी मनोहर सभागृह व प्राथमिकच्या वर्गांमध्ये करण्यात आले. चि. आयुष तापकीर आणि कु. शिवांगी काळे या बालवीरांनी पालकांसह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती नोंदविली. दोन विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात अभ्यासाविषयीचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पाहुणे बालवीरांनी स्वतः केलेल्या धाडसाविषयी मनोगत व्यक्त केले.

### ◈ पूर्व माध्यमिक

#### क्रांतिसप्ताह

पूर्व माध्यमिक विभागामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत परिपाठामध्ये क्रांतिसप्ताहाचे आयोजन केले होते. विविध ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या जीवनातील स्फूर्तिदायक व प्रेरक प्रसंग विद्यार्थ्यांना माहीत करून देणे, राष्ट्रप्रेम जागृत करणे, स्वातंत्र्य प्राप्त करण्यामागील स्वातंत्र्यसेनानी-क्रांतिकारकांचा निस्सीम त्याग तसेच राष्ट्रनिष्ठा त्याबद्दल कृतज्ञता निर्माण करणे, विद्यार्थ्यांना कथाकथनाची संधी उपलब्ध करून देणे अशा अनेकविध उद्दिष्टांचा विचार या उपक्रमात केला होता.

या क्रांतिसप्ताहाची सुरुवात चिंचवडमध्ये राष्ट्रीय सेविका समितीच्या महिला विभागातर्फे करण्यात आली. त्यांनी विविध शाळांमध्ये एकूण २५ विविध क्रांतिकारकांची चरित्रे सांगण्याचा संकल्प केलेला होता. यानिमित्ताने या महिलांनी दि. ९ ऑगस्ट २२ रोजी पाच आदिवासी क्रांतिकारकांच्या (अल्लुरी सीताराम राजू, राघोजी भांगरे, बिरसा मुंडा, सिधू आणि कानू मुर्मू, झलकारी बाई) कथा सांगितल्या. यानिमित्ताने परिचित नसणाऱ्या क्रांतिकारकांविषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. यानंतर पुढील सप्ताहात दोन विद्यार्थी आणि एक इतिहास अध्यापक यांनी परिपाठामध्ये क्रांतिकारकांविषयी माहिती सांगितली.

विद्यार्थ्यांनी केलेल्या क्रांतिकारकांच्या जीवनपटाचा अभ्यास योग्य शब्दात कथारूपात मांडता यावा, या उद्देशाने क्रांतिसप्ताहाच्या निमित्ताने २३ ऑगस्ट रोजी 'स्मरण क्रांतिज्योतींचे' या आंतरवर्गीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये सुमारे ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

### ◈ माध्यमिक मराठी

#### परीक्षा पे चर्चा

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विद्यालयात दि. २७ जाने. रोजी अभ्यासपर्व व पुस्तक प्रकाशन सोहळा या सर्व कार्यक्रमाचे 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाला जोडून नियोजन केले होते. संपूर्ण कार्यक्रमासाठी इ. नववी-दहावीचे विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते. भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी विद्यार्थ्यांशी दूरस्थ संवाद साधला. विद्यार्थ्यांशी बोलताना त्यांनी आता ही माझीच परीक्षा आहे आणि कोटी-कोटी विद्यार्थी माझी परीक्षा घेत आहेत याचा मला आनंद आहे असे सांगून परीक्षेची भीती घालवली.

देशविदेशातील विविध शाळांमधील जवळजवळ तीस लाख विद्यार्थी आ. पंतप्रधानांचा हा कार्यक्रम दूरस्थ ऐकत होते. त्यापैकी विविध राज्यांमधील अनेक ठिकाणाहून काही विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळी असलेला ताणतणाव, परीक्षेच्या समस्या, प्रश्नपत्रिका कशी हाताळावी इ. विषयांवर प्रश्न विचारले. याला उत्तर देताना पंतप्रधानांनी समय नियोजनावर अधिक भर द्यावा आणि यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे उदाहरण सतत डोळ्यांसमोर ठेवावे असे सुचवले.

विद्यार्थ्यांनी स्वतःला ओळखले पाहिजे आणि आपल्या ध्येयावर ठाम राहून परीक्षा अतिशय उत्साहात दिली पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने shortcut will cut you sure हे वाक्य लक्षात ठेवत ध्येयनिष्ठ राहून मेहनत करावी, सकारात्मक उर्जा निर्माण करायला हवी आणि त्यासोबतच प्रत्येक समस्येकडे संधी म्हणून पाहून त्याचा शिक्षणात उपयोग करायला हवा, असेही आ. मोदीजी म्हणाले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना मानसिक बळ देत त्यांच्यातील परीक्षेविषयी असलेल्या तणावाचे निराकरण करून अतिशय प्रेरणादायी मार्गदर्शन पंतप्रधानांनी केले. परीक्षा पे चर्चाचा समारोप Exam is not a reason to worry but the season of celebrate and enjoy असे म्हणत झाला.

### ◈ माध्यमिक इंग्रजी

#### संग्रहात्मक प्रकल्प

माध्यमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी संग्रहात्मक प्रकल्प पद्धतीच्या अभ्यासातून निरीक्षण कौशल्य, वर्गीकरण कौशल्य शिकणे व ते अधिकाधिक पक्के करणे हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून विभागात संग्रहात्मक प्रकल्प केले गेले. यासह प्रत्येक वस्तू नीट हाताळता येणे, त्याला लेबलिंग करणे, संवाद करणे, जोडीने काम करणे, प्रकल्पाचे सादरीकरण करणे ही उद्दिष्टे देखील ठरविली होती. यामध्ये ५वी व ६वीच्या एकूण १०१ विद्यार्थ्यांचे ४९ गट सहभागी झाले होते. प्रथम परिचय सत्रात प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला संग्रह करावाशा वाटणाऱ्या किमान २५ वस्तूंची यादी केली. त्यानंतर प्रत्येक अध्यापकाने प्रशिक्षणात संग्रह केलेल्या वस्तूंचा सांभाळ, वर्गीकरण, नोंदणी, लेबलिंग यांचे मार्गदर्शन केले. दि. २५ नोव्हें. रोजी या विद्यार्थ्यांनी केलेल्या संग्रहाचे प्रदर्शन मनोहर सभागृहात भरविण्यात आले. अनेक विद्यार्थी हे प्रदर्शन पाहण्यास आवर्जून उपस्थित होते. या प्रकल्पात विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन श्रेणी आणि शेरे स्वरूपात द्वितीय सत्र परीक्षेच्या गुणपत्रकात दिले गेले.

## ◈ गुरुकुल

### स्नेहसंमेलन

भारताने गेल्या ७५ वर्षांत मिळवलेल्या यशाचा व प्रगतीचा आढावा मांडणारा एक कलाविष्कार यात विद्यार्थी व अध्यापकांनी सादर केला. कार्यक्रमात विविध क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानातून स्वतंत्र झालेल्या भारतापासून क्रीडा, हरितक्रांती, अवकाश विश्व, शिक्षण, काश्मीर प्रश्न - कलम ३७०, राम मंदिर, आरोग्य, संरक्षण यासारखे विविध विषय नृत्य-नाट्य-संवाद माध्यमातून प्रेक्षकांसमोर सादर केले गेले. निगडी केंद्रातील सदस्यांनी लिहिलेली, गायलेली व आपल्याच ध्वनिमुद्रणालयात ध्वनिमुद्रित झालेली कलम ३७० व राम मंदिर या विषयांवरील दोन गीते या कार्यक्रमाचे आकर्षण ठरली.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील ७५ वर्षांचा धगधगता इतिहास जाणून घेताना सर्व प्रेक्षक भारावून गेले होते. प्रेक्षकांपैकी काही सदस्य हे या घटनांचे तत्कालीन साक्षीदार असल्याने हा कार्यक्रम त्यांना खूपच भावला. एका बाजूला अवकाशविश्व, अणुक्षमता, शिक्षण यासारख्या विषयातील कामगिरीमुळे ऊर भरून येत होता तर दुसऱ्या बाजूला भारताला करावी लागलेली युद्धे, काश्मीर खोऱ्यातील भारतीयांनी सोसलेले अत्याचार, दुष्काळग्रस्त भारतातील विदारक प्रसंग पाहून डोळे पाणावत होते. पुढील २५ वर्षांच्या वाटचालीसाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत व त्याच्यासाठी राष्ट्रार्थ भव्य कृति काही आपण सर्वांना मिळून करावयाची आहे, या भावनेने संपूर्ण प्रार्थना म्हणत कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमात गुरुकुलचे २०० विद्यार्थी, १५ अध्यापक, ३५ पालक व माजी विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. सुमारे ५५० प्रेक्षकांनी मनोहर सभागृह भरले होते.

## ◈ क्रीडाकुल

### हिवाळी शिबिर

दि. २ जाने. २२ पासून क्रीडाकुलच्या रौप्य महोत्सवानिमित्त प्रात्यक्षिकांच्या सरावासाठी सर्व विद्यार्थ्यांचे हिवाळी शिबिर सुरू करण्यात आले. यात मल्लखांब, जिम्नॅस्टिक, ॲथलेटिक्स व योगासन यांच्या सरावाबरोबरच लाठीकाठीचे प्रशिक्षणही देण्यात आले. ही प्रात्यक्षिके प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवर सादर करावी असे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दि. ७ जाने. रोजी चिखली गुरुकुल, दि. २७ व २८ जाने. रोजी सोलापूर व हराळी केंद्र, दि. २८ फेब्रु. रोजी युवक विभाग सहकारनगर, दि. १६ एप्रिल रोजी डोंबिवली विस्तार केंद्र अशा विविध ठिकाणी मल्लखांब, जिम्नॅस्टिक व योगासने या क्रीडा प्रकारांची अतिशय भव्य आणि नेत्रदीपक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. दि. १८ फेब्रु. रोजी ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात ही भव्य क्रीडा प्रात्यक्षिके सादर झाली. त्यात लाठी, जिम्नॅस्टिक, मल्लखांब, तिरंदाजी, नेमबाजी, टेबल टेनिस, योगासन, ॲथलेटिक्स या खेळांचा समावेश होता. यामध्ये पालकांनी सुद्धा गोफ व लेझीमचे प्रात्यक्षिक सादर केले. जवळपास ३०० खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या प्रमुखस्थानी मा. संचालक वाच. गिरीशराव बापट उपस्थित होते.

### हनुमान जन्मोत्सवानिमित्त क्रीडाकुल रौप्य महोत्सवाची सांगता व पारितोषिक वितरण समारंभ

हा समारंभ दि. ६ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. महापराक्रमी शक्ती प्रदान करणारा हनुमान, याचे स्मरण ठेवत सकाळी मैदानावर प्रत्येक खेळाडूने २५ जोर मारले व २५ बैठका काढल्या. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या खेळाडूंचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मनोबोध पठणाची व विवेचनाची संकल्पपूर्ती करताना क्रीडाकुलच्या सर्व खेळाडू, शिक्षक व पालकांनी मनाचे संपूर्ण २०५ श्लोकांचे पठण केले. त्यातील निवडक २५ श्लोकांचे क्रीडाकुलचे सदस्य व पालकांनी मिळून निरूपण केले. अभ्यागत मा. मनीषा बाठे यांनी मार्गदर्शन करताना मनोबोधाचे एका खेळाडूच्या आयुष्यात कसे महत्त्व असते ते सांगितले. खेळाडूच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य राखण्यासाठी रोज मनोबोधाचे पठण करण्यास सांगितले. दुसरे अभ्यागत वैद्य श्री. राजीव नगरकर यांनी वैद्यकीय उपचार देताना मनोबोधाचा सकारात्मक परिणाम उपचार घेणाऱ्या व्यक्तीवर होतो हे एका सत्य घटनेच्या आधारे सांगितले.

## ◈ विशेष

पूर्व माध्यमिक विभागाचे प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. भारत-फिनलंड या दोन देशांतील शैक्षणिक क्षेत्रातील करारांतर्गत विद्यार्थी देवघेव योजनेच्या दौऱ्यासाठी श्री. शिवराज पिंपुडे यांची निवड करण्यात आली होती. फिनलंड येथील Oulu विद्यापीठ आणि तीन शाळांचा अभ्यास अशा स्वरूपाचा हा सात दिवसांचा दौरा होता. तेथील वैशिष्ट्ये, जसे की पीएच.डी. पर्यंत फिनीश भाषेतून शिक्षण, सुमारे ९०% सरकारी शाळा, निःशुल्क शिक्षण, स्वयंपाक-संगीत-हस्तकला यांचा अभ्यासक्रमात समावेश इ. समजून घेता आले.

## ◈ मुक्तिसोपान कला विभाग

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आपल्या देदीप्यमान इतिहासाचे पुन्हा-पुन्हा स्मरण व्हावे, क्रांतिकारकांचे बलिदान आठवावे, या उद्देशाने क्रांतिकारकांची गौरवगाथा या ध्वनिपुस्तिकेची निर्मिती करण्यात आली. क्रांतिकारकांना मानवंदना देण्याबरोबरच जास्तीतजास्त विद्यार्थ्यांपर्यंत या कथा पोहोचाव्यात हाही उद्देश यामागे होता. २१ वाचक, पाच तंत्रज्ञ, एक लेखक, एक संगीतकार, दोन गायक, दोन वादक अशा अनेकांनी यात योगदान दिले. या पुस्तिकेची प्रस्तावना मराठी विश्वकोशाचे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांनी स्वतः लिहून व ध्वनिमुद्रित करून पाठवली.

सर्व ध्वनिमुद्रण ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राच्या ध्वनिमुद्रणालयात करण्यात आले. दि. ११ मार्च रोजी ध्वनिपुस्तिकेचे प्रकाशन डॉ. मीनल कुलकर्णी व डॉ. संपदा थिटे यांच्या हस्ते करण्यात आले.

## ◈ संवेद

### वर्गमित्र व वर्ग संवाद

या उपक्रमाच्या अंतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांशी गप्पा झाल्या व सर्व पालक वर्गमित्र यांची विद्यार्थ्यांशी चांगली ओळख झाली. ऑगस्टमध्ये प्रज्ञानबोधिनी संस्थेमध्ये स्पर्धेसाठी वर्गमित्र संकल्पना सांगणारा निबंध पाठवला होता. त्यासाठी प्रमाणपत्र मिळाले.

विद्यालयातील सातवी अ, ब, क या तिन्ही तुकड्यांमध्ये वर्षभर नियमित आठवड्यातून एक याप्रमाणे वर्ग संवाद तासिका झाल्या. तासिकांमध्ये चालू उपक्रमांविषयी, त्याच्या उद्दिष्टांविषयी व विद्यार्थ्यांना त्यातून काय कळले याविषयी चर्चा झाल्या. वेगवेगळ्या लेखांचे वाचन व त्यावरील चर्चा, विद्यार्थ्यांचे काही प्रश्न व त्यावर चर्चा, काही वेळेला वर्गामध्ये गटश: काही उपक्रम व त्यावर चर्चा असे वेगवेगळ्या माध्यमातून हे तास घेतले.

## ◈ संगणक

### केंद्र सरकार मान्यता

संगणक विभागाला केंद्र सरकारच्या योजनेतील National Institute of Electronics IT (NIELIT), New Delhi (Ministry of Electronics and Information Technology, Government of India) या विभागामार्फत Digital Literacy Courseच्या Facilitation Centre ची मान्यता मिळाली आहे. या अंतर्गत आपण १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाच प्रकारच्या परीक्षांना बसवू शकणार आहोत.

### कौशल्य सादरीकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हे विषयसूत्र ठरवून इ. ३री ते ७वीसाठी संगणक प्रकल्पांचे विषय ठरवले. प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकाचे मूलभूत कौशल्य आत्मसात व्हावे, विद्यार्थ्यांचा गटात काम करताना आत्मविश्वास वाढावा, विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळावा या उद्देशाने दरवर्षी हे प्रकल्प सादरीकरण आयोजित केले जाते. दोन विद्यार्थ्यांचा एक गट करून प्रत्येक गटाला एक प्रकल्प देण्यात आला होता. प्रत्येक गटाला स्वतःची कल्पकता वापरून दिलेल्या वेळेत प्रकल्प पूर्ण करून तो पालकांसमोर सादर करायचा होता. दि. १३ ते २७ फेब्रु. या दिवसांत सादरीकरण झाले.

## ◈ युवती विभाग

### प्रतिज्ञाग्रहण

दि. २० ऑगस्ट २२ रोजी निगडी केंद्रात युवतींचे प्रतिज्ञाग्रहण झाले. युवती विभागातील सहा सदस्यांनी पहिली प्रतिज्ञा घेतली. मा. संचालकांनी गटात काम करत असताना गटातील व्यक्तींना त्यांच्या गुणदोषांसकट ते आपले आहेत म्हणून स्वीकारायला पाहिजे आणि त्याआधी स्वतःला जसे आहे तसे स्वीकारायला पाहिजे असे मार्गदर्शनात सांगितले. लष्करातील उदाहरण देऊन देशासाठी आवश्यक असेल ते सगळे करण्याचा प्रयत्न करा असे म्हणत त्यांनी नवीन प्रतिज्ञित सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

## ◈ युवक विभाग

### मार्गदर्शक दल

युवक विभागामध्ये जबाबदारी घेतलेल्या युवकांचे मार्गदर्शक दल वर्षभर पाक्षिक पद्धतीने होत असते. या वर्षी एकूण २० वेळा मार्गदर्शक दल जमले. या दलाचे स्वरूप हे एक तास प्रत्यक्ष मैदानावर खेळ, संचलन इ. व नंतरचा एक तास बैठक असे होते. बैठकींमध्ये मुख्यतः शालेय व महाविद्यालयीन दलांच्या कामाबद्दल चर्चा, निवेदन, प्रबोधिनी साहित्य वाचन व प्रासंगिके असे झाले. वर्षभर अपेक्षित ३३ नियुक्त सदस्यांपैकी सरासरी १८ सदस्य दलावर नियमित उपस्थित होते. या ३३ मार्गदर्शकांनी वर्षभर दोन शालेय दलांच्या माध्यमातून १५० विद्यार्थ्यांसोबत व तीन महाविद्यालयीन दलांच्या माध्यमातून २०० युवकांसोबत काम केले व त्यांच्यासाठीचे विविध उपक्रम घडवून आणले.

## ◈ पालक महासंघ

### निर्मिती कौशल्य उपक्रम

विद्यालयात या वर्षी आठवीच्या मुलांसाठी पालक महासंघातर्फे निर्मिती कौशल्य हा उपक्रम राबवला गेला. यामध्ये माती, वर्तमानपत्र, लोकर, कापड, बांबू या वेगवेगळ्या घटकांपासून विविध वस्तूंची निर्मिती शिकवली गेली. निर्मिती कौशल्य गटात सुमारे पंधरा महिला पालक सहभागी आहेत. संक्रांतीच्या सुमारास मुलांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर तिळगुळाच्या वड्यांची निर्मिती केली ही गोष्ट विशेष उल्लेखनीय होती.

## ◈ जैवतंत्रज्ञान विभाग

### ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation (ACIC JPIF)

एप्रिल २०२२ मध्ये, नीती आयोगाने, ACIC (अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर) या त्यांच्या फ्लॅगशीप कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडीची निवड केली. या कार्यक्रमाचे प्रकल्प संचालक श्री. मंगलेश यादव यांनी जुलै महिन्यात निगडी केंद्राला प्रत्यक्ष भेट दिली. ACIC संबंधित गट आणि पदाधिकारी यांच्या बरोबर चर्चा केली आणि प्रबोधिनीचे विविधांगी काम समजून घेतले. निगडी बरोबरच त्यांनी आंबी, तळेगाव येथील पॉलिहाऊस आणि साळुंब्रे केंद्राला ही भेट दिली. नवोन्मेष (innovation), उद्योजकता विकास आणि स्टार्ट अप या विषयांवर ग्रामीण भागात आणि tier 2, tier 3 स्तराच्या गावांमध्ये विशेष संधी प्रबोधिनीला या कार्यक्रमामुळे मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी बरीच पूर्वतयारी (compliance) सुरू आहे. त्याची सुरुवात म्हणून जुलै महिन्यात, ACIC ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन (ACIC JPIF) या नावाने एक सेक्शन 8 कंपनी स्थापन केली आहे.

▲▲▲

# २०. सोलापूर केंद्र

### ◈ आ. आण्णा स्मृतिदिन

दि. ९ मे २२ हा डॉ. व. सी. तथा आण्णा ताम्हनकर यांचा पाचवा स्मृतिदिन! त्यानिमित्त विडी कामगार महिलांसाठी मेळाव्याचे आयोजन केले होते. चालू असलेल्या प्राणायाम वर्गातील महिलांचा दि. ८ मे २२ रोजी सायं. ४ ते ६.३० या वेळेत चैतन्य भुवन येथे महिला मेळावा झाला. ८५ महिला यात सहभागी झाल्या होत्या. उपासना व गीता पठणानंतर स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागातील ज्येष्ठ कार्यकर्त्या मा. बागेश्रीताई पोंक्षे यांनी 'आ. आण्णांनी स्वतः जगून दाखवलेल्या गुणांचा आपल्या जीवनात कसा उपयोग करायचा' हे सर्वांना सांगितले.

### ◈ समाजदर्शन उपक्रम

या वर्षीच्या समाजदर्शन उपक्रमाचा विषय 'आमचा गाव, आमचा विकास' असा होता. १५व्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या निधीतून गावात कोणकोणती विकास कामे केली आहेत ती पाहणे, गावात कोणत्या सोयी-सुविधा आहेत यांची माहिती करून घेणे, तसेच गावाची मूलभूत माहिती मिळवणे ही या वर्षीच्या उपक्रमाची उद्दिष्टे ठरविली होती. विद्यार्थ्यांचे एकूण ३१ गट (प्रत्येक गटात इ.५वी ते १०वीचे एकूण पंधरा विद्यार्थी) उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्यांमधील एकूण ३१ निधी प्राप्त झालेल्या गावांमध्ये भेटीसाठी गेले. विद्यार्थ्यांची व मार्गदर्शकांची पूर्वतयारी व्हावी म्हणून व्याख्याने आयोजित केली होती. ज्ञान प्रबोधिनीचे ग्राम विकसनाचे कार्य आणि ग्रामीण स्वराज्य संस्था बळकट करणासाठी निधी व विकासकामे या विषयावर मार्गदर्शन झाले.

### ◈ राष्ट्रीय एकात्मता - मणिपूर विद्यार्थी सहनिवास

राष्ट्रीय एकात्मता घडून यावी या उद्देशाने प्रबोधिनीने मणिपुरी विद्यार्थ्यांसाठी सोलापुरात सहनिवास सुरू केला. हे विद्यार्थी शालेय शिक्षणासोबतच कला, क्रीडा अशा विविध विषयांमध्ये सहभाग व प्रशिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या हस्ते दि. १५ ऑगस्ट २२ रोजी रेल्वे स्टेशन पोलीस चौकी येथे ध्वजारोहण झाले. पोलिसांच्या मनाला भिडणारा व मुलांना प्रेरणा देणारा असा हा कार्यक्रम झाला.

दि. २१ ते २८ ऑक्टो. २२ या कालावधीत दोन मणिपुरी मुलांचा एक गट याप्रमाणे पाच गट प्रत्येकी दोन दिवस चार जणांच्या घरी निवासाला गेले होते. प्रबोधिनीच्या प्रशालेतील २० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रेमाने व अगत्याने या सर्वांना घरी नेले. पहिल्या दिवशी मुले थोडी बुजलेली होती. परंतु हळूहळू त्यांनी दिवाळीचा पुरेपूर आनंद लुटला व संस्कृतीची ओळख करून घेतली. धनत्रयोदशी पूजा, लक्ष्मीपूजन यांसह अभ्यंगस्नानाचाही अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

दि. १९ फेब्रु. २३ रोजी शिवजयंतीनिमित्त जिल्हा फुटबॉल क्लबने आयोजित केलेल्या फुटबॉल स्पर्धेत मणिपुरी मुलांनी सात सामने जिंकून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच क्रीडा भारतीने आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत तीन जणांनी सहभाग घेतला व त्यातील एकाने २३८ स्पर्धकांमधून कांस्य पदक मिळवले.

### ◈ प्रतिज्ञाग्रहण

दि. १३ ऑगस्ट २२ रोजी केंद्रात प्रतिज्ञाग्रहणाचा हृद्य व प्रेरणादायी कार्यक्रम झाला. प्राथमिक व माध्यमिक विभागांच्या अध्यापकांपैकी सहा अध्यापकांनी प्रथम प्रतिज्ञा आणि सात अध्यापकांनी व एका युवकाने द्वितीय प्रतिज्ञा घेतली. मा. संचालकांचे मार्गदर्शन सर्वांना लाभले. कार्यक्रमास प्रशालेतील अध्यापक, नववी-दहावीचे विद्यार्थी व युवक-युवती उपस्थित होते.

### ◈ शिवजयंती कार्यक्रम

दि. १९ फेब्रु २३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त व बालविकास मंदिरच्या संस्थापिका आ. अवंतिकाबाई केळकर यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इ. ९वीतील प्राग्रणींनी छत्रपती शिवरायांचे गुणवैभव, महाराजांची दूरदृष्टी, व्यक्तिपारख, वाक्चातुर्य इ. गुण विविध प्रसंग सांगून विद्यार्थ्यांसमोर मांडले. सौ. अश्विनीताई उंब्रजकर यांनी आ. अवंतिकाबाईंच्या आठवणी सांगितल्या. बाईंचा कार्याप्रती असणारा खंबीरपणा, नेतृत्वगुण याविषयी त्यांनी विविध प्रसंग सांगितले.

### ◈ पूर्वप्राथमिक विभाग

विशेष उपक्रम म्हणून प्रकल्प पद्धतीने गोकुळाष्टमी साजरी करण्यात आली. पालकांच्या मदतीने मुलांनी शंभर घरांचे प्रकार करून आणले होते, त्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले. गोकुळाची प्रतिकृती करण्यात आली. तसेच मोठ्या गटातील ८० मुलांनी कृष्णाची चित्रे रंगवून आणली त्यांचेही प्रदर्शन मांडण्यात आले.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त संध्याकाळी शाळा भरवण्यात आली होती. चंद्र, चांदण्या व आकाश यावर आधारित गीते मुलांनी ऐकली. नंतर मोठ्या गटातील मुलींनी दीपनृत्य सादर केले. छोट्या व मोठ्या गटातील सर्व विद्यार्थिनी व पालिका गटांनी भोंडला, गरबा, दांडिया, टिपरीनृत्य, लेझीम, एकलनृत्य इत्यादी विविध नृत्याविष्कार सादर केले. केळीच्या पानावर खाऊ खाण्याचा अनुभव मुलांनी घेतला.

### ◈ प्राथमिक विभाग

श्री गणेशाच्या पूजनासाठी या वर्षी कलाक्षेत्रातील व्यक्तींना निमंत्रित केलेले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून ७५ भाज्यांचे प्रदर्शन इ. ३री व ४थी मधील विद्यार्थ्यांनी भरवले होते. 'मी गणपती बोलतोय' हा अनोखा उपक्रम देखील घेण्यात आला. गणरायाची मनापासून प्रार्थना केल्यावर गणपती

प्रत्यक्ष भेटीला येतात व त्यांच्याशी संवाद साधतात, असा अनुभव विद्यार्थ्यांना देण्यासाठी या प्रसंगाची निर्मिती करण्यात आली होती.

### ◈ माध्यमिक विभाग

या वर्षी इ. १०वीतील तीन गट मातृभूमी परिचय सहलीस जाऊन आले. दयानंद गटातील १५ मुले नांदेड येथे व १२ मुली अकोला येथे आणि अरविंद गटातील १५ मुले सिंधुदुर्ग येथे गेली होती.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सेवासदन प्रशालेने योजलेल्या स्पर्धेत इ. ७वीतील कृष्णा कांतू राठोड व इ. ९वीतील कु. देवकी मोहनीश पाटणकर यांनी सहभाग घेतला होता. दमाणी वक्तृत्व स्पर्धेत इ. ५वी ते ७वीच्या गटात कृष्णा राठोड याने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

लोकमान्य को-ऑप. सोसायटी आयोजित समूहगान स्पर्धेत प्रशालेस उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

प्रशालेतील कु. प्रांजली प्रशांत शिरुरे या विद्यार्थिनीने डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळवले. वनक्षेत्राबाहेरील वृक्ष : वृक्ष आच्छादन हा मुख्य विषय सर्वांना देण्यात आला होता. 'मियावाकी घनवन : एक अभिनव प्रकल्प' हा उपविषय प्रांजलीने निवडला होता.

### ◈ शिशुअध्यापिका विद्यालय

दि. १६ ऑगस्ट रोजी मातृभूमिपूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी सोलापूर संवादिनी गटातील सदस्यांनी गद्य व पद्य पोथी वाचन केले.

विद्यार्थिनींचा भाषा विकास, शुद्ध लेखन, वाचन व्यवस्थितरित्या करता यावे यासाठी दि. १५ सप्टें. पासून तीन दिवस डॉ. अपर्णाताई कल्याणी यांनी मार्गदर्शन केले.

सन २१-२२ या कालावधीत विद्यापीठाने आयोजित केलेल्या परीक्षेचा निकाल (५९वी तुकडी) जाहीर झाला. एकूण सोळा विद्यार्थिनी परीक्षेस बसल्या होत्या. त्या सर्व विशेष योग्यतेमध्ये उत्तीर्ण झाल्या.

### ◈ स्त्री-शक्ती प्रबोधन

सोलापुरातील सहा प्रभागांमधून ३० प्राणायाम वर्ग सुरू आहेत. या ३० गटांतून ३०० महिला दररोज सुमारे ३० मिनिटे प्राणायाम करतात.

जागतिक महिला दिनानिमित्त प्राणायाम वर्गातील व इतर विडी कामगार महिलांसाठी स्नेह मेळावा झाला. महिलांना योग-प्राणायाम करण्याची प्रेरणा मिळावी, स्त्रीशक्तीचे दर्शन घडावे आणि देशभक्ती विषयी प्रबोधन व्हावे म्हणून या मेळाव्याची योजना केली होती. दि. ५ मार्च २३ रोजी दु. ३ ते सायं. ६ या वेळेत प्राणायाम वर्गातील व इतर विडी कामगार महिलांसाठी महिला दिनाचे औचित्य साधून महिला स्नेहमेळावा झाला. या मेळाव्यात ३३६ महिलांचा सहभाग होता. मेळाव्याच्या सुरुवातीस महिलांनी उपासनेतून प्रसन्नता अनुभवली. नंतर अंबिकाताईं यांच्याकडून महिलांनी प्राणायामाचे नवीन प्रकार शिकले. त्यानंतर सर्व महिलांनी श्रीमद् भगवद्गीतेतील बाराव्या अध्यायातील पाच श्लोकांचे अर्थ समजून घेऊन एकत्रित पठण केले. प्राणायामाचा परिणाम दाखवण्यासाठी १५ महिलांनी शंख वादनातून स्त्री-शक्तीचे प्रदर्शन केले. प्राणायाम वर्गातील गट प्रमुख गीताताई त्यारला यांनी आपले मनोगत व्यक्त करून महिलांना प्रोत्साहन दिले. ज्ञान प्रबोधिनी सोलापूरचे सहकार्यवाह श्री. अमोलदादा गांगजी यांनी 'या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता' या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले. कार्यवाह प्रा. सुवर्णाताई गोखले यांचे मार्गदर्शनही महिलांना लाभले. नंतर कृतिसत्रासाठी महिलांचे ११ गट करण्यात आले. या गटामध्ये महिलांना नवीन प्रकारच्या भित्तिशोभिका तयार करायला शिकवल्या. कृतिकाम करण्यात महिला मनापासून रमल्या होत्या. गटकार्य झाल्यावर महिला सभागृहात पुन्हा एकत्रित आल्या. शुभ्र सुगंधित पुष्पे.. या पद्याने प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राणायाम वर्गाच्या प्रभाग प्रमुख आणि गट प्रमुख अशा १५ महिलांनी देश प्रेमाची भावना प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेऊन व्यक्त केली. यातील ११ महिलांनी तेलुगु भाषेतून प्रतिज्ञा घेतली. प्रतिज्ञा घेतलेल्या महिलांनी मनोगतातून देशासाठी काहीतरी करण्याची इच्छा व्यक्त केली. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. वाच. गिरीशराव बापट यांनी 'कृतिशील देशभक्ती' या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले. प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

### ◈ पिशवी निर्मिती प्रकल्प

विडी काम सोडून पिशवी निर्मिती करणाऱ्या सुमारे ४० महिलांना दिवाळी भेट कार्यक्रम दि. २७/१०/२२ रोजी चैतन्य भुवन येथील सभागृहात झाला. भेटवस्तू सोबतच प्रबोधिनीची इतर कार्याची माहिती ऐकून त्या आनंदित झाल्या. काही सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केलं.

### ◈ युवक विभाग

विभागातर्फे पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती विक्री उपक्रम झाला. त्या उपक्रमातील नफ्यातून भटक्या विमुक्त जमातीतील बहुरूपी व वडार समाजातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले गेले. इ. १ली ते इ. १२वीतील ३० विद्यार्थ्यांना पाटी, पेन्सिल, वह्या, कंपास व एक फळा इ. भेटवस्तू दिल्या.

वर्षभर या मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विभागाने उपक्रम घेतले. सोलापूरपासून सुमारे अकरा किलोमीटर दूर असलेल्या सोरेगाव, शितल नगर येथे ही वस्ती आहे. जाण्यासाठी खडकाळ रस्ता, सार्वजनिक दिव्यांची सोय नाही, मुलींना-महिलांना शौचालयाची सोय नाही, अशा वस्तीतील मुला-मुलींसाठी आपण हा उपक्रम हाती घेतला आहे.

दि. १२ ऑगस्ट २२ रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. १९ युवकांनी रक्तदान केले.

▲▲▲

# २१. हराळी केंद्र

प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्यलेखाच्या या पहिल्या वर्षात मांडलेला कार्यसंकल्प उत्साही कार्यकर्त्यांनी विविध उपक्रमांच्या द्वारे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

### ◈ प्रतिज्ञाग्रहण

ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्ता घडणीच्या प्रक्रियेतील एक मुख्य संस्कार कार्यक्रम म्हणजे प्रतिज्ञाग्रहण! एप्रिल महिन्यातील संचालक भेटीच्या निमित्ताने केंद्रातील सहा कार्यकर्त्यांनी ज्ञान प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा, चार जणांनी द्वितीय प्रतिज्ञा तसेच एका युवक कार्यकर्त्याने तृतीय प्रतिज्ञा घेतली.

### ◈ औपचारिक शिक्षण

**१. प्राथमिक शिक्षणाचा पुन: श्रीगणेशा !**

गेल्या वर्षी हराळी गावात ज्ञान प्रबोधिनीची 'हसरे पक्षी' बालवाडी सुरू झाली आणि पूर्व प्राथमिक शिक्षणात एक महत्त्वाचं पाऊल पडलं. वर्षभराच्या अनुभवावरून मोठ्या गटातल्या मुलांच्या पालकांनी इ. १लीचा वर्ग सुरू करण्याचा आग्रह धरला.

काही वर्षांपूर्वी प्राथमिक शाळेसाठी योग्य शिक्षक संच नसल्यामुळे प्राथमिक शाळा टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आली होती. पण बदललेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बराच सहविचार होऊन शेवटी 'या भागात पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळेचा उत्तम नमुना उभा करूया' या विचाराने जूनपासून हराळी केंद्रावर इ. १लीचा वर्ग सुरू केला. गेल्या वर्षी हराळी, करवंजी, हिप्परगा, तोरंबा गावातले एकूण ५३ विद्यार्थी पूर्व प्राथमिक आणि १लीत होते.

इ. १लीमध्ये सुरुवातीला दोन महिने शासनाने नव्याने तयार केलेला 'विद्याप्रवेश' चा अभ्यासक्रम घेतला. नंतर नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत तयार केलेली एकात्मिक शिक्षणाची पाठ्यपुस्तके वापरली गेली. एकात्मिक शिक्षणामुळे मुलांचा मराठीबरोबरच इंग्रजीचा शब्द संग्रहही चांगला वाढला असल्याचे जाणवले. एकूणच श्रवण, संभाषण, वाचन व लेखन या क्रमाचा अवलंब केल्यामुळे मुलांची आकलन शक्ती बऱ्यापैकी वाढली असल्याचे लक्षात आले.

अभ्यासक्रमाच्या बरोबरीने पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक विभागात अनेक वेगवेगळे उपक्रम झाले. विविध सण आणि उत्सवांच्या निमित्ताने, विशेष दिनांच्या निमित्ताने तर अनेक कार्यक्रम झालेच पण वर्षभर दर दोन महिन्यांनी झालेल्या बालसभेत मुलांनी शिकवलेल्या अभ्यासक्रमातील अनेक संकल्पनांवर आधारित कार्यक्रम सादर केले गेले. ज्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला. सर्व मुलांना सहभागाची संधी असल्यामुळे त्यांच्या सभाधीटपणात वाढ झाली. वर्षभर नियमित पालकसभा झाल्या. पालकांनी मुलांशी सतत बोललं पाहिजे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत, आपल्या व्यस्त वेळापत्रकात त्यासाठी खास वेळ काढला पाहिजे हे मुद्दे शाळेच्या ताईंनी रोल प्लेच्या माध्यमातून पोहोचवले. प्रबोधिनीची शिक्षण पद्धती समजावून सांगताना भाषा व गणित या विषयांची प्रात्यक्षिके करून दाखवली, अभ्यासक्रमाच्या साहित्याचं प्रदर्शन मांडलं ज्यामुळे शाळेत सर्व विषय कसे घेतले जातात याची पालकांना कल्पना आली.

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभाग हा पुढच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया आहे. त्यामुळे हा पाया भक्कम करायचा असा आता या विभागात काम करणाऱ्या शिक्षक संचानेही संकल्प केला आहे. आनंददायी आणि अर्थपूर्ण प्राथमिक शिक्षणाचे ग्रामीण प्रारूप उभे करण्यासाठी आता हराळी केंद्राची वाटचाल सुरू झाली आहे.

**१. माध्यमिक विद्यालय व गुरुकुल विभाग**

दि. १३ जूनपासून विद्यार्थी शाळेत यायला सुरुवात झाली. या वर्षी शाळेची पटसंख्या २५५ होती. यामध्ये १३५ निवासी विद्यार्थी आणि १२० स्थानिक विद्यार्थी होते. कोविडकाळात बंजारा तांड्यावर सुरू करण्यात आलेल्या आनंदशाळा प्रकल्पातील ३७ विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला होता. तसेच स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये हराळीसोबतच करवंजी आणि सय्यद हिप्परगा या गावातील मुलांचाही मोठ्या संख्येने समावेश होता.

कोविडकाळात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना किमान अपेक्षित स्तरावर घेऊन येण्यासाठी पहिले दोन महिने सेतू अभ्यासक्रम राबवण्यात आला. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य सुधारावे आणि त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजावी, या दृष्टीने दि. १४ नोव्हें. ते दि. ३१ मार्च या कालावधीत वाचन प्रकल्प राबवण्यात आला.

या वर्षीच्या वेळापत्रकात क्रमिक विषयांच्या जोडीनेच बौद्धिक विकसनासाठी निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य, अभ्यास कौशल्य अशा तासिकांचा समावेश केला होता. कला, कार्यानुभव, संगणक, अटल टिंकरींग लॅब या तासिकांमधून विद्यार्थ्यांचे अनुभव शिक्षण झाले. व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यारंभ व विद्याव्रत पूर्वतयारी, 'युवा साथी', परिस्थिती ज्ञान याही तासिका नियमित घेण्यात आल्या. वर्षभर नियमित पालक संपर्क चालू होता. वेळोवेळी पालक बैठकी घेऊन विद्यालयाची शिक्षणविषयक भूमिका आणि विद्यार्थ्यांची प्रगती याबाबत चर्चा करण्यात आली.

### ◈ पूरक शिक्षण विभाग

**१. विकासिका**

या वर्षी एकूण आठ गावांमध्ये हा प्रकल्प राबवण्यात आला. १८ स्थानिक मार्गदर्शिकांच्या माध्यमातून प्राथमिक वयोगटातील

### ◈ आनंदघर

केंद्राच्या पूरक शिक्षण उपक्रमात विकासिका आणि आनंदशाळा प्रकल्पांच्या बरोबर आनंदघर या नवीन उपक्रमाची या वर्षी भर पडली. गावात आणि तांड्यांवर जिथे विकासिका आणि आनंदशाळा प्रकल्प सुरू आहेत, अशा ठिकाणी मुलांना सहज येऊन बसता यावे, आवडीची गोष्टीची पुस्तके वाचता यावीत, काही खेळ, चित्रकला इ. करता त्यांच्या हक्काची जागा तयार व्हावी या विचारातून 'आनंदघर' अशी संकल्पना पुढे आली. या वर्षी सेवालाल नगर तांडा, जेवळी येथील मसणजोगी वस्ती, करवंजी आणि माळेगाव अशा एकूण चार ठिकाणी अशा आनंदघरांना सुरुवात झाली.

एकूण २८४ विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमातून पोहोचता आले. विद्यार्थ्यांची मूलभूत भाषिक आणि गणिती कौशल्ये विकसित करणे, त्यांच्यात चांगल्या सवयींची रुजवण करणे, त्यांच्यामधील अभिव्यक्तीला वाव देणे अशा मुख्य उद्दिष्टांच्या आधारावर या वर्षी सत्रांची रचना केली होती.

**२. आनंदशाळा**

कोविड काळात ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची दैना बघून त्याला प्रतिसाद देण्यासाठी प्रत्यक्ष तांड्यांवरच सुरू केलेल्या आनंदशाळा प्रकल्पाने गेल्या तीन वर्षांत चांगले मूळ धरले आहे. या वर्षी १४ लमाण तांडे आणि एक मसणजोगी वस्ती अशा १५ ठिकाणी आनंदशाळा घेतल्या गेल्या. इ. १ली ते ७वीचे सुमारे ६८० विद्यार्थी तसेच याच समाजातील उच्च माध्यमिक किंवा पदवीचे शिक्षण पूर्ण केलेले २२ सहाध्यायी आणि दोन समन्वयक या उपक्रमात सहभागी होते. शिक्षणाबरोबर सामाजिक एकात्मता साधणाऱ्या या उपक्रमाचा भाग म्हणून हराळी केंद्राने उत्साहाने संत सेवालाल महाराज जयंतीच्या उत्सवात सहभाग घेतला.

**३. आनंदी शिक्षण प्रकल्प**

ज्ञान प्रबोधिनी पुणे येथील शैक्षणिक संसाधन केंद्राच्या मार्फत या वर्षी कोविड काळात मागे पडलेल्या तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रफिती आणि शैक्षणिक खेळांच्या माध्यमातून भाषा आणि गणित या विषयाच्या मूलभूत कौशल्यांचे दृढिकरण करण्यासाठी आनंदी शिक्षण प्रकल्प राबवला गेला. त्यात विकासिका आणि आनंदशाळा प्रकल्पातील ४०० विद्यार्थी सहभागी झाले.

### ◈ कृषी विद्यालय व शेती

या वर्षी कृषी विद्यालयाचे शैक्षणिक वर्ष दिवाळीनंतर सुरू झाले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रबोधिनीचा परिचय व्हावा, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी ओळख व्हावी या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांसाठी एकत्रित निवासी शिबिर कळंब तालुक्यातील पाडोळी येथे घेण्यात आले.

नियमित अध्यापन पद्धतीत बदल करून प्रात्यक्षिकांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न या वर्षी अध्यापकांनी केला. त्यामुळे वर्गाध्यापनाचा कालावधी कमी होऊन विद्यार्थ्यांना शेती क्षेत्रावर आणि प्रत्यक्ष कृतीयुक्त प्रात्यक्षिकातून शिकण्याची अधिक संधी मिळाली. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या कृषी आधारित उद्योग अभ्यासक्रमासाठी या वर्षी नव्याने अनुभव शिक्षण रचना केली होती. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने युवा महोत्सव आयोजित करण्यात आला.

केंद्राच्या शेती क्षेत्रावर या वर्षी खरीप हंगामात गोदावरी या नवीन जातीच्या तुरीची लागवड आणि सोयाबीन पिकाची रुंद सरी वरंबा (BBF) पद्धतीने लागवड, तसेच रब्बी हंगामात करडई पिकात खुडणी आणि हरभरा पिकावर सेंद्रिय पद्धतीने कीड नियंत्रण असे प्रयोग घेण्यात आले. मात्र या वर्षी झालेल्या अतिवृष्टीचा (९४३ मि. मी.) फटका अन्य नियमित पिकांना आणि प्रयोगांनाही बसला.

### ◈ प्रदेश विकसन

गेली काही वर्षं प्रदेश विकसन विभागाच्या माध्यमातून झालेल्या पाण्याविषयीच्या विविध उपक्रमांच्या बरोबरीने संघटन व्हावे, स्थानिक लोकांचा ग्राम विकासातील सहभाग वाढावा यासाठी गावसमूह आधारित रचनेचा विचार केला आहे. या गाव समूहांमधील प्रबोधिनीच्या संपर्कतील लोकांच्या बरोबर नियमित भेटी, बैठकी सुरू होत्याच, शिवाय पाणी आणि शेती या विषयांना धरून वर्षभर काही उपक्रम देखील झाले.

**१. संघटन**

दि. १ व २ मे २२ या दिवशी १९ गावांतील १९ जलदूतांचे प्रबोधिनी परिचय शिबिर झाले. मे २२ मध्ये हराळी गावसमूह आणि ढोकी गावसमूह अशा दोन्ही ठिकाणी मोठे सेंद्रिय शेती मेळावे घेण्यात आले. त्या शिवाय शेतकऱ्यांना त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या साहित्यातून अगदी कमी खर्चात विविध सेंद्रिय निविष्ठा बनवण्यासाठी वर्षभरात सहा गावांमधून एकूण ११ कार्यशाळा घेण्यात आल्या. मार्च महिन्यात हराळी आणि ढोकी गावसमूहातील नवनिर्वाचित लोक प्रतिनिधींच्या साठी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. यामध्ये ३६ लोक प्रतिनिधी सहभागी झाले.

**२. भौतिक कामे**

संघटनाच्या कामाबरोबरच लोकांच्या मागणीला प्रतिसाद देऊन बेळंब तांडा व कोळेवाडी येथील १५ हजार लिटर क्षमतेच्या फेरोसीमेंट पाण्याची टाकी लोकसहभागातून तयार झाली. तसेच रोटरी ग्लोबल ग्रँट प्रकल्पाच्या माध्यमातून तोरंबा, सालेगाव व स. हिप्परगा येथील १३ विहिरींचे खोलीकरण व संरक्षण कठड्याचे काम पूर्ण झाले.

- DAESI (Diploma in Agriculture Extension Sevices for Input Dealers)

फेब्रुवारी २० मध्ये सुरू झालेली DAESI अभ्यासक्रमाची पहिली तुकडी २२च्या सुरुवातीला पूर्ण झाली. या परीक्षेचे निकाल लागून सहभागी कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा प्रमाणपत्र वाटप आणि

शुभेच्छा समारंभ जुलै महिन्यात संपन्न झाला.

### ◈ स्त्री-शक्ती प्रबोधन

या वर्षी स्त्री-शक्ती प्रबोधन विभागाच्या माध्यमातून किशोरी विकास उपक्रम आणि जास्वंद वर्ग असे दोन उपक्रम झाले.

**१. किशोरी विकास**

किशोरी विकास उपक्रमाच्या माध्यमातून एकूण १० गावे आणि सहा तांड्यांवर इ. ५वी ते ९वीच्या ५५० विद्यार्थिनींपर्यंत पोहोचलो. विशेष म्हणजे या उपक्रमात मार्गदर्शिका म्हणून हराळी आणि इतर गावातील ३० महाविद्यालयीन युवती सहभागी झाल्या. दि. ३ ते १२ जानेवारीच्या काळात गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी उत्साहाने क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. संक्रांतीनिमित्त गावागावात आई-मुलगी मेळावे घेण्यात आले. मार्च महिन्यात प्रत्येक गावात पालक बैठकींच्या माध्यमातून किशोरींनी आपल्या पालकांच्या समोर किशोरी विकास उपक्रमातून शिकलेल्या विविध कौशल्यांचे सादरीकरण केले.

**२. जास्वंद वर्ग**

इ. १०वी नंतरच्या युवतींसाठी असणाऱ्या जास्वंद वर्ग उपक्रमाच्या या वर्षी तीन तुकड्या झाल्या. हराळी केंद्रावर दोन तुकड्या तसेच एक वेगळा प्रयोग म्हणून रामतीर्थ तांड्यावरची एक तुकडी धरून जवळ-जवळ ६० युवतींपर्यंत या माध्यमातून पोहोचता आले. शिवण, संगणक, ब्युटी पार्लर आणि बेकिंग अशा चार कौशल्यांचे प्रशिक्षण या वर्गातून दिले जाते. गेल्या वर्षी झालेल्या दोन जास्वंद वर्गांच्या माजी युवतींच्या गृहभेटी आणि गावश: प्रासंगिक बैठकी तसेच दिवाळीपूर्वी एक दिवसीय कौशल्य मेळावाही आयोजित करण्यात आला होता.

### ◈ युवती विभाग

शारदीय नवरात्र हा मुख्यत्वे महिलांचा सण! या काळात काही वेगळा पराक्रम करावा हा हेतू मनात धरून युवती विभागाने ५० युवती आणि किशोरींचा बरची आणि वाद्यगट बसवला. या गटाने उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर, उस्मानाबाद आणि लोहारा तालुक्यातील जेवळी, हराळी अशा सहा ठिकाणी बरची प्रात्यक्षिके सादर केली.

### ◈ युवक विभाग

या वर्षी पासून युवक विभागाची स्वतंत्र रचना हराळी केंद्रावर उभी झाली. त्यामुळे अनेक पराक्रमाच्या कृती या वर्षी युवक विभागाच्या माध्यमातून केल्या गेल्या. गणेशोत्सवात या वर्षी कुमार आणि युवक दलाने सात गावांमध्ये पाच मिरवणुका आणि तीन प्रात्याक्षिके केली. किशोर दलाने पाच गावांमध्ये अफझलखानाचा वध हा कृतिरूप पोवाडा सादर केला. ऑक्टोबर महिन्यात हराळी केंद्रावर झालेल्या युवक मेळाव्यात २८ माजी विद्यार्थी युवक उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, पुणे येथून एकत्र आले होते. विद्याव्रत जाणीव या सोबतच युवकांनी प्रथम प्रतिज्ञेचा अर्थ समजून घेतला. दि. १० जाने. रोजी हराळी केंद्राचे केंद्र प्रमुख मा. अभिजित दादांची युवक विभागाला केंद्र प्रमुख भेट झाली. या दिवशी केंद्रावरील किशोर, कुमार आणि युवक दले आणि हराळी व करवंजी गावातील दोन दले अशा ५ दलांवरून १८२ किशोर, कुमार, युवक उपस्थित होते.

▲▲▲

## ◈ आजची प्रबोधिनी ◈

(आजची प्रबोधिनी पान क्र. ४१ वरून पुढे चालू)

**❖ शिक्षण**

**१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे (माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)**

**२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी (पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)**

**३. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर (पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)**

**४. शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

**५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे (माध्यमिक, मर्यादित सहनिवास)**

**६. ज्ञान प्रबोधिनी, हराळी (प्राथमिक, माध्यमिक, मर्यादित सहनिवास)**

**७. कृषि विद्यालय, हराळी**

**८. शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे (बुद्धिमत्ता संवर्धन, शिक्षक प्रशिक्षण)**

**९. शैक्षणिक साधन केंद्र**

**१०. छात्र प्रबोधन, पुणे (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)**

**११. अनौपचारिक शिक्षण प्रकल्प - पुणे, डोंबिवली, अंबाजोगाई (विकासिका, शिबिरे, विद्याव्रत, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)**

**१२. स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्र, पुणे (केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)**

**❖ संशोधन**

**१. प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे (संशोधन, प्रशिक्षण, बुद्धिमापन, संवर्धन, समुपदेशन)**

**२. संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे (संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य**

**❖ ग्रामविकसन**

**१. नैसर्गिक संसाधने - गुंजवणी खोरे, हराळी (पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)**

**२. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर**

**३. सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प - साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

**❖ आरोग्य**

**१. दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**

**२. नेत्र रुग्णालय, शिरवळ**

# २२. साळुंब्रे उपकेंद्र

### ◈ कलादालन उद्घाटन

विद्यालयातील व परिसरातील विद्यार्थी, पालक व अन्य व्यक्तींना विविध कौशल्ये शिकता यावीत, त्यांच्या हातून नवनिर्मिती घडावी या उद्देशाने ग्राम प्रबोधिनी विद्यालयात कलादालन उभारले गेले. या कलादालनात विद्यार्थ्यांना चित्रकला, शिल्पकला, नृत्य, नाट्य, गायन व वादन या कला शिकवल्या जातात. सोडलीस लॅब प्रा. लि., बाणेर चे संचालक मा. श्री. रवीजी पंडित यांच्या देणगीतून, त्यांचे वडील स्वर्गीय बाल मुकुंद पंडित यांच्या स्मरणार्थ हे कलादालन उभारले गेले. यासाठी त्यांनी ३,५०,०००/- रुपयांचा पहिला टप्पा देणगी स्वरूपात दिला. दि. २ जुलै २२ रोजी श्री. रवीजी पंडित यांच्या मातोश्रींच्या हस्ते कलादालनाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांची पत्नी व कंपनीतील नऊ इंजिनिअर्स देखील उपस्थित होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी तबला व पखवाज एकल वादन, प्रार्थना, अभंगगायन तसेच नृत्य सादरीकरण केले. विद्यार्थी तसेच शिक्षकांची विविध विषयांवर चित्रे व हस्तकला यांचे प्रदर्शन मांडले गेले होते. सध्या या कलादालनात १२० विद्यार्थी चित्र-शिल्प, गायन-वादन, नृत्य-नाट्य हे विषय शिकतात. वर्षभरात विविध व्यक्तींसमोर विद्यार्थ्यांची कलेची चार सादरीकरणे झाली.

### ◈ माहेरवाशीण मेळावा

स्त्री-शक्तीचा सन्मान, संघटन, प्रबोधन, विचारांची देवाण-घेवाण, संस्कार अशा अनेक गोष्टी माहेरवाशीणींनी आपापल्या ठिकाणी घडवून आणाव्यात, या उद्देशाने गेली अनेक वर्षे माहेरवाशीण मेळावा घेतला जातो. या वर्षी दि. ३ ऑगस्ट २२ रोजी झालेल्या मेळाव्याला साळुंब्रे, गोडुंब्रे, सोमाटणे, कुसगाव, नेरे या गावांमधून माहेरवाशीणींची उपस्थिती होती. यावेळी इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थिनींनी विविध गुणदर्शन, पारंपरिक नृत्य इ. कार्यक्रम सादर केले. २५० पेक्षा जास्त महिला यावेळी उपस्थित होत्या. मेळाव्याला मा. वनितताई धुमाळ (पोलीस उपनिरीक्षक, तळेगाव), प्रबोधिनीच्या स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या सचिव गौरीताई कापरे, सहसचिव वंदनाताई कामठे तसेच मा. बागेश्रीताई पोंक्षे उपस्थित होत्या. सौ. पूनम अल्हाट (सरपंच, माळवाडी) व सौ. पूजा विधाटे (ग्रा. प. सदस्य) साळुंब्रे यांनीही मेळाव्यात सहभाग घेतला. ग्राम प्रबोधिनीचे कार्यवाह श्री. व्यंकटराव भताने यांनी स्त्री-शक्ती या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### ◈ पवनामाई व इंद्रायणीमाई उत्सव

पाणी प्रदूषणाबद्दल जनजागृती हा उद्देश समोर ठेवून दि. २० व २१ डिसें. २२ या दोन दिवशी पवनामाई उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. काळे कॉलनी (पवनानगर), थुगाव, शिवणे, बेबड-ओहळ, साळुंब्रे, मोरया घाट-चिंचवड इथे हा कार्यक्रम झाला. परिसरातील त्या-त्या गावातील प्रत्येक पाणवठ्यावर तेथील शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन गावात जनजागरण फेरी काढली. नदी काठावर आरती व पथनाट्य सादरीकरण झाले. नदीची ओटी भरणे, दिवे सोडणे व पूजा झाल्यावर प्रतिज्ञा घेण्यात आली. महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून पाणी प्रदूषणाबद्दल घोषणा दिल्या. पवन मावळातील १३ शाळा, महाविद्यालये, विविध पर्यावरण संस्था व त्यांचे कार्यकर्ते विद्यार्थी, शिक्षक, पर्यावरण प्रेमी यावेळी उपस्थित होते. जलदिंडीचे प्रवर्तक श्री. विश्वासजी येवले व त्यांचे कार्यकर्ते, पिंपरी-चिंचवड म. न. पा. जलशुद्धीकरण केंद्राचे अधिकारी, विलो मॅथर प्लांट, भावसार व्हीजन, लोहगड बोट क्लबचे कार्यकर्ते व अशा अनेक संस्था यात सहभागी झाल्या.

या वर्षी वर्षभर पाण्यासंबंधी विविध ठिकाणी एक मासिक उत्सव याप्रमाणे घेण्यास सुरुवात झालेली आहे. वरील उत्सवाप्रमाणे सर्व उत्सवाचे स्वरूप आहे. फेब्रुवारी महिन्यात इंद्रायणी नदीवर दुसरा उत्सव पार पडला.

### ◈ हिवाळी शिबिर

दि. २९ ते ३१ डिसें. २०२२ दरम्यान ग्राम प्रबोधिनी विद्यालयाच्या १४८ विद्यार्थ्यांचे शिबिर सांगवडे गाव येथे झाले. जि. प. शाळा सांगवडेचे ५० विद्यार्थी व शिक्षकसुद्धा यात सहभागी झाले होते. ग्राम प्रबोधिनीच्या ९वीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त, अनुभव शिक्षण दृढ व्हावे व विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी मिळावी, असा याचा हेतू होता. पाहुण्यांना पत्राद्वारे निमंत्रण देणे, नियोजन करणे, जमा-खर्च व हिशोब पाहणे, स्वावलंबन व शिस्तीची काळजी घेणे अशी कामे विद्यार्थ्यांनी केली. अंधश्रद्धा व विज्ञान, गड किल्ले कसे पहावेत, युवकांचे ग्रामीण विकासासाठी योगदान, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात भारताने काय मिळवले काय गमावले, स्वामी विवेकानंदांच्या यशाचे रहस्य अशा अनेक विषयांवर शिबिरात सत्रे झाली. त्याशिवाय योगासने, गाव सर्वेक्षण, क्षेत्रभेटी, मनोरंजन सत्र, पथनाट्य सादरीकरण प्रवचन देखील झाले.

### ◈ नूतनीकरण व उद्घाटन समारंभ

अवसर फौंडेशन यांच्यातर्फे व श्री. आनंदजी चतुर्वेदी यांच्या संपर्कातून ग्राम प्रबोधिनीस ३३ लक्ष रु. देणगी मिळाली. त्यामधून भोजन कक्ष, तळमजला व पहिला मजला येथील स्वच्छतागृह याचे काम पूर्ण झाले. दि. २४ फेब्रु. २३ रोजी उद्घाटनप्रसंगी अवसर फाऊंडेशन, कमिन्स कंपनीचे संचालक, सेक्रेटरी, इंजिनिअर, आर्किटेक्ट, विद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# २३. अंबाजोगाई विस्तार केंद्र

## ◈ नागरीवस्ती कार्य

### १. फकीरवस्ती

येथील मुले कधीच शाळेत गेलेली नाहीत. त्यामुळे जोगाईवाडीच्या शाळेतील शिक्षकांशी संपर्क करून त्यांची शाळा सुरू होईल यासाठी प्रयत्न केला. सुनिता गिरीने शिकलकरी वस्तीतील मुलींना चित्रकलेचे कौशल्य शिकवले.

वस्तीतील ११ कुटुंबांना १५ दिवसांचे अन्नधान्याचे संच व काही घरगुती वापरासाठी भांडी दिली.

दोन घरांना प्रायोगिक तत्त्वावर दोन सौर दिवे देण्यात आले. त्याची उपयोगिता चांगली आहे हे त्यांना जाणवल्यावर तेथील सर्वच घरांना सौर दिवे देण्यात आले.

### २. शिकलकरी वस्ती

येथील मुलांनी काही वैज्ञानिक प्रयोग केले. मुळाक्षरांची ओळख मुलांना करून दिली. लेखन सराव देखील झाला. दोन्ही वस्त्यांवर दि. २३ व २४ ऑक्टोबरला वस्त्यांवर सामूहिक दिवाळी साजरी झाली.

दोन्ही वस्त्या व खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, छल्ला, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परळी वेस या भागातील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सौर दिव्यांची जोडणी करण्याचे प्रशिक्षण दोन्ही वस्तीतील मुलांना दिले. पौगंडावस्थेतील मुलांशी वर्षभर नियमित संवाद चालू होता.

दसऱ्याच्या निमित्ताने झेंडूच्या फुलांचे हार करण्याचे प्रशिक्षण दोन्ही वस्तीतील मुले, ज्येष्ठ महिला व पुरुष अशा एकूण ७५ जणांना देण्यात आले. दसऱ्याच्या आदल्या दिवशी फकीरवस्तीवरील २१ जण हार बनवण्यासाठी अंबाजोगाईत आले होते. एकूण २८,००० रुपयांची यातून उलाढाल झाली. त्यातील १८ हजार रुपये वस्तीतील बांधवांना त्यांचा मेहनताना म्हणून देण्यात आले.

### ३. धनगर वस्ती

धनगर वस्तीवर नव्याने नित्य काम सुरू केले. येथील संख्या २५च्या वर गेली आहे. शाळेत जाण्याचे सातत्य टिकावे यासाठी प्रयत्न चालू आहेत. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन आणि शिल्पा मेहता यांच्या सहकार्याने काही खेळ वस्तीवरील मुलांसाठी पाठवले. त्यांची आधार कार्डे काढून घेतली.

## ◈ विवेकवाडी

या परिसरात देहविक्रीचा व्यवसाय सुरू झाल्याने शेतकरी प्रचंड त्रासलेले होते. त्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक कविता नेरकर आणि पोलिस निरीक्षक ग्रामीण यांची भेट घ्यावी लागली. परिसरातील दारू विक्रीचे प्रमाणपण प्रचंड वाढले होते. पोलिसांच्या मदतीने त्यावर निर्बंध घालण्यात यश मिळाले.

या वर्षी पावसाने दडी मारल्याने झाडांना पाणी देणे, नवीन झाडांना आळी करणे, पाण्याच्या टाक्या भरून घेणे व इमारतीची स्वच्छता अशी कामे मुख्यतः होती.

निमला गावातील सहा तरुण अंबाजोगाईत भेटीला आले. त्यांनी विवेकवाडीत वृक्षारोपण केले. वेल्हे येथील बचत गटाच्या महिलांनी विवेकवाडीला भेट दिली. त्यांना तेथील पाणलोट आणि पर्यावरण पुनर्संस्थापनेचे काम समजावून सांगण्यात आले.

## ◈ प्रदेश विकसन

पैठण गावात पाझर तलावातील गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले. जवळपास ७.५ लक्ष रुपये यासाठी खर्च झाला. हिवरा येथील नदीपात्र दुरुस्तीचे काम केले. यासाठी ५० हजार रुपये खर्च झाला. निमला गावात सौर दिव्यांची विक्री सुरू करण्यात आली.

धारूर आणि केज तालुक्यातील गावातील झेंडूच्या फुलांची थेट खरेदी करून हार करून विक्री करण्यात आली. सेंद्रिय शेतीच्या प्रकल्पात बीड जिल्ह्यातील तालुके सहभागी करण्याबाबत मानवलोक संस्थेच्या इरफान यांच्याशी सविस्तर बोलणे झाले व त्याचा पाठपुरावा या वर्षी झाला.

धारूर, केज, अंबाजोगाई, बीड, कळंब तालुक्यातील विविध गावांतील युवकांशी फोन वरून नियमित संपर्क केला. कळम तालुक्यातील वाढवडा गावातील माध्यमिक शाळेत आपले सुंदर घर, अंगण व परिसर स्वच्छ ही स्पर्धा घेण्यात आली. मृदगंध साहित्य संमेलनात श्री. प्रसाद चिक्षे यांनी पाणीदार गाव हा विषय मांडला.

दि. ८ जाने. रोजी पाण्याची गोष्ट २०२३च्या कार्यक्रमासाठी अठरा सदस्य ठाण्याला गेले होते.

## ◈ विज्ञान तंत्रज्ञान केंद्र

विवेकानंद विद्यालय, खोलेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद परळी वेस येथे भेटी झाल्या. विवेकानंद विद्यालयात ८वी व ९वी आणि सहावीच्या मुलांसाठीच्या तासिका झाल्या.

## ◈ शिशुविहार

दि. ३० जुलै रोजी शिशुविहारची पहिली पालक बैठक झाली. या बैठकीला ७० पालक उपस्थित होते. दि. १३ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने स्वामी समर्थ व गोंदवलेकर महाराज यांच्या फोटोंची पूजा करून मुलांना गोष्ट, गाणी व त्यांची माहिती सांगितली. नवरात्र उत्सवानिमित्त दि. ३० सप्टें. रोजी मुलींसाठी हादग्याचा कार्यक्रम घेतला. दि. ३१ सप्टें. रोजी अष्टमीनिमित्त कुमारी पूजन करण्यात आले.

दि. १७ ऑक्टो. रोजी गोविंद केंद्रावर शिशुविहार ताईंचे प्रशिक्षण झाले. यासाठी श्रुतीताई फाटक व नीलिमाताई रास्ते

हराळीहून आल्या होत्या. दि. २ जाने. रोजी सोलापूर केंद्राच्या सर्व शिशुअध्यापिका व मेघनाताई परांजपे शिशुविहारच्या चिमणी गट आणि मयूर गटावर भेट देण्यासाठी गेल्या व त्यांनी मुलांसमोर गाणी व गोष्टी सादर केल्या.

दि. ११ जाने. रोजी गोविंद केंद्रावर आधुनिक नवरात्रानिमित्त मातृभूमिपूजन व त्याचबरोबर महिला पालक गटांच्या खेळाच्या स्पर्धाही घेण्यात आल्या. आधुनिक नवरात्रानिमित्त सीमाताई काळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयीचे विचार मांडले.

अभिव्यक्ती स्नेहसंमेलनानिमित्त महिला पालक गटासाठी खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. दि. १२ जाने. रोजी विवेकानंद जयंतीनिमित्त सहा मुलांनी भाषणे केली व १५ मुलांनी गोष्टी सांगितल्या. या कार्यक्रमाला एकूण २५ पालक उपस्थित होते.

दि. २१ जाने. रोजी वेल्हे येथील हिरकणी प्रकल्पाच्या २८ ताई पालकांना प्रकल्पाची माहिती देण्यासाठी आल्या होत्या. यामध्ये ० ते ६ वर्ष वयोगटाच्या मुलांच्या विकासाचे काम तसेच महिलांच्या आरोग्य तपासणीचे काम केले जाते.

यानंतर वेल्ह्याच्या ताईंनी महिला पालकांसाठी वेगवेगळे खेळ घेतले व त्यातून निवडून आलेल्यांसाठी त्यांनी छान बक्षीस वाटप ही केले. दि. ३० जाने. रोजी महिला पालकांसाठी 'गॅसचा वापर न करता पदार्थ करणे' अशी स्पर्धा घेण्यात आली.

### ◈ छात्र प्रबोधन

एकूण २१ शाळांशी संपर्क करून आठ शाळांमध्ये ५० पेक्षा जास्त अंकांची, तसेच वैयक्तिक संपर्क करून ६०३ दिवाळी अंकाची नोंदणी झाली. छात्र प्रबोधन दिवाळी अंक नोंदणीची जबाबदारी युवक व युवती गटाकडे होती. अंकांची नोंदणी करणाऱ्या शिक्षकांपैकी श्री. खोगरे सर, श्री. हेमंतदादा कुलकर्णी व संभाजी ब्रिगेड शाळेच्या मुक्ताताई यांच्या हस्ते छात्र प्रबोधन अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

**एकूण नोंदणी :**

| मराठी | इंग्रजी | ग्रामीण | दिनदर्शिका | एकूण |
|---|---|---|---|---|
| ८७० | १७५ | ४१० | १३५ | १५९० |

दि. १४ डिसें. रोजी बालनिकेतन शाळेत छात्र प्रबोधनच्या वाचक मेळाव्यामध्ये प्रश्नोत्तरे व विद्यार्थ्यांशी गप्पा झाल्या. २० डिसेंबर रोजी विवेकानंद बाल विद्या मंदिर शाळेत छात्र प्रबोधन दिवाळी अंक वाचक मेळावा घेण्यात आला.

### ◈ पूरक शिक्षण कार्यदिशा

अंबाजोगाई व परिसरातील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये पूरक शिक्षणाचे उपक्रम सुरू झाले आहेत. मुख्यतः चित्र रंगवणे, खेळ, गोष्टी आणि थोडी माहिती असे त्याचे स्वरूप आहे. एकूण १५० विद्यार्थी व शाळेतील शिक्षकही यात सहभागी होतात.

### ◈ भगिनी निवेदिता गट

शारदोत्सव दरवर्षीप्रमाणे या वर्षीही भगिनी निवेदिता गटाने साजरा केला. यानिमित्ताने वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निवेदिता गटातील महिला सोडून कॉलनीतील जवळपास रोज ५० महिलांचा सहभाग होता.

**कॅरीबॅग रिसायकलिंगचे कार्य**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची परवानगी घेऊन शहरातील काही शाळांमध्ये प्रबोधन केले.

### ◈ युवती गट

शारदोत्सवामध्ये नऊ दिवस नऊ वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्त्रियांची माहिती युवती विभागातील फलकावर लावण्यात आली व स्त्रियांवर आधारित सुविचारांचे फळ्यावर लेखन करण्यात आले. यात काव्यवाचन, भक्ती गीत गायन, माता पालक व महिला गटासाठी मातृभूमिपूजनाचे आयोजन करण्यात आले.

युवती गटाने सर्व महिला गटासाठी स्त्रीस्वातंत्र्य, नवरात्र का साजरे करावे, संघटनाची आवश्यकता या विषयांवर चर्चासत्राचे आयोजन केले. त्यानंतर प्रश्न-उत्तरांचे सत्र झाले. आईचे मुलीला प्रश्न व मुलीचे आईला प्रश्न असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

युवती विभागाने पणत्या विक्रीच्या उपक्रमामध्ये ५० डझन पणत्या विकत आणून त्यांना रंग देऊन त्या विकल्या. त्यातून ४१०० रु. नफा झाला.

दि. १२ डिसें. ते १२ जाने. या कालावधीमध्ये आधुनिक नवरात्र, चरित्र अभ्यास गटाने भगिनी निवेदिता, सावित्रीबाई फुले व जिजामाता या तीन स्त्रियांचे प्रत्येकी एक पुस्तक असे सामूहिक वाचन करून साजरे केले. या चरित्र अभ्यास गटासाठी पुणे व निगडी येथील युवती कार्यकर्त्यांनी दूरस्थ पद्धतीने पुढील विषय मांडले - 'मला भावलेली सावित्रीबाई', 'झाशीची राणी', 'जिजाबाईंचा संपूर्ण प्रवास' व 'भगिनी निवेदिता'.

मराठी राज्यभाषा दिन व जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून युवती विभागाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दि. २६ फेब्रु. रोजी गोविंद केंद्रावर डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. सागर कुलकर्णी, मंजुषा कुलकर्णी यांनी जी. ए. कुलकर्णी यांच्या काही कथा व पत्रांचे अभिवाचन केले.

महिला दिनानिमित्त युवती विभागाने दि. १ ते ७ मार्च महिला दिन विशेष सप्ताहाचे आयोजन केले होते.

### ◈ प्रबोधक परिवार

प्रबोधक परिवाराचे एकत्रीकरण ठाणे येथे झाले. पाण्याची गोष्ट २०२३ म्हणून सर्व एकत्र जमले होते. त्यात शुभम काकडे आणि संतोष गिरी यांनी आपले नागरीवस्तीच्या कामाचे निवेदन केले. आता नागरीवस्तीसाठी मदत करणाऱ्या प्रबोधक परिवाराची संख्या ७१ झाली आहे.

▲▲▲

# २४. डोंबिवली विस्तार केंद्र

### ◈ विविध उपक्रमांमधील सहभागींचे संख्या कोष्टक

| उपक्रमाचे नाव | सहभागी | कार्यकर्ते |
|---|---|---|
| प्रबोधक मंडळ (साप्ताहिक) | ३९ | ८ |
| विकासिका ५वी - ज्ञान मंदिर शाळा (साप्ताहिक) | २८ | ४ |
| विद्याव्रत संस्कार | ८ | ५ |
| **ग्रामीण विभाग** | | |
| बाळेवाकळण इ. ६वी (मासिक) | २४ | ८ |
| बाळेवाकळण इ. ७वी (पाक्षिक) | २४ | ८ |
| संवादिनी - ३ गट (मासिक बैठकी) | ४० | ८ |
| ओळख स्पर्शाची | २११४ | २५ |
| पौरोहित्य विभाग | १५३२ | १३ |

### ◈ केंद्राचा कार्यसंकल्प

'प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या विभागांची माहिती करून घेणे' हा या वर्षीचा केंद्राचा कार्यसंकल्प होता. दर महिन्याला एक याप्रमाणे पुणे केंद्रातील शैक्षणिक उपक्रम संशोधिका, युवक विभाग, युवती विभाग, प्रज्ञा मानस संशोधिका, स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण), संवादिनी, संत्रिका, छात्र प्रबोधन, नेतृत्व प्रशिक्षण केंद्र या विभागांची ओळख दूरस्थ सत्रांच्या माध्यमातून करून घेतली. समूहगुण विकसन कार्यदिशाचे सत्र प्रत्यक्ष घेण्यात आले. विस्तार करण्यासाठी या विभागांचे कुठे व कसे सहकार्य घेता येईल, हे समजून घेणे असा उद्देश या कार्यसंकल्पामागे होता.

### ◈ संचालक केंद्रभेट

दि. ४ व ५ जून २२ रोजी मा. संचालक वाच. गिरीश बापट यांची डोंबिवली केंद्राला भेट झाली. दि. ४ रोजी वेगवेगळ्या गटांची जबाबदारी घेणाऱ्या सदस्यांबरोबर बैठक झाली. या बैठकीत संचालकांनी भवितव्य लेखाच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. रविवारी बाळेवाकळण येथील शाळेत विद्याव्रत संस्कार झाला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. संचालकांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ग्रामीण शाळेतील १४ व शहरी शाळेतील चार अशा एकूण १८ विद्यार्थ्यांवर हा संस्कार झाला. कार्यक्रमानंतर एकत्रित स्नेहभोजन झाले. त्याच दिवशी पौरोहित्य गटाबरोबर बैठकदेखील झाली. मा. संचालकांबरोबर निगडी केंद्राच्या अस्मिताताई इनामदार व वेल्ह्याची सुनीताताई कचरे यांनीदेखील केंद्राला भेट दिली.

### ◈ भौगोलिक विस्तार कार्यदिशा बैठक

दि. १८ डिसें. २२ या दिवशी डोंबिवली केंद्रात मा. संचालकांच्या मार्गदर्शनाखाली भौगोलिक विस्तार कार्यदिशेची प्रदीर्घ बैठक झाली. डोंबिवली व इतर केंद्रांतील मिळून ४० सदस्य उपस्थित होते. बैठकीच्या बीज भाषणात प्रदीर्घ बैठकीची संकल्पना, बैठकीची सुरुवात कधी आणि कशी झाली?, आत्तापर्यंत कुठे-कुठे या बैठका झाल्या याबद्दल मा. संचालकांनी सांगितले. त्यानंतर केंद्राचे भवितव्य लेख, भित्तीपत्रक मांडणी, त्यावरील लेखी व चर्चात्मक प्रतिसाद हे सत्र झाले.

दुपारच्या सत्रात 'नवीन कार्यकर्ते मिळवणे - टिकवणे' यावर आदित्यदादा शिंदे व नचिकेतदादा नित्सुरे यांनी परस्पर संवादात्मक सत्र घेतले. मा. संचालकांनी कृतिसत्राच्या माध्यमातून 'सहविचार नेतृत्व घडविण्याच्या प्रक्रिया' समजावून सांगितल्या.

समारोपाच्या सत्रात काही सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मा. संचालकांनी आपल्या मनोगतात उदाहरणांच्या माध्यमातून ज्याला जशी प्रबोधिनी समजली, तसे ते तेथील परिस्थितीत काम सुरू करतात व प्रबोधिनीपण पोहोचवत असतात. अशा रितीने प्रबोधिनीच्या कामाचा प्रसार व विस्तार होत असतो हे सांगितले.

### ◈ प्रबोधिनी परिचय सहल

दि. ३० जाने. ते २ फेब्रु. २३, या काळात डोंबिवली केंद्रातील सदस्यांची प्रबोधिनी परिचय सहल हराळी-सोलापूर येथे झाली. वेगवेगळ्या गटात सहभागी होणाऱ्या तसेच पूर्वी कामात होत्या अशा १७ सदस्या सहभागी झाल्या होत्या. दोन्ही केंद्रांवरील प्रकल्प पाहता आले.

भटके विमुक्त, विडी कामगार महिला यांसाठी सुरू असलेले काम तसेच दोन्ही ठिकाणचे औपचारिक शिक्षणातील प्रयोग, चैतन्य भुवन येथे निवासास असणाऱ्या मणिपुरी विद्यार्थ्यांशी संवाद, त्यांच्या विविध कलागुणांचे दर्शन असं खूप काही बघता आले, समजून घेता आले. आध्यात्म ज्याचा पाया आहे अशा वास्तूतील ज्ञान व कर्मयोगाचा अनुभव, त्याचबरोबर आ. लताताई यांचे मार्गदर्शन व सहवास, भोजन गृहातील मावशींच्या हातच्या सुग्रास भोजनाचा आस्वाद, आग्रह हे सगळे अनुभवता आले. त्याच बरोबर चादर कारखाना भेट, विडी कामगार महिला यांच्या घरी भेट या भेटी तसेच तुळजापूर व अक्कलकोट दर्शन घेण्यात आले.

### ◈ संवादिनी विभाग नव-नवरात्र उपक्रम

संवादिनी विभागाने नव-नवरात्र अंतर्गत उपक्रमात नऊ उद्योजिकांच्या मुलाखती डिसेंबर मध्ये घेतल्या व दि. ८ जाने. रोजी या उद्योजिकांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या व्यवसायाच्या प्रवासाची माहिती इतर सदस्यांना करून दिली. मुलाखती घेण्यासाठी १० संवादिनी सदस्या सहभागी होत्या. महिला जेव्हा उद्योजिका होते, स्वतः बरोबर इतरांनाही रोजगार निर्माण करते तेव्हा त्यातून

संवादिनीची उद्दिष्टे कशी पूर्ण होताना दिसतात, हे जाणून घेण्याचा प्रयत्न या उपक्रमामुळे करता आला. या कार्यक्रमासाठी एकूण उद्योजिकांसह सगळ्या मिळून ५६ जणी उपस्थित होत्या.

नव-नवरात्र अंतर्गत 'पोलिस स्टेशनला भेट' उपक्रमात महिला सुरक्षा विषयासंदर्भात डोंबिवलीतील रामनगर, टिळकनगर, विष्णूनगर व मानपाडा या चार पोलिस ठाण्यांना भेटी दिल्या. दि. २० जाने. ते २१ फेब्रु. या कालावधीत एकूण २५ सदस्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन पोलिस स्टेशन परिसरात महिला, लहान मुलं, वरिष्ठ नागरिक यांच्या सुरक्षेसंदर्भात राबविण्यात येणारे उपक्रम, विविध पथकांची माहिती, हेल्पलाईन नंबर्स, जनजागृतीसाठीचे उपक्रम, सायबर गुन्ह्यांबाबतची माहिती मिळवली. चारही पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांनी जनजागृतीची आवश्यकता बोलून दाखवली. यानिमित्ताने ज्ञान प्रबोधिनीचे कामही पोलिसांपर्यंत पोहोचविले.

### ◈ वाचक मेळावा

शिवाई बालक मंदीर MIDC येथे दि. १६ नोव्हें. २२ रोजी वाचक मेळावा घेतला. यात १० कार्यकर्त्या व ५४ विद्यार्थी होते. मेळाव्यात सुबोध अंकातील 'जोडी' गोष्ट गटात वाचून त्यावर चर्चा, शिवाजी महाराज यांच्या गोष्टी गटात सांगून त्यांच्या गुणांचे सादरीकरण, कोडी तयार करणे, कवितांना चाली लावणे असे घेण्यात आले. विद्यार्थी तसेच शाळेचा प्रतिसाद छान होता.

बाळे वाकळण येथे दि. ११ डिसेंबरला ७वीची नियमित मुले व ८वीची १४ मुले, यांचा वाचक मेळावा घेतला. नमस्ते, गीत व प्रास्ताविकानंतर मुलांना वाचनाच्या चांगल्या वाईट सवयींविषयी मजेशीर पध्दतीने माहिती दिली. मुलांशी मेळाव्याविषयी, अंकाविषयी गप्पा मारल्या, मेळाव्यात मुलांचा प्रतिसाद छान होता. सगळ्या सत्रांमधे मुले उत्साहाने सहभागी होत होती.

प्रबोधक मंडळात दि. २७ नोव्हेंबरला वाचक मेळावा आयोजित केला होता. वाचक मेळाव्यात छात्र प्रबोधन मधील 'कच्छ शुभ्ररणातिल सोलो सफर' या ललित लेखाचे लेखक मा. आदित्य दवणे यांना मुलांशी संवाद साधायला आमंत्रित केले होते. मुलांना त्यांचा परिचय व त्यांनी 'एकला सोलोरे' या सदरात लिहिलेला 'माणुसकीचे नवे चेहरे' हा लेख वाचून दाखविला. मुलांनी प्रश्न काढून आणले होते त्यावर चर्चा घेतली. या सत्राला पालकही उपस्थित होते. दादाचा परिचय करून दिला. त्यानंतर मुलाखतीला सुरुवात केली. त्याने मोकळ्या गप्पा मारल्या. मुलांच्याही प्रश्नांना दादांनी छान उत्तरे दिली. पालकांनाही मुलांच्या बाबतीत काय करावे, काय करू नये हे छान पद्धतीने सांगितले. कार्यक्रमाची तीन ओंकार घेऊन सांगता झाली.

### ◈ पालक मंडळ

भवितव्य लेखात पालकांच्या संघटनेचे उद्दिष्ट मांडलेले आहे. त्याप्रमाणे या वर्षी केंद्रातर्फे दि. ६ नोव्हें. २२ रोजी पालक मेळावा घेऊन 'पालक मंडळ' उपक्रमाची सुरुवात झाली. यात मानसतज्ज्ञ दीपाली गोडसे यांनी पालकांना मार्गदर्शन केले. डिसेंबर महिन्यात क्रीडा महोत्सव घेण्यात आला. यात पालक व पाल्य यांच्या एकत्रित खेळ व स्पर्धा घेण्यात आले. जानेवारीमध्ये मुक्तछंद आयोजित सौ. कांचन जोशी यांची 'शिक्षण गुंफण कार्यशाळा' आयोजित केली होती. फेब्रुवारीत 'खेळाच्या माध्यमातून गणित' अंतर्गत मार्गदर्शक श्री. राहुल कोकीळ यांनी गणित विषय शिकवताना सोपा कसा करायचा ह्या बदल मार्गदर्शन केले. एकूण २८ पालकांनी पालक मंडळासाठी नोंदणी केली होती.

### ◈ पुस्तक विक्री

एप्रिल २२ ते मार्च २३ मध्ये एकूण सहा वेळा पूर्ण दिवसाचे पुस्तक विक्रीचे स्टॉल लावले. या स्टॉल मध्ये रु. २०,०३९/- तसेच या स्टॉलस् व्यतिरिक्तही वैयक्तिक, आणि डोंबिवली केंद्राकडून भेट, अशा पद्धतीने रु. ६,०६१/- अशी या वर्षभरात एकूण रु. २६,१००/- एवढी पुस्तक विक्री झाली.

### ◈ आर्थिक विभागाचे वृत्त

डोंबिवली केंद्र सुरू होऊन बरीच वर्षं झाली. त्याबरोबर उपक्रमांची संख्याही वाढली. परिणामी जमाखर्चाचे व्यवहारही वाढले. केंद्राचे स्वतंत्र बँक खाते उघडण्याची गरज भासू लागली. म्हणूनच या वर्षी डोंबिवली विस्तार केंद्राचे बचत खाते बँक ऑफ बडोदा येथे ऑगस्ट महिन्यात उघडले. त्यामुळे जमाखर्चाचे व्यवहार करणे अधिक सोयीचे झाले आहे. रोखीचे व्यवहार कमी झाले.

▲▲▲

**वृत्तातील विविध माहिती संदर्भात अधिक तपशील पुढील क्यूआर कोडस् स्कॅन करून पाहता येतील.**

| निगडी केंद्र | | | ज्ञान प्रबोधिनीतील विविध उपक्रम | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रीडा प्रात्यक्षिके | अभ्यासपर्व पुस्तिका प्रकाशन व प्रदर्शन उद्घाटन | अभ्यासपर्व पुस्तिका प्रकाशन व परीक्षा पे चर्चा | ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र गणेश विसर्जन मिरवणूक | कला विशेष उद्दिष्ट गट - शेडस् ऑफ वुमनहूड | स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण विभागाविषयी माहिती |

# २५. महाराष्ट्रातील अन्य विस्तार

## ◈ ठाणे संपर्क केंद्र

**नियमित उपक्रमांचा आढावा**

१. **प्रबोधक मंडळ –** या वर्षी प्रबोधक मंडळ नव्याने सुरू करण्यात आले. प्रबोधक मंडळाच्या तासिका प्रताप व्यायाम शाळा आणि घंटाळी मंदिर येथे दुपारी ३ ते ५ या वेळेत दर रविवारी घेतल्या गेल्या. मुलांची उपस्थिती साधारण १८/२० एवढी होती. १) मुलांची शारीरिक क्षमता वाढविणे २) आरोग्यदायी जीवनशैली ३) परिस्थिती ज्ञान वाढविणे ४) स्वावलंबन ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून नियोजनानुसार तासिका झाल्या. वर्षभरात दोनदा एकदिवसीय शिबिरे घेण्यात आली. दि. १० जुलै या दिवसापासून प्रबोधक मंडळ सुरू केले गेले. विज्ञान कथा, निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य, परिसर इ. वैज्ञानिक कृती पुस्तिका सोडवून घेतल्या गेल्या. ओळख स्पर्शाची, येउर येथील निसर्ग सहल अशी प्रासंगिक सत्रे मुलांना विशेष अनुभव देणारी ठरली.

२. **विकासिका –** दि. २४ जुलै या दिवसापासून आनंद विश्व गुरूकुल शाळेत विकासिकेच्या तासिकेला सुरुवात केली गेली. निरीक्षण कौशल्य, गटात काम करण्याची सवय, मातृभूमीबद्दल आदर बाळगणे ही उद्दिष्टे नक्की करून बैठकांचे नियोजन केले गेले. या तासिका महिन्यातून दोन वेळा (बुधवारी) शाळेत जाऊन घेतल्या गेल्या.

३. **संवादिनी –** या वर्षभरात संवादिनीत वेगवेगळे उपक्रम प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी घेतले गेले. या उपक्रमांमध्ये साधारण १५/२० जणी उपस्थित होत्या. या वर्षी संवादिनी सख्यांसाठी गप्पाकट्टा सुरू केला गेला. नवरंग नवरात्राचे आणि महिला सुरक्षा हे विषय घेऊन गप्पाकट्टा झाला. मासिक बैठकीत मनाचा योग, आनंद योग या विषयावर मांडणी करण्यासाठी नंदिनीताई गोरे आल्या होत्या. दि. १६ जुलै या दिवशी संवादिनीचा तिसरा वर्धापन दिन साजरा केला. आयुर्वेद तज्ज्ञ स्वाती कर्वे यांनी मंगळागौर आणि स्वास्थ्य जपणूक हा विषय अगदी विस्तृतपणे मांडला. दि. २२ सप्टें. रोजी बैठकीला स्त्री-शक्ती कार्यदिशेच्या सचिव गौरीताई कापरे आणि सहसचिव वंदनाताई कामठे आल्या होत्या. स्त्रीचा आपल्या मातृभूमीसाठी प्रत्यक्ष कामात कसा सहभाग असणे आवश्यक आहे याची जाणीव करून दिली गेली. स्त्री-शक्ती कार्यदिशेच्या पुढील दहा वर्षांच्या भवितव्य लेखाचे स्वरूप, उद्दिष्ट याची सविस्तर माहिती दिली. बेघर मुलांच्या पुनर्वसन केंद्राला भेट दिली. समतोल दिवाळी अंकातील काही लेखांचे वाचन केले. निगडी येथे झालेल्या स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या वार्षिक बैठकीला आणि हराळी येथे झालेल्या अभ्यास शिबिराला दोन कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

४. **प्रासंगिक काम करणारा गट –** मा. संचालकांची ठाणे केंद्र भेट आणि प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम हे या वर्षाचे विशेष आकर्षण ठरले. मा. संचालकांचे मार्गदर्शन आणि भवितव्य लेखनाबद्दल चर्चा झाली. या वर्षी सार्थ भजनाच्या ऐवजी सार्थ पद्यांचा कार्यक्रम केला. ठाण्यातील चार मान्यवरांच्या सदिच्छा भेटी घेऊन विचारांचे आदान प्रदान झाले. ग्राममंगल या आदिवासी मुलांच्या संस्थेला प्रबोधिनीची पुस्तके भेट म्हणून देण्यात आली. राष्ट्रीय एकात्मता अंतर्गत या वर्षी एकूण पाच ठिकाणी मातृभूमिपूजन कार्यक्रम केले गेले. कार्यकर्त्यांसाठी वैज्ञानिक आणि वैचारिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रबोधक मंडळ आणि विकासिका यांच्या पालकांच्या बैठकीसाठी एक गट तयार केला गेला. खेळातून पालकांची ओळख करून घेऊन मुलांसाठी घेत असलेल्या तासिकांमधील उपक्रम सांगण्यात आले. पालकांनी एकत्र येऊन मुलांसाठी काही वेगळे उपक्रम राबवता येतील का या बद्दलही चर्चा घडवून आणण्यात आली. या बैठका वर्षातून दोन वेळा झाल्या.

५. **वंचित गट –** यासाठी काम करण्याचे ठरवले गेले. त्या संदर्भात बैठका होऊन मुलांसाठी/किशोर व मुलींसाठी काम करण्याचे निश्चित करण्यात आले. वर्षभराचे सगळे उपक्रम भवितव्य लेखाचा आधार घेत, नियोजनाने झाले.

## ◈ चिपळूण संपर्क केंद्र

१. **संचालक मा. वाच. गिरीशराव बापट यांची भेट –** दि. २३ व २४ एप्रिल २३ रोजी मा. संचालक यांची चिपळूण संपर्क केंद्राला भेट झाली. मा. संचालकांनी मार्गदर्शन करताना ''युवक गटाचे काम करताना मनुष्यबळ, त्यांच्या क्षमता, त्यांच्याकडे उपलब्ध असणारा वेळ असा विचार करून क्रीडा, कला, तंत्रज्ञान, पर्यावरण, मनाचे श्लोक अशा सारखे लहान-लहान अभ्यास गट करत या प्रबोधिनी प्रवेशाचे दारांमधून आत येणाऱ्यांसाठी उपक्रमाशिवाय वेळ देणे आवश्यक आहे. त्यांच्याशी होणाऱ्या संवादातून स्नेहाचे, मैत्रीचे धागे निर्माण झाले की अशांच्या समूहगुण विकसन प्रशिक्षणाचा विचार करता येईल तसेच चालू असणारे आरोग्य विषयीचे काम आणि हिरकणी प्रकल्प यासाठीची पद्धत समजून घ्यावी पण त्यामागचं आपलं येथील उद्दिष्ट, हेतू निश्चित करून आपल्या-आपल्या पद्धती निर्माण कराव्यात. प्रबोधिनी विस्तार + आयुर्वेद प्रसार यासाठी हिरकणीसारखा प्रकल्प उपयुक्त ठरू शकेल'', असे सुचवले.

२. **पूरक शिक्षण –** छोटे सायंटिस्टस् या उपक्रमाच्या माध्यमातून या वर्षी विज्ञान अध्यापक संघ (चिपळूण तालुका) यांच्याबरोबर

एकत्रित काम सुरू झाल्यामुळे ओंकारदादा बाणाईत यांच्या उपस्थितीत विज्ञान शिक्षकांची कार्यशाळा, दुर्दम्य आशावादी या पुस्तकाचे मोफत वितरण इ. उपक्रम झाले. काही शाळांमधून वाचक मेळावे, निरीक्षण कौशल्य सत्रे, छात्र प्रबोधन दिवाळी अंक व दिनदर्शिका वितरण, मातृभूमी परिचय शिबिरे, छात्र प्रबोधन आणि मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या विविध स्पर्धा, स्वयं अध्ययन कार्यशाळा इ. उपक्रमांसाठी सहकार्य करण्यात आले. तसेच डी. बी. जे. महाविद्यालयीन अध्यापक गटासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र इ. उपक्रम झाले.

**केंद्रातील अन्य कार्यक्रमाचे तपशील पुढे दिले आहेत.**

| उपक्रम | तपशील | वारंवारिता | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| सामूहिक उपासना | नियमित उपासना व अन्य अभ्यास साहित्य वाचन, चर्चा | साप्ताहिक | ०६ |
